**उत्खनन**

# आर्य भाषांची मायभूमी

(^mJ 1)

श्रीकांत गंगाधर तलगेरी


**भा**रतातल्या आणि जगातल्या इतिहासाच्या पुस्तकांमध्ये भारताचा प्राचीन इतिहास सुरू होतो तो हडप्पा-मोहेंजोदारो (किंवा सिंधू-सरस्वती) संस्कृतीच्या वर्णनाने. त्यानंतर लगेच येतं 'आर्यांच्या' इ.स.पूर्व १५००मधल्या कथित आक्रमणाचं वर्णन - 'आर्य' नावाची एक जमात मध्यआशियाच्या मार्गाने भारतात आली; ते 'आर्य' लोक एक तर सिंधू-सरस्वती संस्कृतीच्या ऱ्हासानंतर आले किंवा तेच त्या संस्कृतीवर आक्रमण करून त्या संस्कृतीच्या ऱ्हासाला कारणीभूत झाले; आणि सुरुवातीला ते त्याच सिंधू-संस्कृतीच्या भौगोलिक विस्तारक्षेत्रात स्थायिक झाले आणि तिथे त्यांनी ऋग्वेद या प्राचीनतम ग्रंथाची रचना केली. कालांतराने ते संपूर्ण उत्तर भारतात पसरले आणि ते ज्या आर्य भाषा बोलत होते, त्या भाषा (सुरुवातीला वैदिक भाषेच्या बोली) हळूहळू संपूर्ण उत्तर भारतावर पसरल्या (म्हणजे हळूहळू संपूर्ण उत्तर भारतातल्या लोकांच्या पूर्वीच्या भाषा प्रचारातून गेल्या आणि कालांतराने ते या आर्य भाषा बोलायला लागले) आणि तसंच या 'आर्य' लोकांचा वैदिक धर्मसुद्धा या संपूर्ण देशावर पसरला.

इतिहासाच्या सुरुवातीलाच शिकवल्या जात असलेल्या या 'आर्य आक्रमणाच्या' सिद्धान्ताचे तीन प्रमुख परिणाम आमच्या देशाच्या इतिहासाच्या अभ्यासावर आणि या देशाच्या समाजकारणावर आणि राजकारणावर दिसतात -

१. परस्परांशी काहीही संबंध नसलेल्या दोन लोक-समूहांमध्ये आणि त्यांच्या संस्कृतींमध्ये प्राचीन भारताचा इतिहास विभागला जातो; एक 'स्थानीय' सिंधू-सरस्वती संस्कृती आणि दुसरी 'बाहेरून आलेली' 'आर्य' संस्कृती. आजची भारताची विश्वमान्य हिंदू संस्कृती ही मुळात त्या 'बाहेरून आलेल्या' 'आर्यांच्या' संस्कृतीतून जन्मलेली संस्कृती आहे, असा निष्कर्ष काढला जातो.

२. दुसऱ्या प्राचीन संस्कृतींच्या मानाने (प्राचीन सुमेर, इजिप्त आणि चीनच्या संस्कृती, ज्या तिन्ही इ.स.पूर्व ३०००च्याही मागे जातात).

**'भारतावर आर्यांनी आक्रमण करून आपली संस्कृती इथल्या समाजावर लादली' या कथित सिद्धान्ताने भारतामध्ये मोठ्या प्रमाणात गैरसमज निर्माण करून भारताच्या एकात्मतेवर गंभीर आघात केले आहेत. हा सिद्धान्त कशातून निर्माण झाला, त्याची वैचारिक पार्श्वभूमी कोणती होती, अनेक भारतीय अभ्यासकांवरही त्या सिद्धान्ताचा कसा परिणाम झाला, या सिद्धान्तामुळे भारतीय राजकारणावर आणि समाजकारणावर कोणते परिणाम झाला या सर्वांचा विस्तृत ऊहापोह श्रीकांत तलगेरी यांनी आपल्या विविध ग्रंथांतून केला आहे. त्यांच्या पुस्तकावर आणि सिद्धान्तावर जगातील वैचारिक विश्वात चर्चा होत आहे. संजय सोनवणी यांनी लिहिलेल्या व नुकत्याच प्रकाशित झालेल्या** जीळसळीं जष ढहश तशवळल ठशश्रळसळीं अवि खविीं-ऋहरससरी उळींळश्रळीरींळेप **या पुस्तकाच्या निमित्ताने या सिद्धान्ताचा उगम, सिद्धान्ताच्या पुराव्यामागील फोलपणा आणि वस्तुस्थिती याचा ऊहापोह तलगेरी यांनी आपल्या लेखमालेतून केला आहे.**






आमची सध्याची भारतीय संस्कृती तितकीशी प्राचीन नाही असाही निष्कर्ष काढला जातो, कारण तिचा जन्म फक्त इ.स.पूर्व १५००च्या नंतर, म्हणजे 'आर्यांच्या' कथित आक्रमणानंतरच झाला.

३. या ३५०० वर्षांपूर्वी घडलेल्या कथित आक्रमणाच्या जोरावर आजही भारतातल्या वेगवेगळ्या लोकांना व जातींना 'आर्य' आणि 'आर्येतर' ठरवलं जातं. उत्तर भारतीय लोकांना दक्षिण भारतीय लोकांपासून आणि प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या जातीच्या लोकांना एकमेकांपासून तोडण्यासाठी किंवा वेगळं ठेवण्यासाठी, आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मपरिवर्तनाच्या कामात एक शस्त्र म्हणून, या सिद्धान्ताचा घातक प्रयोग सतत केला जात असतो.

असाच राजकीय खेळ खेळणारा, संजय सोनवणी यांनी लिहिलेला 'ओरिजिन्स ऑफ द वेदिक रिलीजन अँड इंडस-घग्गर सिव्हिलायजेशन' (वैदिक धर्म आणि सिंधू-घग्गर संस्कृती यांचे उगम) हा ग्रंथ हल्लीच प्रसिद्ध झाला आहे, आणि लेखक त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांच्या साहाय्याने या ग्रंथाचा महाराष्ट्रभर प्रचार करण्यात लागले आहेत. या ग्रंथाचा थोडक्यात आढावा घेण्यासाठी आणि सत्य परिस्थिती आणि खरी वस्तुस्थिती वाचकांपुढे आणण्यासाठी हा लेख. त्यापूर्वी विषयाची संपूर्ण पार्श्वभूमी नीट समजून घेतली पाहिजे, जी कळल्याशिवाय चर्चेला काही अर्थ नाही.

**पार्श्वभूमी**

पाचशे वर्षांपूर्वी जगात कुठेही कोणाच्याही मनात 'आर्य' वंशाची संकल्पना अस्तित्वात नव्हती, किंबहुना 'आर्य' नावाची कोणतीही जात-जमात असू शकते अशी कल्पना स्वप्नातसुद्धा आली नव्हती. या वंशाचे लोक भारतात बाहेरून आक्रमण करून आले ही कल्पना तर सोडाच, पण भारतातल्या किंवा भारताबाहेरच्या कोणत्याही लेखी किंवा तोंडी ऐतिहासिक किंवा लोकपरंपरेत या वंशाच्या लोकांचा कुठेही किंचितही उल्लेख नव्हता.

प्राचीन काळापासून भारताचा आणि युरोपचा (म्हणजे ग्रीस आणि रोमचा) व्यापार संबंध होता. मध्यकालीन युगात, ख्रिश्चन आणि मुस्लीम देशांमध्ये धर्मयुद्धं चालली, जी अनेक शतकं चालू राहिली. त्याचाच भाग म्हणून अरबांनी भारत आणि युरोपमधल्या व्यापाराचे खुष्कीचे मार्ग बंद करून टाकले आणि अरब व्यापाऱ्यांनी भारताची उत्पादनं युरोपला पुरवायची बंद केली. भारतीय वस्तूंना त्या काळात युरोपात इतकी तीव्र मागणी होती की त्या मिळवण्यासाठी युरोपच्या राज्यकर्त्यांनी आणि व्यापाऱ्यांनी भारताकडे येण्याच्या समुद्री मार्गांचा शोध लावण्यासाठी प्रयत्न चालू केले. समुद्री मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात युरोपच्या लोकांनी अमेरिकेचाही शोध लावला. अखेर पंधराव्या शतकात समुद्री मार्गाचा शोध लावून युरोपच्या व्यापाऱ्यांनी भारताशी स्वतंत्र व्यापार संबंध स्थापित केले.

या व्यापाऱ्यांबरोबर ख्रिश्चन मिशनरी आणि वसाहतवादी विचारसरणीचे राजकीय हेतू बाळगणारे लोकही आलेच, आणि त्यात काही विद्वान वृत्तीचे लोकही होते. यापैकी काहींच्या ध्यानात एक धक्कादायक गोष्ट लक्षात आली, ती अशी की प्राचीन भारताच्या संस्कृतीत प्रमुख असलेली संस्कृत भाषा आणि प्राचीन युरोपच्या संस्कृतीत प्रमुख असलेल्या लॅटिन आणि ग्रीक भाषा यांचा एकमेकांशी काहीतरी वांशिक संबंध आहे. या तीन भाषांच्या जवळजवळ प्रत्येक अंगांमधून हा वांशिक संबंध स्पष्ट दिसून येतो, उदा. शब्दावलींमधून, शब्दांच्या धातूंमधून, व्याकरणांच्या आणि वाक्यरचनेच्या नियमांमधून. या विषयावर पुढे जास्त खोलवर अभ्यास होत राहिला, आणि विद्वानांच्या लक्षात आलं की केवळ लॅटिन आणि ग्रीकच नव्हे, तर युरोपच्या जवळजवळ सगळ्याच भाषांचा संस्कृत भाषेशीच नव्हे, तर उत्तर भारतातल्या (आणि तसंच श्रीलंकेच्या आणि इराण-अफगाणिस्तान-मध्य आशियातल्या) प्रमुख भाषांशी वांशिक संबंध आहेत, जणू त्या सगळ्या भाषा एका भाषिक 'कुटुंबाच्या' सभासद असाव्यात. या भाषांमधल्या सर्वात प्राचीन दोन ग्रंथांमध्ये, म्हणजेच भारतातल्या ऋग्वेदात आणि इराणी लोकांच्या अवेस्तामध्ये, त्या ग्रंथांचे रचयिते स्वत:ला 'आर्य' म्हणून संबोधित करताना लक्षात आल्याने या भाषांना 'आर्य' भाषा असं नाव दिलं गेलं.

(कालांतराने जगातल्या सगळ्याच भाषांचा भाषाशास्त्राच्या नियमांनुसार अभ्यास होऊन आज त्या सुमारे १९ अशा भाषा कुटुंब किंवा भाषा महाकुटुंबांमध्ये विभागल्या गेल्या आहेत. यांपैकी ६ भाषा कुटुंबांमधल्या भाषा भारतात बोलल्या जातात. ती भाषा कुटुंबं आहेत आर्य भाषा कुटुंब (ज्यात संस्कृत, काश्मिरी, हिंदी आणि उर्दू सहित सगळ्या प्रमुख उत्तर भारतीय राज्यभाषांचा समावेश आहे), द्रविड भाषा कुटुंब (प्रामुख्याने दक्षिण भारतातल्या चार राज्यभाषा), ऑस्ट्रिक भाषा कुटुंब (पूर्व-मध्य भारतातले संताली, मुंडा वगैरे भाषा, मेघालयातली खासी भाषा, निकोबार द्वीपातल्या निकोबारी भाषा), सिनो-तिबेटी भाषा कुटुंब (प्रामुख्याने हिमालयीन प्रदेशांमधल्या आणि उत्तर-पूर्व भारतातल्या जनजातींच्या भाषा), बुरुशास्की भाषा कुटुंब (ज्यात काश्मीरच्या हुंझा आणि गिलगीत भागांतली एकमेव भाषा बुरुशास्की) आणि अंदमानी भाषा कुटुंब (ज्यात अंदमान द्वीपातल्या जनजातींच्या भाषा आहेत.)

पण एक मोठा प्रश्न विद्वानांसमोर उभा राहिला. बाकी सगळी भाषा कुटुंबं एका कोणत्यातरी लगतच्या सीमित भौगोलिक क्षेत्रात पसरलेली आढळतात. उदाहरणार्थ द्रविड भाषा कुटुंब केवळ दक्षिण भारतात आढळतं आणि सिनो-तिबेटी भाषा कुटुंब केवळ आशियाच्या पूर्वार्धात आढळतं. आणि जगातल्या बहुतेक बाकी सगळ्या भाषा कुटुंबांच्या बाबतीतही अशीच स्थिती आहे. पण आर्य भाषा कुटुंबातल्या भाषांचा ऐतिहासिक क्षेत्र-विस्तार पूर्वेला श्रीलंकेपासून पश्चिमेला ग्रेट ब्रिटनपर्यंतच्या लगतच्या नसलेल्या वेगवेगळ्या प्रदेशांवर पसरलेला आढळतो. अर्थात हा अनेक वेगवेगळ्या, लगतच्या नसलेल्या प्रदेशांवर पसरलेला महाविस्तार या भाषा कुटुंबाचं मूळचं भौगोलिक क्षेत्र असूच शकत नाही. या मोठ्या विस्तारातल्या कोणत्यातरी एका लहानशा प्रदेशात वा क्षेत्रात या भाषा कुटुंबाचा उगम झाला असला पाहिजे, आणि त्या लहानशा प्रदेशातून वा क्षेत्रातून कालांतराने या भाषा कुटुंबातल्या बोली भाषा

पसरत जाऊन त्यांच्या वेगवेगळ्या ऐतिहासिक प्रदेशांमध्ये स्थायी झाल्या असल्या पाहिजेत. तर ते लहानसं 'आर्यांचं उगमस्थान' असलेलं मूळ क्षेत्र कोणतं?

लक्षात ठेवलं पाहिजे की हा भाषांच्या आणि धर्म-संस्कृतींच्या इतिहासाचा प्रश्न आहे, प्रत्यक्ष त्या भाषा बोलणाऱ्या लोकांचा नव्हे. आजच्या काळातल्या या सगळ्या आर्य भाषा बोलणाऱ्या लोकांचा जसा एकमेकांशी वांशिक संबंध नाही, तसाच अतिप्राचीन काळातल्या (किंवा कोणत्याही नोंदीकृत ऐतिहासिक प्राचीन काळातल्या) वेगवेगळ्या आर्य भाषा बोलणाऱ्या लोकांचा एकमेकांशी वांशिक संबंध नव्हता. वांशिक संबंध भाषांमध्ये होता आणि आहे, त्या आर्य भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये नव्हता आणि नाही. आज अमेरिकानिवासी इंग्लिश मातृभाषा असलेल्या लोकांमध्ये आफ्रिकी वंशाचे 'निग्रो' लोक, युरोपीय वंशाचे 'गोरे' लोक आणि तिथल्या अमेरिकेतल्या मूलनिवासी 'रेड इंडियन' वंशाचे लोक आहेत. पण हे सगळे एक 'आर्य' भाषा बोलतात, म्हणून ते सगळे लोक 'आर्य'वंशाचे ठरत नाहीत. श्रीलंकेतला सिंहली भाषा बोलणारा, इराणमधला इराणी भाषा बोलणारा, ग्रीसमधला ग्रीक भाषा बोलणारा आणि स्वीडनमधला स्वीडिश भाषा बोलणारा, हे सगळे लोक एकाच 'आर्य' वंशाचे आहेत, आणि त्यांच्याविरुद्ध तमिळनाडूतला तमिळ भाषा बोलणारा माणूस या सगळ्यांपासून एका वेगळ्या 'द्रविड' वंशाचा आहे, असं ठरत नाही. एका भाषिक वंशाच्या भाषा बोलणारे सगळे लोक एकाच जातीय वंशाचे जसे आजच्या काळात नसतात, तसेच प्राचीनतम काळातही नव्हते. 'आर्य' भाषांचा जिथे कुठे उगम झाला, तिथून त्या भाषा त्यांच्या वेगवेगळ्या ऐतिहासिक प्रदेशांमध्ये जेव्हा केव्हा पसरल्या, त्यानंतर कालांतराने त्या भाषा त्या त्या वेगवेगळ्या प्रदेशांमधल्या मूलनिवासी लोकांच्या भाषा बनल्या (ही ऐतिहासिक प्रक्रिया का आणि कशी घडली हे अजून स्पष्ट झालेलं नाही, पण अशी प्रक्रिया घडली हे निर्विवाद आहे). इतिहासाच्या क्षितिजावर जेव्हा हे सगळे प्रदेश उदयाला आले, तेव्हा त्या वेगवेगळ्या प्रदेशांमधले लोक भाषिक वंशाने 'आर्य' होते पण जातीय वंशाने एकमेकांपासून भिन्न होते, त्यामुळे 'मूळ' आर्य भाषा बोलणाऱ्या लोकांचा नेमका (शारीरिक) जातीय 'वंश' कोणता आणि कसा होता याची कुठेही नोंद नाही, आणि मूळ 'आर्य' वंश हा फक्त एक तर्कविसंगत चर्चेचा विषय होऊ शकतो. भाषा अर्थात वाऱ्यातून पसरत नाहीत, कोणीतरी हाडा-मासाची माणसंच आपल्या भाषा घेऊन स्थलांतर करतात, पण सगळीकडे त्या आर्य भाषा (स्थलांतर करण्याच्या प्रक्रियेचा एक आपोआप घडणारा भाग म्हणून) पसरवणारे लोक त्या त्या प्रदेशातल्या मूलनिवासी लोकांमध्ये मिसळून गेले होते, आणि त्यांचं मूळ वांशिक रूप ओळखणं आज अशक्य आहे, यावर आर्य भाषांचा अभ्यास करणाऱ्या सगळ्याच विद्वानांचं एकमत आहे.

हा निव्वळ भाषाशास्त्राशी संबंधित असलेला विषय आहे. पण या विषयाला अनेक ठिकाणी राजकीय आणि जातीय वांशिक स्वरूप दिलं गेलं. जर्मनीमध्ये हिटलरने जर्मन लोकच सर्वात 'शुद्ध आर्य'






असून जगातल्या सर्वश्रेष्ठ वंशाचे आहेत असं सांगणारी 'नाझी' विचारसरणी मांडली, आणि या विचारसरणीमधून युरोपमध्ये आणि संपूर्ण जगात जे थैमान घातलं गेलं, त्यामुळे हा 'आर्य' शब्दच बदनाम झाला. भाषाशास्त्राच्या विद्वानांनी 'आर्य' भाषा कुटुंब हा शब्दप्रयोग सोडून दिला आणि 'इंडो-युरोपियन' भाषा कुटुंब (या केवळ भौगोलिक वर्णन स्वरूपाच्या शब्दाचा) शब्दप्रयोग सुरू केला.

पण तथाकथित 'आर्य' जातीय वंशाच्या कल्पनेचा सर्वात जास्त, सर्वात खोल, सर्वात विषारी आणि सर्वात दीर्घायुषी राजकीय प्रयोग झाला आणि अजून जोरात होत आहे तो भारतात आणि भारताच्या राजकारणात, समाजकारणात आणि इतिहास कथन/लेखनात.

'आर्य भाषा बाहेरून आल्या', यातून 'आर्य बाहेरून आले', आणि यातून 'वर्तमानातले अमुक अमुक जातीचे वा प्रदेशातले लोक या बाहेरून आलेल्या आर्यांचे वंशज' आणि 'हिंदू धर्म-संस्कृती बाहेरून आलेल्या लोकांची धर्म-संस्कृती' असा हा राजकीय विचारसरणींचा प्रवास घडला आहे. उत्तर भारतीय लोकांना दक्षिण भारतीय लोकांपासून आणि प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या जातीच्या लोकांना एकमेकांपासून तोडण्यासाठी किंवा वेगळे ठेवण्यासाठी, आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मपरिवर्तनाच्या कामात एक शस्त्र म्हणून या कल्पनेचा घातक प्रयोग सतत केला जात असतो.

**(क्रमशः पुढील अंकी)**

**sgtalageri@gmail.com**

*उत्खनन*

# आर्य भाषांचा सिद्धान्त

श्रीकांत गंगाधर तलगेरी



जगभर पसरलेल्या आर्य भाषा कुटुंबातल्या भाषांच्या बारा शाखा मानल्या जातात. त्या आहेत इंडो-आर्यन (भारतात), इराणियन (इराण-अफगाणिस्तान-मध्य आशियात), आर्मेनियन (इराण-तुर्कस्तानच्या उत्तरेला), ग्रीक, अल्बानियन (दोन्ही दक्षिण-पूर्व युरोपात), तोखारियन (प्राचीन चिनी तुर्कस्तानात), अनातोलियन (प्राचीन तुर्कस्तानात), स्लाविक, बाल्टिक (दोन्ही पूर्व युरोपात), जर्मनिक (उत्तर आणि उत्तर-पश्चिम युरोपात), केल्टिक (पश्चिम युरोपात) आणि इटालिक (दक्षिण युरोपात). त्यापैकी अनातोलियन आणि तोखारियन या दोन शाखा लुप्त शाखा आहेत, म्हणजे त्या शाखेतल्या भाषा कुठेही बोलल्या जात नाहीत. त्या प्राचीन काळात बोलल्या जात असत, आणि आज फक्त शिलालेखांमधून आणि दस्तावेजांमधून त्यांची माहिती उपलब्ध आहे

आर्य भाषांच्या पसरलेल्या क्षेत्र विस्तारावरून तीन महत्त्वाचे निष्कर्ष काढले गेले -

१. या सगळ्या 'आर्य' भाषा बाकी भाषांपासून वेगळ्या आणि एकमेकांशी संबंधित आहेत, तर त्या एकाच वांशिक 'आर्य' भाषा कुटुंबाच्या सदस्या आहेत.

२. अतिप्राचीन काळात बोलल्या जात असलेल्या एका (अनुमानित) समाईक आर्य पितृभाषेच्या बोलींमधून या सगळ्या भाषांचा उगम झाला आहे.

३. ही समाईक आर्य पितृभाषा प्राचीन काळात एका सीमित ठिकाणी बोलली जात होती, आणि ते ठिकाण या 'आर्य'भाषांचं आणि 'आर्य' भाषा कुटुंबाचं उगमस्थान आहे.


४. हे तिन्ही निष्कर्ष स्पष्ट आणि तर्कशुद्ध आहेत.

वस्तुस्थितींच्या तपशिलांच्या वस्तुनिष्ठ अभ्यासातून हे तीन अपरिहार्य आणि निर्विवाद निष्कर्ष पुढे आले आहेत, आणि ते नाकारता येत नाहीत. मुळात आर्य भाषांचा सिद्धान्त या तीन निष्कर्षांवर आधारित आहे. फक्त एक मोठा यक्षप्रश्न राहतो : या आर्य भाषांचं मूळ उगमस्थान नेमकं कुठे होतं? हा अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय आहे. दोन शतकांपासून या विषयातल्या वस्तुस्थितींचा अभ्यास करून या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी संशोधन सुरू आहे. भाषाशास्त्राच्या दृष्टीने त्या भाषा कुटुंबातल्या भाषांचे आणि त्या प्राचीन भाषिकांच्या समाईक प्राचीन धर्म-संस्कृतीचे तपशील, तसंच या प्राचीन उगमस्थानाचं

**'आर्यांचा' भारतात कथित प्रवेश आणि मग ऋग्वेदाची रचना हे कुठेतरी इ.स.पूर्व ३०००पासून इ.स.पूर्व ६००च्या काळामध्ये कसं सोयीस्करपणे बसवायचं, हा विद्वानांना प्रश्न पडला. या प्रवेशापूर्वीचा दक्षिण रशियापासून भारतापर्यंतचा लांब आणि शेकडो वर्षांच्या कथित प्रवासाचा इतिहास आणि या रचनेनंतरचा बुद्धांच्या काळापर्यंतचा दीर्घकालीन स्थायी इतिहास, या सगळ्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करताना असंख्य विसंगत आणि त्रासदायक वस्तुस्थितींना आणि तपशिलांना बाजूला करून आणि सोयीस्कर तडजोडी करून शेवटी विद्वानांनी निष्कर्ष काढला की 'आर्यांनी' भारतात सुमारे इ.स.पूर्व १५००मध्ये प्रवेश केला आणि तेव्हापासून सुमारे इ.स.पूर्व १२००पर्यंत ऋग्वेदाची रचना केली.**

ठिकाण नेमकं कुठे होतं आणि तिथून या भाषा संभवत: कधी आणि कशा पसरायला लागल्या असतील, या सगळ्या विषयांचं तीन प्रमुख पांडित्यपूर्ण अभ्यासक्षेत्रांमधून खोलवर संशोधन होतंच आहे. ती तीन अभ्यासक्षेत्रं म्हणजे भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र.

मूळ उगमस्थानाचा शोध घेताना भाषाशास्त्राच्या अतिखोलवर अभ्यासातून आणखी काही मूळ वस्तुनिष्ठ मुद्दे सिद्ध झाले आहेत, आणि त्यांचीही दखल घेतली पाहिजे. आर्य भाषांच्या उगमस्थानात त्या प्राचीन समाईक पितृभाषेच्या एकूण बारा बोली इतिहासाला माहीत आहेत (कदाचित आणखीही काही बोली अस्तित्वात होत्या ज्या काळाच्या ओघात लुप्त झाल्या, पण त्यांचा काही पुरावा राहिला नाही) ज्यांमधून माहीत असलेल्या बारा आर्य भाषांच्या शाखा विकसित झाल्या. त्यांच्या भाषिक लक्षणांच्या अभ्यासातून त्या सुमारे कधीपर्यंत उगमस्थानात एकत्र होत्या (आणि त्यानंतर आपापल्या वेगवेगळ्या ऐतिहासिक भौगोलिक क्षेत्रांच्या दिशेने स्थलांतरित व्हायला लागल्या), आणि उगमस्थानातून स्थलांतराचा कालक्रम कोणता होता (म्हणजे सर्वप्रथम कोणती बोली एकत्र समूहातून वेगळी झाली, आणि त्यानंतर कोणती, असा कालक्रम) या दोन गोष्टीही सिद्ध झाल्या आहेत :




**काल**

आर्य भाषांच्या बारा बोली सुमारे ३५०० इ.स.पूर्वपर्यंत एकत्र होत्या, आणि त्यानंतर, म्हणजे इ.स.पूर्वच्या चौथ्या सहस्रकाच्या शेवटी किंवा तिसऱ्या सहस्रकाच्या एकदम सुरुवातीला या बोली हळूहळू पसरायला लागल्या आणि एकमेकांपासून विभक्त व्हायला लागल्या.

**कालक्रम**

स्थलांतराच्या पहिल्या टप्प्यात दोन बोली वेगळ्या झाल्या. सर्वप्रथम वेगळी होणारी बोली होती अनातोलियन आणि त्यानंतर तोखारियन. दुसऱ्या टप्प्यात अनुक्रमाने इटालिक, केल्टिक, जर्मनिक, बाल्टिक आणि स्लाविक या बोली वेगळ्या झाल्या. शेवटी पाच शेवटच्या बोली उगमस्थानात राहिल्या : अल्बानियन, ग्रीक, आर्मेनियन, इराणियन आणि इंडो-आर्यन. या शेवटच्या पाच बोलींच्या स्थलांतराचा कालक्रम मात्र निश्चित झालेला नाही.

(वास्तविक पाहता हा आर्य भाषांच्या उगमस्थानाचा प्रश्न एक अति-महत्त्वाचा ऐतिहासिक प्रश्न आहे. जगात सात खंड आहेत, त्यापैकी अंटार्क्टिका हा संपूर्णपणे बर्फाने भरलेला खंड वसतिहीन आहे. बाकी वसती असलेले सहा खंड आहेत. त्यापैकी चार खंड - युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया - असे आहेत की ज्यांमधल्या ८०-९०लोकांची मातृभाषा एक 'आर्य' भाषा आहे, आणि बाकी १०-२० टक्के लोकही बहुतांशी कोणती ना कोणती 'आर्य' भाषा जाणतात. पाचवा खंड आशिया. इथल्या दक्षिण भागात (भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, अफगाणिस्तान, ताजिकिस्तान, इराण) आणि उत्तर भागात (सैबेरियात, जो रशियाचा भाग आहे) 'आर्य' भाषांचं वर्चस्व आहे. फक्त आफ्रिका असा खंड आहे, जिथे 'आर्य' भाषांचं काही स्थानिक अस्तित्व नाही. पण आफ्रिकेला आणि पूर्व आणि पश्चिम आशियाला युरोपीय वसाहतवादी इतिहास असल्यामुळे तिथेही युरोपची कोणती न कोणती 'आर्य' भाषा जाणणाऱ्यांची कमी नाही. मग जर मुळात इतिहास या विषयाला काही महत्त्व असेलच, तर जगात सगळीकडे पसरलेल्या या आर्य भाषांच्या उगमस्थानाचा प्रश्न इतिहासातला फक्त महत्त्वाचाच नव्हे, तर सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.)

इथपर्यंतचे आर्य भाषांच्या सिद्धान्ताचे निष्कर्ष स्पष्ट, तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि निर्विवाद आहेत.

पण या आर्य भाषांच्या सिद्धान्ताचा जेव्हा भारताच्या संदर्भात 'आर्य आक्रमणाचा सिद्धान्त' झाला, तेव्हा तर्कशुद्धता आणि वस्तुनिष्ठता संपल्या आणि पूर्वग्रहदूषित विद्वत्तेची आणि राजकारणाची सुरुवात झाली.

**आर्य आक्रमणाचा सिद्धान्त**

आर्य भाषांचं मूळ उगमस्थान नेमकं कुठे होतं? या यक्षप्रश्नावर तीन प्रमुख अभ्यासक्षेत्रांमधून खोलवर संशोधन होत आहे. सुमारे तीन शतकांपासून चालू असलेल्या या शोधात उगमस्थानासाठी अनेक उमेदवार-ठिकाणं सुचवली गेली आणि त्यांची तपासणी झाली. पण विद्वानांनी बहुमतांनी काढलेलं अनुमान असं आहे की ते उगमस्थान या भाषांच्या ऐतिहासिक, भौगोलिक विस्तार-क्षेत्राच्या कोणत्या तरी मध्यभागात असलं पाहिजे, जिथून त्या भाषा चहूदिशेला पसरल्या आणि तो मध्यभाग आणि ते उगमस्थान दक्षिण रशियामध्ये आहे. त्यामुळे संशोधनाने त्या दक्षिण रशियातल्या कथित उगमस्थानासाठी पुरावे शोधण्याच्या दिशेने आणि त्या कथित उगमस्थानातून वेगवेगळ्या आर्य भाषांच्या शाखांचे स्थलांतर-क्रम आणि तपशील आखण्याच्या दिशेने वळण घेतलं आणि आज हाच पूर्वग्रह धरून संशोधन केलं जात आहे. या संशोधनात भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र या तीन अभ्यासक्षेत्रातल्या महत्त्वाच्या कितीतरी असंख्य पुराव्यांकडे आणि वस्तुस्थितींकडे दुर्लक्ष केलं जातं किंवा ते सरळसरळ बाजूला पाडले

जातात, कारण ते या उगमस्थानाच्या बाजूने साक्ष देत नाहीत. (आर्य भाषांचं उगमस्थान उत्तर भारतात होतं, म्हणजे आर्य भाषांची मायभूमी भारतातच होती, हे मी माझ्या तीन पुस्तकांमधून सिद्ध केलं आहे आणि सगळे पुरावे याच सत्याची साक्ष देतात, हे या लेखात पुढे संक्षिप्तपणे दर्शवलं जाईल.)

ऋग्वेद हा सर्वात प्राचीन आर्य भाषिक ग्रंथ आहे आणि ऋग्वेदात ज्या वैदिक धर्म-संस्कृतीचं विवरण दिसतं, त्यात बाकी सगळ्याच आर्य भाषा-शाखांमधल्या परस्परांपासून वेगवेगळ्या विकसित झालेल्या धर्म-संस्कृतींची बीजं आणि मुळं दिसतात, हे पाश्चिमात्य विद्वानांच्या लक्षात आलं. मग आर्य भाषांचं उगमस्थान जर दक्षिण रशियात असेल, तर आर्यांची सर्वात मूळची आणि प्राचीन धर्म-संस्कृती भारतातल्या ग्रंथात कशी नोंदलेली दिसते? हा प्रश्न त्यांना पडलाच. पण त्यांना हा ग्रंथ भाषा-शास्त्राच्या कथित आधारावर निर्णित दक्षिण रशियातल्या उगमस्थानाच्या चौकटीत बसवायचाच होता. त्यामुळे त्यांनी असं ठरवलं की ऋग्वेदाची रचना करीत असताना हे 'आर्य' अगदी नुकतेच भारतात आले असले पाहिजेत, आणि दक्षिण रशियामधून आणलेल्या धर्म-संस्कृतीची मुळं आणि बीजं अजून त्यांच्या मनात अगदी ताजी असल्यामुळे या ग्रंथात या मूळच्या आर्य धर्म-संस्कृतीचा इतका अखंड, संपूर्ण, स्पष्ट आणि भरभरून प्रत्यय येतो. याचाच परिणाम म्हणून ऋग्वेदाचा पूर्वग्रहदूषित अन्वेषण-पद्धतींनुसार अभ्यास करण्याची प्रथा रूढ झाली : ऋग्वेदात (आणि नंतर बाकी वेदांमध्ये, वैदिक साहित्यामध्ये आणि पुराणांमध्येही) या कथित आक्रमणाच्या खुणा शोधण्याचा अट्टाहास सुरू झाला. 'वैदिक आर्य'भारतात नवीनच आले होते, त्यांचे इथल्या मूलनिवासी 'आर्येतर' लोकांबरोबर संघर्ष घडले आणि हळूहळू त्यांनी संपूर्ण उत्तर-पश्चिम भारतावर (आणि ऋग्वेदिक काळानंतर संपूर्ण उत्तर भारतावर) कब्जा केला आणि आपली धर्म-संस्कृती आणि भाषा इथल्या स्थानीय 'आर्येतर' लोकांमध्ये (बळजबरीने किंवा एक ऐतिहासिक प्रक्रिया म्हणून) पसरवली, या निष्कर्षाचे पुरावे आणि खुणा शोधणं म्हणजेच 'वैदिक इतिहासाचा अभ्यास' किंवा 'इंडॉलोजी' असं समीकरण बनलं आहे.

ऋग्वेदातले सामान्य अर्थाचे शब्द घेऊन त्यातून 'आर्य' बाहेरून आल्याच्या खुणा, मूलनिवासी 'आर्येतर' लोकांच्या अस्तित्वाच्या खुणा आणि त्या 'आर्येतर' लोकांबरोबर झालेल्या कथित संघर्षांच्या खुणा शोधण्याचा हा अट्टाहास किती हास्यास्पद आणि केविलवाणा ठरतो, याचं मी माझ्या पुस्तकांमध्ये विवरण केलंच आहे. याशिवाय ऋग्वेदाच्या भौगोलिक क्षितिजावरूनही 'पुरावा' पुढे केला जातो : ऋग्वेदाचं भौगोलिक क्षितिज पूर्वेला हरयाणा (आणि लगतच्या पश्चिम उत्तर प्रदेशाचे भाग) इथपासून पश्चिमेला दक्षिण-पूर्व अफगाणिस्तानपर्यंत पसरलेलं आहे; त्यानंतरच्या यजुर्वेदाचं भौगोलिक क्षितिज उत्तर प्रदेश-हरयाणा-केंद्रित आहे आणि शेवटच्या अथर्ववेदाचं क्षितिज पूर्वेला बंगालपर्यंत पसरलेलं दिसतं. या सगळ्यातून असा निष्कर्ष काढला गेला की हे पूर्वेकडे हळूहळू पसरत जाणारं क्षितिज या गोष्टीचं दर्शक आहे की 'आर्य' बाहेरून पश्चिमेकडून आले, आणि त्यांचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे झाला. म्हणजे ऋग्वेदाच्या काळात ते अफगाणिस्तानापासून हरयाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशापर्यंतच पोहोचले होते, अथर्ववेदाच्या काळापर्यंत ते बंगालपर्यंत पोहोचले, आणि त्यानंतरच्या काळात आख्ख्या उत्तर भारतात पसरले. (हे चित्र किती खोटं आहे हे मी माझ्या पुस्तकांमध्ये पुराव्यांनिशी सिद्ध केलं आहे आणि पुढे या लेखातही स्पष्ट केलं जाईल.) याच्या विरुद्ध पाश्चिमात्य विद्वानांनाच 'वैदिक आर्य' हे बाहेरून आलेले लोक नव्हेत, याचेही ठोस पुरावे ऋग्वेदाच्या अभ्यासातून मिळाले होते :

१. ऋग्वेदात कुठेही आपण बाहेरून आल्याची जाणीव दिसत नाही, हे 'आर्य' बाहेरून आल्याचे दावे करणारे पाश्चिमात्य विद्वानही प्रामाणिकपणे आणि स्पष्ट शब्दात मान्य करतात. इतकंच नव्हे, तर ऋग्वेदोत्तर वैदिक साहित्यातदेखील हळूहळू पुढे पूर्वेला विस्तार करून संपूर्ण उत्तर भारतात पसरलेल्याची जाणीव दिसत नाही.


२. ऋग्वेदात आणि वैदिक साहित्यात कुठेही कथित स्थानीय 'आर्येतर' भाषिकांची (मग ते शत्रू असोत वा मित्र) जाणीवही दिसत नाही आणि उल्लेखही दिसत नाही, हेही मान्य केलं जातं. वास्तविक हे 'वैदिक आर्य' लोक जर बाहेरून आले असते आणि त्यांनी त्या क्षेत्राच्या 'आर्येतर' लोकांवर आक्रमण करून त्या संपूर्ण भौगोलिक क्षेत्राला भाषा आणि धर्म-संस्कृतीच्या दृष्टीने 'आर्य' बनवण्याचं काम केलं असतं, तर त्या मूलनिवासी 'आर्येतर' लोकांच्या संदर्भात कुठे न कुठेतरी नोंद मिळायला हवी होती. पाश्चिमात्य विद्वानांनी ऋग्वेदात 'आर्येतर' मूलनिवासींना हुडकून काढण्याचे कितीतरी प्रयत्न केले, पण त्या कथित 'आर्येतर मूलनिवासीं'ची नावं भाषिकदृष्ट्या 'आर्य'च निघाली आणि तीच नावं तशाच संदर्भात प्राचीन युरोपीय ग्रंथांमध्येसुद्धा आढळतात! ऋग्वेदाचं भाषिक वातावरण संपूर्णपणे 'आर्यच' आहे.

३. ऋग्वेदात ३५०० वर्षांपूर्वीसुद्धा त्या संपूर्ण क्षेत्रातल्या स्थानीय नद्यांची आणि जनावरांची नावं शुद्ध 'आर्य भाषिक' नावं आहेत. नुकतेच बाहेरून

**स्लाविक आणि बाल्टिक भाषिक प्रदेश**



आलेल्या लोकांच्या बाबतीत ही असाधारण गोष्टच नव्हे, तर जगाच्या इतिहासात कुठेही समान उदाहरण नसलेली गोष्ट आहे. अमेरिकेत आजही बहुतेक प्रमुख नद्यांची नावं पूर्वनिवासी 'रेड इंडियन' लोकांच्या भाषेतली आहेत, आणि युरोपमध्ये आजही हजारो वर्षांनंतरसुद्धा बहुतेक प्रमुख नद्यांची नावं अज्ञात 'आर्यपूर्व' भाषांमधली आहेत. या सगळ्या गोष्टी बाजूला झाडून 'वैदिक आर्य' भारतात नुकतेच बाहेरून आलेले लोक होते असा अट्टाहास केला जातो.




आर्य भाषिकांचे झालेले स्थलांतर

वेगवेगळ्या बोली निर्माण होत गेल्या). तर या 'आर्यांचा' उत्तर-पश्चिम भारतात (उत्तर पाकिस्तानात) पश्चिमेकडून प्रवेश नक्की केव्हा झाला?

'आर्यांचा' भारतात कथित प्रवेश आणि मग ऋग्वेदाची रचना हे कुठेतरी इ.स.पूर्व ३०००पासून इ.स.पूर्व ६००च्या काळामध्ये कसं सोयीस्करपणे बसवायचं, हा विद्वानांना प्रश्न पडला. या प्रवेशापूर्वीचा दक्षिण रशियापासून भारतापर्यंतचा लांब आणि शेकडो वर्षांच्या कथित प्रवासाचा इतिहास आणि या रचनेनंतरचा बुद्धांच्या काळापर्यंतचा दीर्घकालीन स्थायी इतिहास, या सगळ्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करताना असंख्य विसंगत आणि त्रासदायक वस्तुस्थितींना आणि तपशिलांना बाजूला करून आणि सोयीस्कर तडजोडी करून शेवटी विद्वानांनी निष्कर्ष काढला की 'आर्यांनी' भारतात सुमारे इ.स.पूर्व १५००मध्ये प्रवेश केला आणि तेव्हापासून सुमारे इ.स.पूर्व १२००पर्यंत ऋग्वेदाची रचना केली.

मग हे 'आर्य' भारतात नेमके कधी आले असतील?

एका बाजूला सुमारे इ.स.पूर्व ६००पासून (म्हणजे बुद्धांच्या काळाच्या किंचित आधीपासून) भारतीय इतिहासासाठी बौद्ध, जैन, ग्रीक आणि चिनी ग्रंथांमध्ये भरपूर नोंदलेले पुरावे आहेत, ज्यामधून सिद्ध होतं की त्या काळात आणि त्यापूर्वीही संपूर्ण उत्तर भारत संपूर्णपणे आर्य भाषिक होता. त्या काळापूर्वीचं वैदिक वाङ्मय याहीपेक्षा शेकडो वर्षांपूर्वीचा याच आशयाचा पुरावा देतं, पण किती आधीचा पुरावा? म्हणजे सर्वात पहिला ग्रंथ ऋग्वेदाची रचना कधी झाली?

दुसऱ्या बाजूला भाषाशास्त्राच्या अभ्यासातून निघालेला वस्तुनिष्ठ निष्कर्ष असा की सुमारे इ.स.पूर्व ३०००पर्यंत आर्य भाषांच्या बारा बोली उगमस्थानातच एकत्र होत्या आणि त्या नंतर एकमेकांपासून वेगळ्या होऊन स्थलांतरित व्हायला लागल्या. जर हे उगमस्थान दक्षिण रशियात असेल, तर इंडो-आर्यन आणि त्याच्याबरोबर समाईक इतिहास असलेली इराणियन बोली इ.स.पूर्व ३०००नंतर दक्षिण रशियातून निघाल्या असल्या पाहिजेत. आर्य आक्रमणाच्या सिद्धान्तानुसार या दोन बोली बोलणारे 'आर्य' हळूहळू आणि वाटेत वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये शेकडो वर्षं वसाहत करत करत मध्य आशियात पोहोचले आणि तिथे स्थायी असलेल्या (अज्ञात) संस्कृतीच्या प्रदेशात काही काळ स्वत: स्थायिक झाले. नंतर तिथून एकमेकांपासून वेगळे होऊन इंडो-आर्यन बोली बोलणाऱ्या 'आर्यांनी' दक्षिण-पूर्व दिशेला असलेल्या भारतात (म्हणजे सध्याच्या उत्तर पाकिस्तानात) आणि इराणियन बोली बोलणाऱ्या 'आर्यांनी' दक्षिण-पश्चिम दिशेला असलेल्या अफगाणिस्तानात प्रवेश केला, त्या ठिकाणी काही काळानंतर अनुक्रमे ऋग्वेद आणि अवेस्ता या ग्रंथांची रचना केली (आणि अर्थात नंतरच्या काळात, या मूळ इंडो-आर्यन आणि इराणियन बोली अनुक्रमे पूर्वेकडे उत्तर भारतात आणि पश्चिमेकडे इराणमध्ये पसरत गेल्या आणि त्यांच्यातून

(एक मजेची गोष्ट. हा आर्य आक्रमणाचा सिद्धान्त मांडला गेला, 'इंडॉलॉजी'चा अभ्यास जोरात चालू झाला आणि ऋग्वेदात या कथित आक्रमणाच्या इतिहासाच्या खुणा शोधण्याची प्रक्रिया प्रचलित झाली, तेव्हा अजून हडप्पा-मोहेंजोदारो (सिंधु-सरस्वती) संस्कृतीच्या पुराणवस्तुशास्त्रासंबंधीच्या अवशेषांचा शोध लागलेला नव्हता. अशोकांच्या शिलालेखांपूर्वीचे (म्हणजे सुमारे इ.स.पूर्व ३५०च्या पूर्वीचे) काहीही लिखित शिलालेख-दस्तावेज किंवा महान संस्कृतीचे पुराणवस्तुशास्त्रासंबंधीचे पुरावे उपलब्ध झाले नव्हते. तेव्हा ऋग्वेदाचा अभ्यास करणाऱ्या पाश्चिमात्य विद्वानांना ऋग्वेदात सगळीकडे असंस्कृत आणि रानटी 'आर्येतर मूलनिवासी' आणि सुसंस्कृत 'आर्य' असे पुरावे सापडत गेले. इ.स.पूर्व ३०००च्याही मागे जाणारे हडप्पा-मोहेंजोदारोचे पुराणवस्तुशास्त्रासंबंधीचे अवशेष सापडताच एकदम ऋग्वेदात सगळीकडे सुसंस्कृत 'आर्येतर मूलनिवासी' आणि भटक्या जातीचे अर्ध-रानटी 'आर्य' सापडायला लागले. यातून या विद्वानांचं ऋग्वेदाचं पृथक्करण आणि अर्थबोधन किती फसवं आहे, हे स्पष्ट दिसतं)

तरी इथपर्यंत अजून हा फक्त भाषांच्या स्थलांतराचाच प्रश्न होता, आणि फसवा किंवा चुकीचा जरी असला, तरी हा अभ्यास पांडित्यपूर्ण अभ्यासच होता. पुढे या विषयाला भारतातच राजकीय स्वरूप दिलं गेलं.

*(क्रमश: पुढील अंकी)*

**sgtalageri@gmail.com**

उत्खनन

श्रीकांत गंगाधर तलगेरी



*महाराष्ट्रासमवेत उत्तर भारतात अशाच द्वेषावर आधारित जातीय विचारसरणीने जन्म घेतला, पण याचं स्वरूप थोडं वेगळं होतं. ते फक्त ब्राह्मणविरोधी आणि वैदिक धर्म संस्कृती विरोधी होतं. सगळ्या जातीचे लोक आर्य भाषाच बोलणारे असल्याने आर्य भाषांचा विरोध करणं म्हणजे थोडी विरोधाभासाची गोष्ट ठरली असती. विचारसरणीवरची आपली श्रद्धा सिद्ध करण्यासाठी आपल्या स्वतःच्याच आर्य मातृभाषा हिंदी, मराठी वगैरे बोलायच्या बंद करून अन्य कोणत्यातरी भाषा आपल्या मातृभाषा म्हणून स्वीकारणं शक्यतेच्या पलीकडची गोष्ट आहे, हे कदाचित त्यांच्या विवेकबुद्धीला पटलं असेल. त्यामुळे इथे या विषयाला भाषेच्या संदर्भापासून संपूर्णपणे वेगळं करून राजकारण खेळलं जातं.*

# आर्यांच्या नावाने राजकारण

(भाग ३)

'आर्य' नावाचे हे लोक भारतात 'बाहेरून' आले हा आर्य भाषा सिद्धान्ताचा भाग असला तरी हा कथित इतिहास फार प्राचीन काळात (सिद्धान्ताप्रमाणे इ.स. पूर्व १५००च्या सुमारास) घडलेला इतिहास होता. म्हणजे किमान ३५०० वर्षांपूर्वीचा. त्या कथित घटनेचं आजच्या भारतीय लोकांच्या एकमेकांशी असलेल्या व्यवहाराशी आणि संबंधांशी काही देणं-घेणं असू शकतं, असा विचारदेखील वास्तविक कोणाच्याही मनात येता कामा नये. या देशात फक्त १००० वर्षांपूर्वी किंवा ४००-५०० वर्षांपूर्वी घडलेली आणि अगदी तपशीलवार लेखी नोंद असलेली आक्रमणंसुद्धा सध्याच्या भारतीय लोकांच्या एकमेकांशी व्यवहारात आणि संबंधांत विचारात घेणं आणि त्याचं राजकारण करणं अमान्य समजलं जातं. तिथे या ३५०० वर्षांपूर्वी घडलेल्या, आणि कुठेही वास्तविक नोंद नसलेल्या, कथित आक्रमणाचं राजकारण करणं कोणत्याही परिस्थितीत कल्पनेच्या पलीकडची गोष्ट समजली जायला हवी. पण याचं भरपूर राजकारण झालं आणि सतत चालूच आहे.

'आर्य आक्रमणाचा' हा प्रश्न विद्वानांच्या दृष्टीने कधीही सध्याच्या भारतातल्या कोणत्याही जाती-जमातीच्या उगमस्थानाचा नव्हताच, केवळ आर्य भाषा कुटुंबाच्या उगमस्थानाचा होता. वैदिक धर्म-संस्कृतीचं क्षेत्रफळ हरयाणा ते अफगाणिस्तानच्या पूर्व सीमेपर्यंतच्या विस्तारात होतं, याबद्दल सगळ्याच विद्वानांचं एकमत आहे, पण केवळ आर्य भाषा कुटुंबाचं उगमस्थान दक्षिण रशियात होतं असा समज प्रचलित झाला असल्यामुळे ते पुढे असं धरून चालतात की त्या वैदिक धर्म संस्कृतीच्या उगमापूर्वीच्या काळात काही आर्य भाषिक बाहेरून आले आणि आपल्या आर्य भाषा इथल्या स्थानीय लोकांना प्रदान करून त्यांच्यात अशा प्रकारे मिसळून गेले की त्यांच्या स्वतंत्र वांशिक अस्तित्वाचा पुरावा पुरातत्त्वशास्त्राला (पुराणवस्तुशास्त्राला) मिळत नाही. खुद्द वैदिक काळातसुद्धा जातीय वंशाने बाहेरून आलेले 'आर्य' अशी कोणतीही स्पष्ट जात-जमात नव्हती, असं पाश्चिमात्य विद्वानांचं आज एकमत झालं आहे. पण आजच्या भारतातले राजकीय विचारवंत मात्र आजच्या जाती-जमातींमध्येसुद्धा 'आर्य' आणि 'आर्येतर' शोधून थकत नाहीत.

वस्तुत: हा कथित 'आर्य आक्रमणाचा इतिहास' भारतालाच नव्हे, तर आशियातल्या अन्य काही देशांना (उदा. इराणला) आणि युरोपच्या जवळजवळ सगळ्या देशांना लागू व्हायला हवा होता, कारण विद्वानांच्या म्हणण्याप्रमाणे या 'आर्यांची' मायभूमी किंवा उगमस्थान दक्षिण रशियात होतं. तिथून त्या 'आर्यांच्या' वेगवेगळ्या शाखा (म्हणजेच आर्य भाषांच्या वेगवेगळ्या बोली बोलणारे लोक) सगळीकडे (भारतात, इराणात, मध्य आशियात आणि संपूर्ण युरोपात) स्थलांतर करीत पसरले, त्या त्या ठिकाणी स्थायी झाले आणि तिथल्या मूळ स्थानीय लोकांमध्ये मिसळून गेले. पण त्यांनी आपल्या भाषा मात्र जिवंत ठेवल्या आणि विकसित केल्या, आणि इतिहासाच्या मंचावर त्या त्या ठिकाणचे रहिवासी आर्य भाषा बोलणारे म्हणून उदयाला आले. त्यामुळे भारतात जर बाहेरून (१५०० इ.स.पूर्वमध्ये) आलेले 'आर्य' विरुद्ध स्थानीय 'आर्येतर' वंशाचे लोक आजही असतील, तर

इंग्लंडमध्ये, जर्मनीमध्ये आणि ग्रीसमध्येही (जिथे सगळीकडे ही ‘आक्रमणं’ फार नंतरच्या काळात घडली) तसे आर्य-आर्येतर असायला हवेत. त्या देशांमध्येही आर्य भाषा-संस्कृती ‘बाहेरून’ आलेल्या ‘आर्यांची’ भाषा-संस्कृती समजली गेली पाहिजे. पण त्यापैकी कोणत्याही देशाच्या इतिहासाच्या अभ्यासात किंवा राजकारणात हे चित्र आम्हाला दिसत नाही. फक्त भारताच्या इतिहासात आणि समाज-राजकारणात हा कथित ‘आर्य आक्रमण’ एक मोठा मुद्दा होऊन बसला आहे.


**राजकारणाची सुरुवात**

एकोणिसाव्या शतकातल्या काही ब्राह्मण विद्वानांना ‘आर्य’ भाषांची कल्पना अर्धवट समजली, आणि त्यातून त्यांनी असा समज करून घेतला की युरोपीय आणि भारतीय लोकांचे वांशिक पूर्वज एक होते, जे ‘आर्य’ होते. हा ‘आर्य’ भाषांचा शोध विद्वानांना संस्कृत भाषेचा आणि ऋग्वेदाचा अभ्यास केल्यावर लागला होता, ज्या संस्कृत भाषेवर आणि वेदांवर ब्राह्मणांनी आपली मक्तेदारी स्थापित केली होती. त्यामुळे या ब्राह्मण विद्वानांनी हेही ठरवलं की ते कथित ‘आर्य’ पूर्वज युरोपीय लोकांचे आणि भारतातल्या केवळ ब्राह्मणांचेच समाईक पूर्वज होते. लोकमान्य टिळकांनी या विचारांना चालना देणारा ‘आर्क्टिक होम इन द वेदाज’ हा ग्रंथ लिहून आर्यांचं उगमस्थान उत्तर ध्रुवात असल्याचं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. या ग्रंथात काही धक्कादायक वक्तव्यं आढळतात, उदा. ते एका ठिकाणी ‘आपल्या’, म्हणजे अर्थात ब्राह्मणांच्या, त्या उत्तर ध्रुवात राहणाऱ्या ‘आर्य’ पूर्वजांचं श्रेष्ठत्व अशा शब्दात वर्णन करतात - ‘ज्या पद्धतीने नवीन भूमींच्या शोधात ते ‘प्राचीन आर्य’ उत्तर ध्रुवापासून विषुवावृत्तापर्यंतच्या त्यांच्या प्रवासात त्यांच्या समोर आलेल्या सगळ्या अनार्य वांशिक लोकांना नेस्तनाबूत करून किंवा बळजबरीने आपल्यात समाविष्ट करून त्यांच्यावर आपले वर्चस्व लादू शकले, त्यावरून त्यांचं सामर्थ्य आणि श्रेष्ठत्व सिद्ध होतं’! अर्थात ब्राह्मण हे त्या सामर्थ्यवान आणि श्रेष्ठ ‘वर्चस्व लादणाऱ्या’ आर्यांचे वंशज, आणि अन्य ‘खालच्या’ जातीचे लोक हे त्या वर्चस्व ज्यांच्यावर लादलं गेलं त्या अ-सामर्थ्यवान आणि अ-श्रेष्ठ अनार्य लोकांचे वंशज!

**राजकारणाची प्रगती**

महात्मा फुलेंनी या काही ब्राह्मण विद्वानांनी मांडलेला सिद्धान्त उलटा फिरविला, आणि ब्राह्मण किंवा ‘द्विज’ जातीचे लोक बाहेरून आलेल्या आर्यांचे वंशज तर अन्य जातींचे लोक मूलनिवासी आर्येतर लोकांचे वंशज असा दृष्टीकोन पुढे केला. या ‘आर्यांच्या’ जातीय वंशीय कल्पनेवर आधारित आज भारतात अनेक राजकीय प्रवाह मूळ धरून बसलेले आहेत, आणि भारतीय राजकारणात, समाजकारणात आणि इतिहास-लेखनात थैमान घालत आहेत.

आर्य भाषा बाहेरून आल्या हे ठरवल्यावर लगेच पाश्चिमात्य विद्वानांना त्या आर्यांनी यायच्या आधी उत्तर भारतातले मूलनिवासी आर्येतर लोक कोणत्या भाषा बोलत असतील या गोष्टीचं कुतूहल वाटायला लागलं. भारतामध्ये बोलली जाणारी दुसरी दोन प्रमुख भाषा कुटुंबं म्हणजे द्रविड आणि ऑस्ट्रिक, आणि कोणत्याही पुराव्याच्या

अभावी या दोन्हींपैकी कोणाची निवड करायची या बाबतीत विद्वानांमध्ये मतभेद उभे राहिले आणि वाद-विवाद आणि चर्चा सुरू झाल्या. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला हडप्पा-मोहेंजोदारो (सिंधू-सरस्वती) संस्कृतीचे पुराणवस्तुशास्त्राचे पुरावे मिळाले, तेव्हा त्या संस्कृतीचे लोकच आर्यांच्या समोर आलेले इथले मूलनिवासी आर्येतर लोक असं ठरवून हीच चर्चा 'सिंधू-सरस्वती संस्कृतीची भाषा द्रविड होती की ऑस्ट्रिक होती की दुसरी कोणतीतरी अद्याप अज्ञात भाषा होती?' या दिशेने वळली.

सिंधू-सरस्वती संस्कृतीची भाषा द्रविडच होती, संपूर्ण भारतात पूर्वी द्रविड भाषाच बोलल्या जात होत्या, आणि आर्य आक्रमकांनी उत्तर भारतातल्या मूळच्या द्रविड भाषिक लोकांना एक तर जबरदस्तीने 'भाषांतरण' करायला लावलं किंवा त्यांची उत्तर भारतातून दक्षिण भारतात हकालपट्टी केली असं ठरवणारी 'द्रविड चळवळ' दक्षिण भारतातल्या तामिळ भागांमध्ये सुरू झाली. या चळवळीच्या द्वेषावर आधारित विचारसरणीत उत्तर भारतीय लोक, संस्कृत आणि हिंदी भाषा, वेद, ब्राह्मण (तामिळ ब्राह्मणसुद्धा) आणि शेवटी ('आर्यांनी लादलेला') हिंदू धर्म आणि संस्कृतीसुद्धा शत्रू ठरले. सुदैवाने दक्षिण भारतातल्या (तामिळनाडू वगळता) दुसऱ्या प्रदेशांमध्ये या विचारसरणीला काही चालना मिळाली नाही, पण तामिळनाडूत मात्र सगळे प्रादेशिक राजकीय पक्ष या विचारसरणीच्या बीजांमधून जन्मलेले पक्ष आहेत.

महाराष्ट्रासमवेत उत्तर भारतात अशाच द्वेषावर आधारित जातीय विचारसरणीने जन्म घेतला, पण याचं स्वरूप थोडं वेगळं होतं. ते फक्त ब्राह्मणविरोधी आणि वैदिक-धर्म-संस्कृती-विरोधी होतं. सगळ्या जातीचे लोक आर्य भाषाच बोलणारे असल्याने आर्य भाषांचा विरोध करणं म्हणजे थोडी विरोधाभासाची गोष्ट ठरली असती. विचारसरणीवरची आपली श्रद्धा सिद्ध करण्यासाठी आपल्या स्वत:च्याच आर्य मातृभाषा हिंदी, मराठी वगैरे बोलायच्या बंद करून अन्य कोणत्यातरी भाषा आपल्या मातृभाषा म्हणून स्वीकारणं शक्यतेच्या पलीकडची गोष्ट आहे, हे कदाचित त्यांच्या विवेकबुद्धीला पटलं असेल. त्यामुळे इथे या विषयाला भाषेच्या संदर्भापासून संपूर्णपणे वेगळं करून राजकारण खेळलं जातं. (या विचारसरणीला कवटाळणारे विचारवंत आणि राजकारणी भरपूर आहेत, उदा. या लेखाच्या सुरुवातीला नोंद घेतलेले लेखक संजय सोनवणी आणि महाराष्ट्र टाइम्समध्ये त्यांच्या पुस्तकावर परीक्षण लिहिणारे शुद्धोदन आहेर. हे 'आर्य आक्रमणा'च्या सिद्धान्ताला कवटाळून वैदिक धर्म-संस्कृतीला शत्रू मानण्यात अभिमान बाळगतात. याचं विवरण पुढे होईल.)

### तर्कशून्य विरोध

या आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताला विरोध करणारे विचारवंत फार कमी होते. बहुतेक राजकीय विचारवंतांनी या विषयाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केलं. उदाहरणार्थ, प्रत्येक विषयावर आपली स्पष्ट मतं मांडणाऱ्या महात्मा गांधींनी या विषयावर एकही शब्द उद्गारला नसेल. पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या 'डिस्कवरी ऑफ इंडिया' या ग्रंथात जास्त भाष्य न करता या सिद्धान्ताचा स्वीकार करून त्याची केवळ नोंद घेतली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रत्यक्ष आपल्या 'हिंदुत्व' नावाच्या ग्रंथातसुद्धा या सिद्धान्ताचा स्वीकार करून अनेक चुकीची विधानं केली. उदा. सिंधू नदीच्या पश्चिम तीरावर आर्यांनी आपला पहिलं यज्ञकुंड स्थापित केलं आणि मग आपल्या इराणी बंधूंपासून वेगळे होऊन पूर्वेकडे भारतात प्रवेश केला, हे आर्य इथल्या निसर्गाला आणि वातावरणाला नवीन आणि परके होते, पुराणकथांमधल्या अनेक दिव्य जाती (यक्ष, गंधर्व, राक्षस, अप्सरा, वगैरे) वस्तुत: भारतातले मूलनिवासी 'आर्येतर' लोक होते, हे 'आर्य' आपल्या धर्म-संस्कृतीचा प्रसार करण्याचं 'मिशन' घेऊन आले होते, त्यांनी प्रथम आपली संस्कृती सप्तसिंधू प्रदेशात (उत्तर पाकिस्तानच्या क्षेत्रात) स्थापना केली आणि मग जंगलांची जाळपोळ करत संपूर्ण उत्तर भारतात पसरून आपल्या वसाहती बसवल्या आणि राज्यांची स्थापना केली, रामायण हा ग्रंथ त्या धर्मप्रसाराच्या 'मिशन'च्या पूर्णतेची गाथा आहे ज्यात राम आर्यांचं छत्र दक्षिण भारतापर्यंत पोहोचवतात, रामायणातल्या अनेक व्यक्ती (हनुमंत, सुग्रीव, विभीषण वगैरे) दक्षिण भारतातले आर्येतर लोक होते, नंतर आर्येतर लोक या आर्य संस्कृतीत सामील होत गेले आणि त्यांनी वैदिक भाषांमधून उत्पन्न झालेल्या प्राकृत भाषा आपल्या भाषा म्हणून स्वीकारल्या. आणि या 'आर्य'-'आर्येतर' संमिश्रणातून 'हिंदू' निर्माण झाले!

आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताला विरोध करणाऱ्यांमध्ये स्वामी विवेकानंद आणि स्वामी दयानंद सरस्वती प्रमुख होते. पण दुर्दैवाने त्यांनी फक्त नाममात्र आणि वरवरचा विरोध केला, त्या विषयाचा कोणत्याही प्रकारचा गंभीर अभ्यास करण्याचा प्रयत्न केला नाही. उलट, विरोध करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे आणि काही अप्रासंगिक पूर्वग्रहांमुळे हा विरोध दिशाहीन राहिला.

या सिद्धान्ताला विरोध करणारे आजचे विरोधक अनेक हट्ट आणि पूर्वग्रह धरून विरोध करतात : उदा. ते भाषाशास्त्राला शास्त्रच मानत नाहीत आणि आर्य भाषांचा सिद्धान्तच नाकारतात. आर्य भाषा कुटुंबाचं अस्तित्वच नाकारतात, म्हणजे संस्कृत भाषेचा ग्रीक, लॅटिन, इंग्लिश वगैरे भाषांशी वांशिक संबंध आहेत, पण तामिळ आणि अन्य दक्षिण भारतीय भाषांशी तसे वांशिक संबंध नाहीत हे त्यांना पूर्णपणे अमान्य आहे. संस्कृत सोडून दुसरी कोणतीतरी भाषा प्राचीन आर्य पितृभाषा होती ही शक्यता ते पूर्णपणे नाकारतात, आणि संस्कृतच जगातल्या सगळ्या किंवा भारतातल्या तरी सगळ्या भाषांची पितृभाषा आहे, आणि जर आर्य भाषा कुटुंब मान्य करायचाच असेल तर संस्कृत भाषा खुद्द ती प्राचीन आर्य पितृभाषा आहे असा त्यांचा हट्ट असतो. ऋग्वेदाचं ऐतिहासिक विश्लेषण त्यांना मान्य नाही. ऋग्वेद हा एक अनंतकाळचा दिव्य ग्रंथ आहे, त्याला वेळ-काळ आणि भूगोल नाही, त्यात फक्त दिव्य आणि आध्यात्मिक गोष्टी आहेत आणि इतिहासाच्या तपशिलांसारखे भौतिक विषय नाहीत, ऋग्वेदाची मुळात रचनाच झाली नाही कारण तो दिव्य ग्रंथ आहे, त्याची रचना झालीच असेल (म्हणजे त्यातले सूक्त आणि मंत्र दिव्य ऋषींना 'दिसले' असतील), तर ही ५०००-६००० वर्षांपूर्वी नव्हे, तर दश-सहस्रावधी किंवा

लक्षावधी वर्षांपूर्वी घडलेली गोष्ट आहे, वगैरे वगैरे. थोडक्यात प्रामाणिक आणि गांभीर्यपूर्ण अभ्यास त्यांना मान्य नाही, आणि आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताला त्यांचा संपूर्ण विरोध केवळ आणि केवळ भावनाप्रधान पूर्वग्रहांवर आधारित आहे.

**शहाणपणाचा एकमेव आवाज**

या सगळ्यात एकच असे राजकीय विचारवंत होते, ज्यांनी या विषयाचा तर्कशुद्ध अभ्यास केला, आणि ते होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दुर्दैवाने हा त्यांच्या प्रत्यक्ष अभ्यासाचा विषय नव्हता, त्यांच्या अन्य लेखनाच्या संदर्भात प्रसंगी स्पर्श केलेला विषय होता, त्यामुळे ते या विषयाच्या मुळापर्यंत गेले नाहीत, म्हणजे आर्यांच्या उगमस्थानाच्या किंवा मायभूमीच्या शोधाच्या दृष्टीने त्यांनी अभ्यास केला नाही, पण त्यांनी जे काही लिहिलं आहे ते अत्यंत महत्वाचं आहे.

महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखन-भाषणांचे संग्रहित ग्रंथ प्रकाशित केले आहेत, त्यातल्या सातव्या खंडात आंबेडकरांनी 'हू वेअर द शूद्रस?' (शूद्र कोण होते?) आणि 'द अनटचेबल्स हू वेअर दे' (अस्पृश्य कोण होते) या दोन लेखांमध्ये




जातिव्यवस्थेच्या उगमाविषयी आपले विचार आणि आपल्या अध्ययनांतून निघणारे निष्कर्ष मांडले आहेत. आणि त्या दोन लेखांमध्ये आर्यांच्या बाबतीतल्या आपल्या संशोधनाचे निष्कर्षही स्पष्ट शब्दात मांडले आहेत.

आंबेडकर लिहितात - 'आर्य भारतात बाहेरून आले आणि त्यांनी भारतावर आक्रमण केलं या सिद्धान्ताला तिळमात्र पुरावा नाही... पाश्चिमात्य लेखकांनी रचलेली 'आर्य वंशाची' संकल्पना प्रत्येक टप्प्यावर खोटी ठरते... ही संकल्पना केवळ त्यांना अनुकूल वाटणाऱ्या अनुमानांवर आधारलेली आहे... त्या अनुमानांपैकी एकही वस्तुस्थितींना धरून नाही... आर्यांनी बाहेरून येऊन भारतावर आक्रमण केलं हे सिद्ध करणं अशक्य आहे आणि 'वेदांमधले' दास-दस्यू हे भारतातले मूळ निवासी जनजाती होते हे स्पष्टपणे खोटं आहे... आर्य वंशाची संकल्पना रचणारे आपली बाजू सिद्ध करायला इतके उतावळे असतात की ते कोणकोणत्या प्रकारे आपला मूर्खपणाच सिद्ध करत असतात हे त्यांच्याच लक्षात येत नाही... आर्य वंशाची संकल्पना इतकी मूर्खपणाची आहे की ती कधीच मृत व्हायला हवी होती.' यापेक्षा स्पष्ट काय असू शकतं? आर्य



## आवाहन

## संघसाधक मुकुंदराव

स्व. मुकुंदराव पणशीकर - ध्येयपथावरून अविरत मार्गक्रमण करणारे एक संघसाधक.

संघकामाच्या दृढीकरणासाठी सतत श्रमणाऱ्या मुकुंदरावांच्या संघसाधनेला नोव्हेंबर २०१५मध्ये काळानेच पूर्णविराम दिला.

त्यांनी आपल्या संघजीवनात महाराष्ट्राच्या संघकामाला आकार देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील संघसंस्थाजीवनाचा महावृक्षही त्यांच्या कार्यकाळात बहराला आला.

मुकुंदरावांचा जीवनप्रवास सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांनाच चिरकाल प्रेरणा आणि मार्गदर्शन देणारा आहे. त्यांचे प्रचारकी जीवन, संघसंस्थाजीवन, कार्यशैली, व्यक्तिमत्त्व आणि कार्यकतृत्व अशा विविध पैलूंवर भाष्य करणारे मान्यवरांचे लेख समाविष्ट असणारा ***'संघसाधक मुकुंदराव'*** हा ग्रंथ 'सा. विवेक'तर्फे प्रकाशित होणार आहे.

**या ग्रंथात समाविष्ट करण्यासारख्या आठवणी : १) मुकुंदरावांबरोबरचे संवाद २) त्यांचे मार्गदर्शन आणि ३) छायाचित्रे**

आम्हाला हवी आहेत. ती विवेक कार्यालयात ३१ डिसेंबरपर्यंत पाठवावीत. शक्यतो छायाचित्र स्कॅन करून आमच्या '**vivekbookdept@gmail.com**'या ई-मेलवर पाठवावे, म्हणजे गहाळ होण्याचा विषय येणार नाही. ग्रंथनिर्मिती हे अतिशय खर्चीक काम असते, आणि ग्रंथ सर्वांना अत्यंत कमी किमतीत द्यावा लागतो. म्हणून आम्हाला हवे आहेत आपल्याकडून पृष्ठपुरस्कार...

रु. १०००/- आणि १०००/-च्या पटीत रक्कम देऊन आपण पृष्ठदाते व्हावे, ही आग्रहाची विनंती.

*आपला धनादेश अथवा धनाकर्ष 'हिंदुस्थान प्रकाशन संस्था' या नावाने काढावा.*

**☛ पृष्ठसंख्या - अंदाजे २५० पृष्ठे ☛ ८ तैलचित्रे ☛ ग्रंथाचा आकार २३.५ x १७ सें.मी. ☛ प्रकाशन मार्च अखेरीस.**

**संपर्क : सा. विवेक २७८१०२३५/३६ आणि स्थानिक प्रतिनिधी**

वंशाच्या आणि आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताचं मूळ फक्त आंबेडकरच समजू शकले. 'आर्य वंशाची कल्पना केवळ एका भाषिक विधानावर आधारित एक अनुमान आहे... युरोपमधल्या बहुतेक भाषा आणि आशियामधल्या अनेक भाषा एका समाईक पूर्वजभाषेतून आल्या आहेत हे ते भाषिक विधान... यावरून दोन अनुमानं काढली जातात - १. हे आर्य भाषिक एकाच वंशाचे आहेत. २. तो वंश म्हणजे 'आर्य वंश'. तर्क असा केला जातो की जर या सगळ्या भाषा एकाच समाईक पूर्वज भाषेतून आलेल्या भाषा आहेत, तर ती पूर्वज भाषा बोलणारे लोकही एका वंशाचे लोक असले पाहिजेत... आणि ते सगळे लोक एकाच ठिकाणी राहत असले पाहिजेत; कारण एक भाषा एका सीमित मूळ ठिकाणीच विकसित होऊ शकते.'

ते पुढे विवेचन करतात - 'आर्य आक्रमणाचा सिद्धान्त एक काल्पनिक सिद्धान्त आहे. त्याच्यासाठी पाश्चिमात्य विद्वानांचा एक पूर्वग्रह कारणीभूत आहे. तो पूर्वग्रह असा की एक आर्य वंश आहे आणि त्या आर्य वंशाचे सर्वात 'शुद्ध' प्रतिनिधी हे जर्मन लोक आहेत. त्यामुळे त्यांचे मूळ उगमस्थान युरोपजवळ कुठेतरी असावं. मग यावरून एक प्रश्न उद्भवतो, की या आर्यांची भाषा भारतात कशी आढळते? त्याचं उत्तर म्हणजे हे आर्य भारतात बाहेरून आले असले पाहिजेत. त्यामुळे हा आर्य आक्रमणाचा सिद्धान्त रचण्याची आवश्यकता भासली.'

या सिद्धान्ताला 'पाश्चिमात्य विद्वानांनी रचलेली एक गोष्ट' सांगून आंबेडकर लिहितात - 'ही गोष्ट वस्तुस्थिती असल्याचे सिद्ध करण्याच्या मोहिमेवर चाललेले हे विद्वान वेदांचे बारकाईने अध्ययन करतात आणि त्यातून त्यांना सोयीस्कर असे 'पुरावे' शोधण्याचा प्रयत्न करत असतात.' वेदांमध्ये या कथित आक्रमणाचा पुरावा शोधण्याच्या विद्वानांच्या प्रयत्नांना आंबेडकर 'अन्वेषण शास्त्राचा हास्यास्पद विपर्यास' असं संबोधन करतात, आणि विद्वानांनी पुढे केलेला वेदांमधला एकेक मुद्दा तपासून आंबेडकर ते सगळे मुद्दे तर्कशुद्ध पद्धतींनी फेटाळून लावतात.

ते हेही स्पष्ट करतात की वेदांमधले दास-दस्यू हे कथित 'आर्येतर मूलनिवासी' नसून इराणी लोकांचे पूर्वज होते, जे त्या काळात भारतातले निवासी होते (ही गोष्ट मी माझ्या पुस्तकांमध्येही पुराव्यानिशी सिद्ध केली आहे), आणि वेदांमध्ये उल्लेख असलेली भांडणं आणि चढाओढी हे 'आर्य-विरुद्ध-आर्येतर' असं नसून 'आर्यांमधल्याच वेगवेगळ्या जमातींमधली किंवा गटांमधली परस्पर चुरस होती.' या विषयावर बरंच विवेचन करून शेवटी आंबेडकर चार निष्कर्ष स्पष्टपणे पुढे ठेवतात - '१. वेदांमध्ये 'आर्य वंश' कुठेही अस्तित्वात नाही. २. 'आर्य' बाहेरून आले, त्यांनी भारतावर आक्रमण केलं, आणि 'दास-दस्यू' या देशाचे मूळ निवासी होते ज्यांवर कथित 'आर्यांनी' आक्रमण केलं, यापैकी कोणत्याही कल्पनेसाठी वेदांमध्ये तिळमात्र पुरावा नाही. ३. आर्य, दास आणि दस्यू हे वांशिकदृष्ट्या एकमेकांपासून वेगळे होते याचाही तिळमात्र पुरावा नाही.४) आर्यांचा आणि दास-दस्यूंचा (शारीरिक -वांशिक) वर्ण वेगळा होता, याचाही वेदांमध्ये तिळमात्र पुरावा नाही.

डॉ. आंबेडकर 'हू वेअर द शूद्रस?'(शूद्र कोण होते?) या लेखमालेत वरील निष्कर्ष प्रतिपादन करतात. त्यांचे निष्कर्ष सूक्ष्म संशोधनांती काढलेले निष्कर्ष आहेत, आणि त्यांचे शब्द स्पष्ट, सुसंगत आणि असंदिग्ध आहेत. त्यांच्या शब्दांमधून एकच आणि एकच अर्थ निघतो - त्यांनी आर्य आक्रमणाचा सिद्धान्त अगदी पूर्णपणे फेटाळून लावला होता. पण 'द अनटचेबल्स हू वेअर दे' (अस्पृश्य कोण होते) ही दुसरी लेखमाला लिहिताना यात थोडी विसंगती दिसून येते. या दुसऱ्या लेखमालेत आंबेडकर अस्पृश्यतेचा उगम कसा झाला असेल, किंवा कसा झाला असला पाहिजे, यावर इतकं पांडित्यपूर्ण विवेचन करतात की त्यांच्या शब्दांना कोणीही गंभीरपणे आव्हान देऊ शकतील असं वाटत नाही. पण या लेखमालेत एका ठिकाणी जेव्हा ते पुन्हा आर्यांच्या विषयाला स्पर्श करतात, इथे मात्र ते नक्कीच थोडे गडबडले जातात. हा आर्यांचा विषय भाषाशास्त्राशी संबंधित विषय आहे, आणि आपण भाषाशास्त्राचे विद्वान नाही आहोत, कदाचित या विषयावर इतकी ठाम मतं व्यक्त करणं योग्य होतं का, अशी आंबेडकरांना थोडी खंत वाटली असेल. त्यामुळे इथे ते कदाचित आर्य भाषा (भाषाशास्त्राचे तज्ज्ञ सांगतात त्याप्रमाणे) बाहेरून आल्या असतील अशा आशयाची काही विधानं करतात, जी त्यांच्या 'हू वेअर द शूद्रस?'(शूद्र कोण होते?) या लेखमालेत स्पष्ट आणि असंदिग्धपणे मांडलेल्या विधानांशी विसंगत आहेत. पण महत्त्वाचा मुद्दा हा की आर्य भाषा बाहेरून आल्या असतील असं संदिग्धपणे मान्य करतानासुद्धा आंबेडकर स्पष्टपणे ग्वाही देतात की वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचा आणि कथित बाहेरून आलेल्या आर्य भाषिकांचा काहीही संबंध नाही. त्यांचा स्पष्ट निष्कर्ष आहे की (सवर्ण म्हटले जाणारे) हिंदू आणि अस्पृश्य यांच्यातला फरक हा 'वांशिक' भिन्नतेवर आधारित नाही, आणि ब्राह्मण आणि अस्पृश्य हे सर्वत्र एकाच वंशाचे लोक आहेत. ज्या भागांमध्ये ब्राह्मण आर्यवंशाचे आहेत तिथे अस्पृश्यही आर्यवंशाचे आहेत, ज्या भागांमध्ये ब्राह्मण द्रविडवंशाचे आहेत तिथे अस्पृश्यही द्रविडवंशाचे आहेत, आणि ज्या भागांमध्ये ब्राह्मण नागवंशाचे आहेत, तिथे अस्पृश्यही नागवंशाचे आहेत.

सगळ्या भारतीय विचारवंतांपैकी आंबेडकरच एक असे होते, ज्यांना या विषयाचे मूळ मुद्दे सर्वात खोलवर समजले होते आणि आज ते जर हयात असते, तर निष्पक्षपणे निष्कर्षावर पोहोचू शकले असते किंवा दुसऱ्या संशोधकांच्या निष्कर्षांचे तुलन-मापन तर्कशुद्धपणे करू शकले असते. दुर्दैवाने आज आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेणारे विचारवंत 'आर्य' या शब्दाला जातीय वांशिक अर्थ देऊन जातीय राजकारण खेळतात आणि केवळ काही तथाकथित 'वरच्या' जातीतल्या लोकांना 'आर्य' ठरवून भारतातल्या लोकांना दोन परस्परविरोधी गटांमध्ये विभाजित करण्याचा प्रयत्न करतात.

या संदर्भात यापूर्वीही उल्लेख केलेल्या संजय सोनावणी यांच्या पुस्तकाचा थोडा आढावा घेऊ या.

**(क्रमश: पुढील अंकी)**

**- sgtalageri@gmail.com**

**उत्खनन**


# तर्कदुष्ट नकारवाद

**(भाग -४)**

***आर्य भाषांच्या प्राचीन इतिहासाचा खोलवर अभ्यास तीन प्रमुख पांडित्यपूर्ण संशोधनाच्या क्षेत्रांमधून झाला आहे आणि होतच आहे. ते तीन क्षेत्र म्हणजे भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र. आपल्या पुस्तकात सोनवणी भाषाशास्त्राचे आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्राचे नियम झुगारून लिहितात.***

**श्रीकांत गंगाधर तलगेरी**

सुरुवातीलाच नोंद घेतल्याप्रमाणे हल्लीच असा राजकीय खेळ खेळणारा संजय सोनवणी यांनी लिहिलेला 'ओरिजिन्स ऑफ द वेदिक रिलीजन अँड इंडस-घग्गर सिव्हिलायझेशन' (वैदिक धर्म आणि सिंधू-घग्गर संस्कृती यांचे उगम) हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे, आणि लेखक त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांच्या साहाय्याने या ग्रंथाचा महाराष्ट्रभर प्रचार करण्यात लागले आहेत. लेखक त्यांच्या पुस्तकात 'वैदिक धर्म-संस्कृती' 'अभारतीय' आहे असं सांगण्याचा अट्टाहास करतात. इथे ते (स्वत: 'आर्य' मराठी भाषिक असल्याने) या आक्रमणाच्या प्रश्नाला भाषेच्या संदर्भापासून संपूर्णपणे विभक्त करून हा केवळ 'वैदिक धर्म-संस्कृती'च्या उगमाचा प्रश्न बनवतात. कारण त्यांच्या मते ही वैदिक धर्म-संस्कृती सध्याच्या भारतातल्या जाती-व्यवस्थेतल्या काही विशिष्ट जातींचीच धर्म-संस्कृती आहे. त्यामुळे पर्यायाने हा त्या विशिष्ट जातींच्या वांशिक उगमाचा प्रश्न आहे. त्यांच्या पुस्तकातून सगळीकडे हे स्पष्ट दिसतं, आणि त्यांच्या पुस्तकाचा प्रसार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्यांच्या समविचारी सहकार्यांच्या शब्दांमधून ही गोष्ट असंदिग्धपणे स्पष्ट होते (उदा. महाराष्ट्र टाइम्सच्या १६ ऑगस्ट २०१५च्या रविवारच्या अंकात या पुस्तकाचं परीक्षण लिहिताना त्यांचे समविचारी शुद्धोदन आहेर या पुस्तकात सोनवणींनी काय मोठं साधलेलं आहे ते या शब्दात सांगतात : 'वैदिक धर्म-संस्कृतीचा उदय हा आजच्या अफगाणिस्तानजवळच्या परिसरात झालेला आहे. एका अर्थाने, 'वैदिक धर्म-संस्कृती' ही 'अभारतीय' आहे, असे लेखकाचे म्हणणे आहे... मिशनरी प्रवृत्तीच्या काही कष्टाळू प्रचारकांमुळे या अभारतीय संस्कृतीचा भारतभर प्रसार झाला!' आणि सोनवणींच्या या महत्कार्यावर भारावून जाऊन ते पुढे लिहितात : 'वैदिक धर्म-संस्कृतीच्या समर्थकांनी 'वैचारिक' गोंधळ घातलेल्या आजच्या काळात या गोंधळाला रोखठोक प्रत्युत्तर देण्याचे महत्कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर केल्याबद्दल लेखक संजय सोनवणी अभिनंदनास पात्र आहेत'. म्हणजे वैदिक धर्म-संस्कृती 'अभारतीय' आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करणं हे एक 'अभिनंदनास पात्र' 'महत्कार्य' आहे!




मी वरील परीक्षणाच्या उत्तरात लिहिलेला लेख (खरं तर त्या लेखाचा फक्त ३० टक्के भाग) महाराष्ट्र टाइम्सच्या ११ ऑक्टोबर २०१५च्या अंकात छापून आला. त्यात एकच गोष्ट स्पष्ट करण्याचा उद्देश होता की हा 'आर्यांचा' प्रश्न मुळात कोणत्याही 'आर्य वंशाच्या' लोकांनी भारतावर केलेल्या कथित आक्रमणाचा प्रश्न नसून 'आर्य भाषांचा' या देशात बाहेरून कथित आगमनाचा प्रश्न आहे, आणि सोनवणी आणि आहेर त्याला जातीय वांशिक स्वरूप देत आहेत, ते चुकीचं आहे.

याच्या उत्तरात लगेच शुद्धोदन आहेर यांचा लेख महाराष्ट्र टाइम्सच्या १८ ऑक्टोबर २०१५च्या अंकात छापून आला (आणि म.टा. ने या वादाला 'संपूर्ण विराम' देण्याचं घोषित केलं!) या लेखात मला एक 'स्वयंघोषित ज्ञानी' घोषित करून आहेर असा दावा करतात की ते स्वत: आर्य वंशाच्या कल्पनेच्या विरोधात आहेत, आणि हे मी समजू शकलेलो नाही. याचा पुरावा म्हणून ते सांगतात की त्यांच्या परीक्षणात त्यांनी एकदा 'आर्य' वंशाचे (!) अशी शब्दरचना केली आहे. पुढे, 'या माझ्या विधानातील 'आर्य' तसेच 'वंशाचे (!)' हे दोन्ही शब्द 'आर्य वंश' या अर्थाने न घेण्यासाठीच अशी विशिष्ट शब्दरचना केलेली आहे. ज्या



आर्य संस्कृतीचे काही अवशेष

वाचकांचा 'आर्य वंश' या संकल्पनेशी संबंध आलेला आहे, त्यांच्या मनात त्याबाबत शंका निर्माण व्हावी व त्यांनी त्या अनुषंगाने आपल्या शंका निरसनार्थ कार्यवाही करावी, तसेच वृत्तपत्रादी माध्यमांची मर्यादा विचारात घेऊन ही शब्दरचना केलेली आहे. अशा शुद्ध हेतूने केलेली 'आर्यवंशविरोधी' शब्दरचनासुद्धा श्री तलगेरी यांना 'आर्य' वंशवाचक वाटत असेल तर त्यातून दोनच अर्थ उद्भवतात. पहिला म्हणजे तलगेरी यांना मराठी भाषा व्यवस्थित वाचता येत नाही आणि दुसरा म्हणजे तलगेरी यांच्याच मेंदूत तथाकथित आर्य वंशाविषयी भ्रामक संकल्पना आहेत! जातीसंस्थासमर्थक तलगेरी यांनी मांडलेला आर्य उगमस्थानाचा सिद्धान्त विचारात घेता, दुसरा अर्थ अधिक स्वीकारार्ह आहे'.

याला म्हणतात तर्कशून्यतेचा कळस. 'आर्य' प्रश्नाचा वंश व जातीशी काहीही संबंध नाही, फक्त भाषांशी आहे असं पुन्हा-पुन्हा स्पष्ट करून त्या भाषांच्या उगमस्थानाचा शोध घेण्यासाठी भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणारे 'आर्य वंशाविषयी भ्रामक संकल्पना' बाळगणारे 'जातिसंस्थासमर्थक'! मग माझ्याबरोबर बाबासाहेब आंबेडकर आणि सगळे पाश्चिमात्य विद्वानसुद्धा 'जातिसंस्थासमर्थक' ठरतात! आणि फक्त 'आर्य' वंशाचे (!)' अशी कथित 'आर्यवंशविरोधी' शब्दरचना एकदा वापरली, म्हणून आहेर मात्र 'आर्य वंशाविषयी भ्रामक संकल्पना' न बाळगणारे!

***आर्य भाषा जर मुळात भारतातून जग भर पसरल्या असतील, तर ही 'ब्राह्मणांना' किंवा 'उच्चवर्णीयांनाच' अभिमानाची गोष्ट आहे असं नाही किंवा फक्त 'आर्य भाषिक' भारतीयांनाच अभिमानाची गोष्ट आहे असंही नाही. ही सगळ्याच भारतीयांना अभिमानाची गोष्ट आहे.***

पण आहेरांच्या शब्दांमधून स्पष्ट दिसतं की त्यांच्या मते 'आर्य' म्हणजे आर्य भाषा बोलणारे (ज्यांमध्ये बाबासाहेब आंबेडकर, मी आणि स्वत: आहेर आणि सोनवणी समाविष्ट आहेत) नव्हेत, फक्त काही विशिष्ट जातीचे लोक आहेत, जे त्या 'अभारतीय वैदिक धर्म-संस्कृती'ला भारतात आणणाऱ्या 'आर्य वंशाच्या' लोकांचे वंशज आहेत! असं नसेल, तर मग आम्ही आहेरांच्या पुढील विधानांचा काय अर्थ लावायचा? त्यांच्या परीक्षणात ते लिहितात -

'मानवी जनसंख्येच्या' तुलनेत अक्षरश: चिमूटभर असणाऱ्या तथाकथित 'आर्य' लोकांनाच आपल्या उगमस्थानाच्या माध्यमातून वेगळेपणाचा अट्टाहास धरण्याची आवश्यकता का भासते?'आहेरांच्या मते हा प्रश्न आर्य भाषांचा नसून (कारण आर्य भाषा जगातल्या ३० टक्क्यांहून अधिक लोकांच्या मातृभाषा आहेत) कोणीतरी 'मानवी जनसंख्येच्या' तुलनेत 'अक्षरश: चिमूटभर' लोकांचा आहे! ते 'अक्षरश: चिमूटभर' लोक कोण? 'तथाकथित' शब्दाकडे बोट दाखवून ते त्यांच्या विधानांचा स्पष्ट अर्थ नाकारू शकत

नाहीत, कारण माझ्या लेखाच्या उत्तरात ते लिहितात - 'तलगेरी यांनी जातिसंस्थासमर्थक आर्यांचे भारतीयत्व सिद्ध केले, तरी नजीकच्या भविष्यातील जातिसंस्थानिर्मूलक काळाला तेच काय विश्वातील कोणतीही शक्ती थांबवू शकणार नाही!' हे 'जातिसंस्थासमर्थक आर्य' कोण, ज्यांच्या भारतीयत्वावर आहेरांना शंका आहे? आणि माझी लिखाणं वाचल्याशिवाय आणि फक्त मी आर्य भाषांचं भारतीयत्व सिद्ध करतो म्हणून मी 'जातिसंस्थासमर्थक' म्हणून आहेर कसं ठरवतात?

भारताच्या संस्कृतीवर आणि भारतीय संस्कृतीने जगाला काय काय दिलं आहे याबाबत अभिमान असणं म्हणजे भारताच्या इतिहासात आणि परंपरेत ज्या काही वाईट आणि अन्याय्य गोष्टी आहेत त्यांचं समर्थन करणं असं ठरत नाही. निदान माझ्या बाबतीत तरी नक्कीच नाही. हा प्रश्न भाषांच्या उगमस्थानाचा आहे, ज्या भाषा फक्त कोणत्यातरी विशिष्ट जातींच्याच नाहीत, पण त्यातली एक भाषा (मराठी) त्यांची (आहेरांची) स्वत:चीसुद्धा आहे. इथे 'सवर्ण-विरुद्ध-इतर' हा प्रश्न येत नाही. आर्य भाषा जर मुळात भारतातून जगभर पसरल्या असतील, तर ही 'ब्राह्मणांना' किंवा 'उच्चवर्णीयांनाच' अभिमानाची गोष्ट आहे असं नाही. किंवा फक्त 'आर्य भाषिक' भारतीयांनाच अभिमानाची गोष्ट आहे असंही नाही. ही सगळ्याच भारतीयांना अभिमानाची गोष्ट आहे. अर्थात अभिमानाची गोष्ट आहे म्हणून मान्य करावी असं माझं म्हणणं नाही. हा खरोखरच 'ॲकॅडेमिक' विषय आहे, आणि 'ॲकॅडेमिक' चर्चेतूनच त्याचा निकाल लागला पाहिजे. सोनवणींचं पुस्तक आणि त्यांनी मांडलेली विधानं आणि तर्क किती कमजोर पडतात हे आता पाहू या, आणि सत्य काय आहे ते संक्षेपात आणि पुराव्यांनिशी या संपूर्ण लेखाच्या शेवटच्या भागांमध्ये पाहू या.

प्रामाणिकपणे सांगायचं झालं, तर सोनवणींनी या पुस्तकात कोणतीही नवीन गोष्ट मांडलेली नाही आणि कोणताही नवीन पुरावा पुढे केलेला नाही. पुस्तकाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत ते एकच काम करतात - आज या विषयाच्या अभ्यासात जगात जे जे सर्वमान्य असलेले स्पष्ट आणि निर्विवाद मुद्दे आणि पुरावे आहेत, ते ते सोनवणी एकनिष्ठपणे नाकारतात.

आर्य भाषांच्या विषयाचा अभ्यास करताना तीन मूळ मुद्दे लक्षात ठेवले जातात : १. या सगळ्या भाषा एका भाषा कुटुंबाच्या


## साप्ताहिक विवेकच्या महिला वाचकांसाठी

# लेखन स्पर्धा

महिला विशेषांकानिमित्त

'विवेकी' वाचक मैत्रिणींनो,

सस्नेह नमस्कार.

घर-ऑफिसात आणि समाजात वावरताना आजूबाजूला घडणाऱ्या अनेक घटनांना प्रतिसाद देण्याची, एखाद्या विषयावर आपलं मत व्यक्त करण्याची किंवा आपला एखादा वेगळा अनुभव अनेकांशी 'शेअर' करण्याची इच्छा असते. मात्र बरेचदा संधी मिळत नाही, तर कधी संकोच आडवा येतो. आणि त्यामुळे 'शेअरिंगची' ऊर्मी दबून जाते आतल्या आत.... हे लक्षात घेऊनच, तुमचं मत / अनुभव शब्दबद्ध करण्याची संधी, लेखन स्पर्धेच्या माध्यमातून देत आहोत. निमित्त आगामी महिला विशेषांकाचं...

- **स्पर्धेसाठी विषय -**

१. मी केलेलं बंड

२. जुन्या रूढी-परंपरांना मी दिलं नवं रूप

३. आजच्या तरुणाईशी माझा संवाद

४. छंदाने दिला माझ्या व्यक्तिमत्त्वाला आकार

५. असा हवा स्त्रियांचा राजकारणात सक्रिय सहभाग

वरीलपैकी कोणताही एक विषय निवडावा. फक्त एकाच विषयावर लिहिणं बंधनकारक.

- **शब्दसंख्या -** ४५० ते ६०० शब्द. फूलस्केपची २ ते २॥ पानं. • **वयोमर्यादा -** १८ ते ६० वर्षं.
- **लेख पाठविण्याची अंतिम तारीख -** ७ फेब्रुवारी २०१६.

परीक्षणासाठी स्वतंत्र परीक्षक मंडळ असेल आणि परीक्षकांनी दिलेला निकाल अंतिम असेल.

**स्पर्धेतील ३ विजेत्या स्पर्धकांचं लेखन, १३ मार्च २०१६च्या महिला विशेषांकात प्रसिद्ध करण्यात येईल आणि महिला विशेषांकाच्या प्रकाशन सोहळ्यात पारितोषिक वितरण समारंभ होईल.**

लेख लिहून कुरियरने वा पोस्टाने साप्ताहिक विवेकच्या प्रभादेवी कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा किंवा लेखाची 'युनिकोड' वा 'वर्ड ओपन - आर.टी.एफ.' फाईल **vivekedit@gmail.com** वर मेल करावी किंवा लेख स्कॅन करून मेल करावा.

आपल्या लेखाची एक झेरॉक्स प्रत स्वत:जवळ ठेवावी.

स्पर्धकाचं नाव, शिक्षण, नोकरी/व्यवसाय/गृहिणी/विद्यार्थिनी हे तपशील नमूद करावे. संपर्कासाठी पूर्ण पत्ता, मेल आय.डी. वा मोबाईल नंबर कळवावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क :** ०२२-२४२२१४४०, ९५९४९६१८६५

सदस्या आहेत. २. या सगळ्यांचा उगम एका प्राचीन पितृभाषेतून झाला.३. ही पितृभाषा एका विशिष्ट ठिकाणी बोलली जात होती, जे ठिकाण या भाषांचं आणि या भाषा कुटुंबाचं उगमस्थान आहे, आणि जिथून या भाषेच्या वेगवेगळ्या बोली-भाषा बोलणारे लोक स्थलांतर करून वेगवेगळ्या अन्य ठिकाणी जाऊन स्थायिक झाले आणि कालांतराने त्या त्या ठिकाणच्या लोकांमध्ये मिसळून गेले, पण आपल्या बोली भाषांचा भारी प्रभाव मात्र तिथल्या लोकांवर टाकू शकले. या विषयातल्या बाकी तपशिलांबाबतीत कितीही आणि कितीही कटू मतभेद असले, तरी वरील तीन मूळ मुद्दे निर्विवाद आहेत आणि त्यांना कोणीही गंभीर विद्वान नाकारू शकत नाही. पण या तिन्ही मूळ मुद्द्यांना सोनवणी त्यांच्या पुस्तकात बालिश युक्तिवाद करून पूर्णपणे आणि पुन्हा पुन्हा नाकारतात! ते आर्य पितृभाषेची कल्पना 'बुद्धी भ्रष्ट करणारी' कल्पना ठरवतात, आणि लिहितात - 'आर्य पितृभाषा बोलणारे आणि एका उगमास्थानात एकत्र राहणारे लोक कधीच अस्तित्वात नव्हते.'

जेव्हा मूळ आर्य भाषा कुटुंबाची कल्पनाच मान्य नसेल, मग पर्यायाने आर्य भाषिक लोकांच्या स्थलांतराची कल्पना मान्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. संबंधित असलेल्या भाषा इतक्या मोठ्या आणि लगत नसलेल्या क्षेत्रफळावर सुरुवातीपासूनच पसरलेल्या कशा असू शकतात, हा प्रश्न सोनवणींना पडतच नाही, कारण ते या भाषांमधला संबंधच मुळात मानत नाहीत. ते लिहितात - 'आम्ही एक गोष्ट विसरू नये की भाषांचा इतिहास ७००००० वर्षांपूर्वी सुरू होतो. मानवी वसाहतींचा इतिहाससुद्धा दशसहस्रावधी वर्षांपूर्वीचा आहे, म्हणजे आर्य भाषा बोलणाऱ्यांच्या तथाकथित स्थलांतरांच्या कथित तारखांच्या कितीतरी पूर्वीचा. त्यामुळे तथाकथित आर्य भाषांच्या इतिहासासाठी आम्हाला फक्त २०००-७००० वर्षांपूर्वी जाऊन चालणार नाही, आम्हाला मानवी इतिहासात भाषांचा ज्या काळात उगम झाला त्या काळात जावं लागेल'. म्हणजे ७००० वर्षांपूर्वीपासून या सगळ्या वेगवेगळ्या 'तथाकथित' आर्य भाषा त्यांच्या वेगवेगळ्या ऐतिहासिक प्रदेशांमध्येच बोलल्या जात होत्या, असं सोनवणींचं म्हणणं आहे! या 'तथाकथित' आर्य भाषांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही हे ते पुढे पुन्हा पुन्हा सांगतात.

अशा गोष्टींचा हट्ट (भाषाशास्त्र, भाषा कुटुंब, आर्य पितृभाषा वगैरे नाकारणं, इतिहासाच्या चमत्कारिक अतिदीर्घ कालावधी गृहीत धरून चालणं वगैरे) सहसा आर्य आक्रमणाचा विरोध करणाऱ्यांच्या लिखाणात आढळतात. कारण फक्त ज्या आर्य भाषा कुटुंबातल्या भाषांचा एकमेकांशी असलेल्या संबंधाच्या शोधातून (आणि दुसरा कोणताही पाया आणि पुरावा नसताना) आर्य आक्रमणाचा सिद्धान्त जन्माला आला, त्या संबंधालाच जर नाकारलं, तर त्या सिद्धान्ताचा पायाच उखडला जातो असं त्या विरोध करणाऱ्यांना वाटतं.

सोनवणींच्या पुस्तकात एकमेव नवीन गोष्ट ही आहे की ते आक्रमणाचं समर्थन करताना अशा गोष्टींचा हट्ट धरतात! पण वस्तुत: ही आश्चर्याची गोष्ट नाही, कारण ते त्या कथित आक्रमणाला (आधीच सांगितल्याप्रमाणे) आर्य भाषांच्या संदर्भातून विभक्त करून फक्त 'वैदिक धर्म-संस्कृती'च्या (आणि त्याचे कथित जनक असलेल्या काही जातींच्या?) संदर्भात घेऊ इच्छितात.

आर्य भाषांच्या प्राचीन इतिहासाचा खोलवर अभ्यास तीन प्रमुख पांडित्यपूर्ण संशोधनाच्या क्षेत्रांमधून झाला आहे आणि होतच आहे. ती तीन क्षेत्रे म्हणजे भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र. आपल्या पुस्तकात सोनवणी भाषाशास्त्राचे आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्राचे नियम झुगारून लिहितात.

पुराणवस्तुशास्त्रालाही त्यांच्या लेखनात काही विशिष्ट स्थान नाही. जगातल्या सगळ्याच गंभीर विद्वानांनी मान्य केलेली आर्य भाषा सिद्धान्ताच्या अभ्यासातील भाषेची, तुलनात्मक धर्माची आणि तुलनात्मक पुराणकथाशास्त्राची कितीतरी समीकरणं आहेत आणि वैदिक शब्दांची अर्थबोधनं आहेत, जी आर्य भाषा सिद्धान्ताच्या अभ्यासातली प्राथमिक समीकरणं आहेत. ही समीकरणं स्पष्ट आणि निर्विवाद आहेत, पण सोनवणी ती सगळी समीकरणं आणि अर्थबोधनं बिनधास्तपणे नाकारतात.

उदा. वैदिक द्यौस पितर, ग्रीक झेउस पातेर आणि रोमन जुपितर; वैदिक मित्र, इराणी मिथ्र आणि रोमन मिथ्रस; वैदिक इंद्र आणि इराणी इंद्र; वैदिक वृत्रघ्न आणि इराणी वरथ्रघ्न, वैदिक त्रित आणि त्रैतन आणि इराणी थ्रित आणि थ्रैतन, वैदिक असुर मेधा (वरुण) आणि इराणी अहुर मझ्दा, अशी असंख्य देवतांची समीकरणं सोनवणी नाकारतात. तसंच वैदिक नद्या वितस्ता, असिक्नी आणि परुष्णी ह्या क्रमश: सध्याच्या झेलम, चेनाब आणि रावी नद्या आहेत अशी सर्वमान्य आणि निर्विवाद समीकरणं ते नाकारतात. इराक-सीरिया मधल्या (१५०० इ.स.पूर्व या काळातल्या) मितांनी राज्यातल्या राजघराण्यातील राजांची पारंपरिक नावं वैदिक आहेत, आणि त्यांच्या एका दस्तावेजातील देवतांची नावं (इंद्र, मित्र, वरुण, नासत्य) वैदिक देवतांची नावं आहेत, आणि या सगळ्यामधून असा निष्कर्ष काढला गेला आहे की त्या राजघराण्यावर वैदिक लोकांचा प्रभाव होता. ही सर्वमान्य आणि निर्विवाद वस्तुस्थितीसुद्धा ते नाकारतात. आणि या सगळ्या सर्वमान्य गोष्टी नाकारताना ते इतके बालिश तर्क पुढे करतात की ज्यांना गंभीरपणे घेणं वेळ वाया घालवण्यासारखं आहे. किमान या सीमित लेखात तरी!

सोनवणी काही विचित्र निष्कर्षसुद्धा पुढे करतात, जे तर्काला पटणारे आणि वस्तुस्थितींशी आणि पुराव्यांशी जुळणारे नाहीत. उदा. ते वैदिक रसा या नदीला थेट इराकपर्यंत नेतात आणि रसा ही इराकची तिग्रीस नदी आहे, असं ठरवतात. देव-असुरांची कल्पना आणि देव-असुर हे शब्द आणि शिव हे देवता ३००० इ.स.पूर्वच्या जवळपासच्या काळातले नसून ते १५००० इ.स.पूर्वच्याही पूर्वीच्या काळातले आहेत, असा निष्कर्षसुद्धा ते पुढे करतात.

सोनवणींच्या पुस्तकात काही भाषिक चुकाही आढळतात. उदाहरणार्थ, ते सुदास् या ऋग्वेदातल्या सर्वात महत्त्वाच्या राजाचं

नाव सुदास असं समजतात, आणि त्याचा अर्थ ‘चांगला दास’ असं ठरवतात. (‘दास’ हा शब्द ‘दास्’ धातूतून निर्माण झालेला शब्द आहे). वस्तुत: त्याचं नाव ‘सुदा:’ आहे (‘दा’ या धातूतून निर्माण होणाऱ्या या नावाचा अर्थ आहे ‘चांगलं दान करणारा’), आणि व्याकरणाच्या दृष्टीने त्या ‘:’चा संदर्भानुसार ‘स्’ होतो.



ज्या आर्य मायभूमीच्या विषयातल्या चर्चेत स्फोटक नावीन्य आणण्याचा दावा सोनवणी करतात (किंवा त्यांच्यातर्फे केले जातात) त्या चर्चेचा त्यांनी नीटपणे अभ्यास केलेला दिसत नाही. उदा. ते लिहितात - ‘ही (आर्यांची) मायभूमी भारतात असल्याचा सिद्धान्त पहिल्यांदा अठराव्या शतकात (काही पाश्चिमात्य विद्वानांच्या लिखाणातून) सुचवला गेला होता, पण त्या (मृत) सिद्धान्ताला हल्लीच्या काळात कुन्राड एल्स्ट यांनी पुनर्जीवित केला आणि श्रीकांत तलगेरी यांनी त्याचा प्रसार उत्साहाने केला.’ वस्तुत: हा भारतात आर्य भाषांची मायभूमी असल्याचा सिद्धान्त मी पहिल्यांदा माझ्या १९९३च्या पुस्तकात मांडला होता, आणि त्याच्या कितीतरी वर्षांनंतर कुन्राड एल्स्ट यांनी उघडपणे माझंच नाव पुढे करून या सिद्धान्ताला पाठिंबा दिला, याची ग्वाही सर्वप्रथम एल्स्टच देतील.

पुढे सोनवणी लिहितात - ‘भारतात आर्य मायभूमी असल्याचा सिद्धान्त मांडणारे आता असा नवीन दावा पुढे करतात की वैदिक आर्यांना आरायुक्त चाका असलेले रथ माहीतच नव्हते‘. हे साफ खोटं आहे. कोणत्याही अशा गंभीर अभ्यासकाने असा दावा केलेला नाही.

पुढे ते असंही लिहितात - ‘तलगेरींच्या मतानुसार ‘इंडो-आर्यन’ लोक अफगाणिस्तानमार्गे युरोपपर्यंत पसरले.’ माझी पुस्तकं सोनवणींनी फार तर चाळून पाहिली असतील, पण वाचलेली बिलकुल नाहीत आणि समजलेली तर त्याहून नाहीत, हे या विधानामधून सिद्ध होतं. अफगाणिस्तानमार्गे ‘इंडो-आर्यन’ लोक, म्हणजे वैदिक आर्य भाषा बोलणारे लोक, युरोपपर्यंत पसरले म्हणणं म्हणजे वैदिक संस्कृत भाषाच प्राचीन आर्य पितृभाषा होय म्हणण्यासारखं झालं, आणि माझ्या पुस्तकांमधून सोनवणी हेच समजले असतील, तर दुर्दैवाची गोष्ट आहे. वैदिक आर्य भाषा (इंडो-आर्यन) बोलणारे (पुरू वंशाचे) लोक नव्हे, तर त्यांच्या पलीकडे भारतामधून अफगाणिस्तानमध्ये त्यापूर्वीच पसरलेले अन्य आर्य भाषा बोलणारे लोक अफगाणिस्तानमधून दोन टप्प्यात युरोपपर्यंत पसरले असं मी स्पष्ट वर्णन केलं आहे - पहिल्या टप्प्यात (सध्याच्या इटालिक, केल्टिक, जर्मनिक, बाल्टिक आणि स्लाविक आर्य भाषा-शाखांच्या पितृबोली बोलणारे द्रुह्यु वंशाचे लोक उत्तर मार्गाने आणि दुसऱ्या टप्प्यात (सध्याच्या अल्बानियन आणि ग्रीक आर्य भाषा-शाखांच्या पितृबोली बोलणारे) अनु वंशाचे लोक पश्चिम मार्गाने.

अशा असंख्य लहानसहान चुका सोनवणींच्या पुस्तकात भरलेल्या आहेत. पण मूळ मुद्दा हा की सोनवणी आर्य भाषा सिद्धान्ताचे सगळेच प्राथमिक मुद्दे झुगारतात. तरी ते वैदिक धर्म-संस्कृतीच्या जनकांचा मूलत: ‘बाहेरून’ आल्याचा (वस्तुत: फक्त त्याच आर्य भाषा सिद्धान्ताच्या कल्पनेतून जन्मलेला) सिद्धान्त मात्र कसा आणि कोणत्या आधारावर मान्य करतात? ऋग्वेदाचं मर्मस्थान असलेल्या सरस्वती नदीचं सोनवणी हरयाणातून थेट अफगाणिस्तानात स्थलांतरण करून टाकतात. या एका नावाच्या स्वत: घडवलेल्या स्थलांतरणाच्या आधारावर ते ‘सिद्ध’ करतात की ऋग्वैदिक आर्य सुरुवातीला अफगाणिस्तानात राहत होते, आणि तिथून भारतात आले, आणि अशा पद्धतीने वैदिक धर्म-संस्कृतीचे जनक ‘बाहेरून’ आले हते, असं सिद्ध करतात!

ज्या एका नदीच्या नावावरून सोनवणी इतिहासाची उलथापालथ करण्याचा दावा करतात, त्या नदीची वस्तुस्थिती काय आहे, ते पुढील भागात पाहू या.

– **sgtalageri@gmail.com**



उत्खनन


**श्रीकांत गंगाधर तलगेरी**

# सरस्वती नदी

(भाग -५)

सरस्वती नदी ऋग्वेदाच्या संस्कृतीचा भौगोलिक केंद्रबिंदू आहे : १. ती एकमेव नदी आहे, जिच्या स्तुतीत ऋग्वेदात (तीन) संपूर्ण सूक्तं आहेत : ६.६१, ७.९५ आणि ७.९६. शिवाय ऋग्वेदातल्या आणखी ५२ मंत्रांमध्ये सरस्वतीचे उल्लेख आहेत. २. सरस्वती नदी पुरू वंशाच्या लोकांच्या (म्हणजेच ऋग्वैदिक आर्य लोकांच्या) क्षेत्रफळातल्या मध्यभागी वाहणारी नदी म्हणजे त्यांना भौगोलिक केंद्र असलेली नदी आहे, अशी स्पष्ट ग्वाही ऋग ७.९६.२मध्ये आहे. ३. ऋग २.४१.१६मध्ये सरस्वती 'अम्बितमे नदीतमे देवीतमे', म्हणजे 'मातांमध्ये, नदींमध्ये आणि देवींमध्ये सर्वश्रेष्ठ' असल्याची ग्वाही दिली आहे. ४. ऋग्वेदातल्या सूक्तांचे रचयिते दहा ऋषी कुटुंबातले सदस्य आहेत, आणि प्रत्येक कुटुंबाचं एक वेगळं 'कुटुंब सूक्त' आहे, ज्याला 'आप्री-सूक्त' म्हणतात. त्या दहा आप्री-सूक्तांमध्ये तीन देवींची स्तुती केली जाते, त्या आहेत सरस्वती (नदीची देवी), इळा (सरस्वती नदीच्या तीरावर इळास्पद नावाचं तीर्थक्षेत्र असलेली एक त्या काळातली प्रमुख देवी) आणि भारती (सरस्वती नदीच्या तीरावर वसलेल्या पुरू वंशातल्या प्रमुख असलेल्या भरत उप-वंशाची कुलदेवी).

ही ऋग्वेदातली सरस्वती नदी म्हणजे सध्याची घग्गर-हक्रा नदी - जी पूर्वी बारमाही नदी होती, पण आता जवळजवळ चार हजार वर्षांपासून हंगामी नदी बनली आहे. या बाबतीत दीडशे वर्षांपासून तरी सगळ्या संबंधित अभ्यास-क्षेत्रांमधल्या (म्हणजे इंडॉलॉजी,



**ऋग्वेदातली सरस्वती नदी ही कधीही भारतीय परंपरेला गूढ गोष्ट नव्हती. ऋग्वेदात या नदीच्या भौगोलिक परिस्थितीच्या वर्णनात तिच्या दोन उपनद्या आपया आणि दृषद्वती आणि तिच्या काठावर असलेले मानुष सरोवर आणि इळास्पद नावाचं तीर्थक्षेत्र यांचे उल्लेख आहेत आणि महाभारतातल्या वन-पर्वातल्या तीर्थयात्रा-पर्वात १७८ कडव्यांच्या एका आख्ख्या भागात पांडवांनी हरयाणातल्या कुरुक्षेत्राच्या भूमीत केलेल्या तीर्थयात्रेचं तपशीलवार वर्णन आहे, ज्यात अन्य स्थानांसह सरस्वती, आपया, दृषद्वती, मानुष आणि इळास्पद या स्थानांचंही असंदिग्ध वर्णन आहे.**

इतिहास, पुराणवस्तुशास्त्र, भूशास्त्र, वेद-परीक्षणशास्त्र, वगैरे) विद्वानांचं जवळजवळ संपूर्ण एकमत राहिलं आहे. पण इराणी लोकांच्या सर्वात प्राचीन ग्रंथ अवेस्तामध्येसुद्धा एका सरस्वती (अवेस्ताच्या भाषेत हरख्वैती) नदीचा उल्लेख आहे, आणि ती नदी म्हणजे सध्याची अफगाणिस्तानमधली हेलमंद नदी. तर दोन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच नावाच्या दोन वेगळ्या नद्या कशा? हा प्रश्न होता. पण भारतात वैदिक आर्य बाहेरून म्हणजे पश्चिमेतून अफगाणिस्तानमार्गेच आले असा सिद्धान्त विद्वानांनी गृहीत धरलेला असल्यामुळे त्यांनी या प्रश्नाचं असं उत्तर काढलं की भारतात यायच्या आधी वैदिक आर्यांनी काही काळ अफगाणिस्तानात काढला आणि मग भारतात आल्यावर तिथल्या (सध्याच्या हेलमंद) नदीचं नाव पुन्हा भारतातल्या या (सध्याच्या घग्गर-हक्रा) नदीला दिलं असेल.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की ऋग्वेदातली सरस्वती म्हणजे सध्याची घग्गर-हक्रा नदी यात कोणालाही शंका नव्हतीच, फक्त ऋग्वेद-पूर्व काळात सरस्वती हे नाव अफगाणिस्तानमधल्या सध्याच्या हेलमंद नदीचं नाव होतं आणि अफगाणिस्तानमधल्या त्या नदीचं नाव या भारतातल्या नदीला दिलं गेलं, असा पूर्वग्रहदूषित निष्कर्ष काढला गेला होता. ऋग्वेदातली सरस्वती म्हणजेच प्रत्यक्षात अफगाणिस्तानमधली हेलमंद नदी असा निष्कर्ष कोणीही काढला नव्हता.

पण १९८०नंतर एकदम असा सर्वस्वी नवीन प्रचार सुरू केला गेला की ऋग्वेदातली सरस्वती ही घग्गर-हक्रा नदी नसून अफगाणिस्तानमधली हेलमंद नदी आहे. आणि आता सोनवणी यांनी याहीपलीकडे एक पाऊल पुढे टाकून फसवेगिरीचा आणि कुप्रचाराचा कळस गाठला आहे. ते लिहितात - 'हक्रा घग्गर-हक्रा नदी आकर्षणाचं केंद्र बनली आहे. नवीन उत्तेजित उत्साहाने काही भारतीय आणि युरोपीय विद्वानांनी घग्गर-हक्रा नदीला ऋग्वेदातल्या सरस्वती नदीशी जोडायचा प्रयत्न सुरू केला आहे. हरवलेली सरस्वती नदी आता सापडली आहे असं सांगून सार्वजनिक स्तरावर या कल्पनेचा प्रचार करण्याची सुयोजित मोहीम सुरू केली गेली आहे'. जशी ती म्हण आहे - 'चोराच्या उलट्या बोंबा'! असं धडधडीत खोटं बोलण्याची गरज कोणत्याही स्वत:च्या मतांवर खरोखर आत्मविश्वास असलेल्या माणसाला कधीच पडत नाही, हे लक्षात ठेवून सोनवणींचा हेतू कितपत शुद्ध आणि वस्तुनिष्ठ असेल आणि त्यांच्या तथाकथित निष्कर्षांवर कितपत विश्वास ठेवता येईल ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

पण या काळात असं काय घडलं की ज्यामुळे कोणालाही दीडशे वर्षांपासून एकमताने मान्य केलेल्या सर्वमान्य निष्कर्षाला आव्हान देऊन उलटं पाडण्याची आणि त्यासाठी सर्वशक्तीनिशी अशी कळकळीची मोहीम चालवायची निकडीची गरज वाटावी? कारण हा प्रश्न फक्त सोनवणींचाच नाही. हरयाणातल्या सरस्वतीला अफगाणिस्तानात ढकलण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि अखिल-भारतीय स्तरावर एक सुव्यवस्थित मोहीम मोठ्या प्रमाणात आणि जोरात चालू आहे. पण कशासाठी?

ते अशासाठी, की १९७०नंतर नवीन तंत्रवैज्ञानिक शास्त्रांचं तंत्र आणि प्रक्रिया वापरून सरस्वती नदीच्या (म्हणजेच घग्गर-हक्रा नदीच्या) पात्राच्या क्षेत्रात अनेक तपशीलवार भूशास्त्रीय अभ्यास केले गेले, ज्यातून सिद्ध झालं की ही नदी - जी ऋग्वेदातल्या वर्णनांमध्ये एक महान आणि जोरदार प्रवाहाने वाहणारी मोठी बारमाही नदी आहे - प्रत्यक्षात कोणत्या काळात कोरडी पडायला लागली आणि एक लहानशी हंगामी नदी बनली. या तपशीलवार तपासातून असा स्पष्ट निष्कर्ष निघाला की हा सुमारे इ.स.पूर्व १९००चा काळ होता. म्हणजे ऋग्वेदात ज्या सरस्वतीची वर्णनं आहेत तशी महान नदी घग्गर-हक्रा नदी इ.स.पूर्व १९००च्या पूर्वीच्या काळातच होती. पण आर्य आक्रमण सिद्धान्तानुसार त्या काळात आर्य भाषिक अजून भारतात पोहोचलेलेच नव्हते. याचा अर्थ असा होतो की आर्य आक्रमणाचा सिद्धान्त किमान या कालक्रमाच्या बाबतीत तरी चुकीचा आहे, आणि ऋग्वैदिक आर्य भाषिकांनी घग्गर-हक्राच्या काठावर ऋग्वेदाची रचना इ.स.पूर्व २०००च्या आधीच्या काळात केली. हा आर्य आक्रमण सिद्धान्ताला एक फटकाच होता.

त्याच वेळी एक दुसरा फटका बसला. उपग्रहाच्या माध्यमातून संपूर्ण घग्गर-हक्रा नदीच्या पात्राची छायाचित्रं काढली गेली, आणि त्या छायाचित्रांमधून अनेक गोष्टी सिद्ध झाल्या : घग्गर-हक्रा नदीची रुंदी फार मोठी होती (मार्गातल्या कित्येक भागांमध्ये सध्याच्या सतलज वगैरे नद्यांपेक्षाही जास्त) आणि त्या नदीच्या (सध्या कोरड्या) मार्गात नदी-पात्राच्या काठावर 'हडप्पा-मोहेंजोदारो' संस्कृतीच्या वसाहती होत्या. इतकंच नव्हे, तर सिंधू नदीच्या काठावर जितक्या वसाहती सापडल्या आहेत, त्याच्या जवळजवळ दुप्पट (किंवा जास्तच) संख्येने घग्गर-हक्रा नदीच्या काठावर वसाहती सापडल्या. त्या सगळ्या वसाहती 'हडप्पा-मोहेंजोदारो' संस्कृतीच्याच आहेत, आणि याचा अर्थ असा की 'हडप्पा-मोहंजोदारो' संस्कृतीचे लोक आणि घग्गर-हक्रा नदीच्या सुवर्ण-काळात इ.स.पूर्व २०००च्याही पूर्वी तिच्या काठावर वसणारे 'वैदिक आर्य' लोक एकच होते.

या 'डबल व्हॅमी'तून भारतातले आर्य आक्रमण सिद्धान्ताचे कट्टर समर्थक म्हणजे 'वामपंथी' बुद्धिजीवी आणि इतिहासकार आणि जातीय विचारसरणीचे राजकारणपटू सर्वप्रथम सावरले आणि या नवीन धोक्याच्या बाबतीत सावध झाले. दीडशे वर्षांपासून ज्या घग्गर-हक्रा नदी आणि वैदिक सरस्वती नदीचा तादात्म्याविषयी एकमत होतं, ते एकमत घाईघाईने मोडलं गेलं आणि ऋग्वेदातली सरस्वती म्हणजे घग्गर-हक्रा नदी नव्हे, तर प्रत्यक्षात अफगाणिस्तानमधली हेलमंद नदीच होय असा सर्वस्वी नवीन प्रचार सुरू केला. हा प्रचार-प्रवाह सुमारे १९७८ नंतर सुरू झाला.

तरी अजून पाश्चात्त्य विद्वान, इतिहासकार, इंडॉलॉजिस्ट आणि 'ॲकॅडेमिशियन' निर्धास्त आणि निश्चिंत होते, आणि घग्गर-हक्रा म्हणजेच वैदिक सरस्वती हे त्यांच्या लेखनांमध्ये अजूनही आवर्जून

मांडत होते. उदा. अमेरिकेतल्या हार्वर्ड विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख माइकल वीटझेल, जे आर्य आक्रमण सिद्धान्ताचे सर्वात कट्टर पुरस्कर्त्यांपैकी एक आहेत, त्यांच्या लेखांमधून पुन्हा पुन्हा आवर्जून आणि असंदिग्ध शब्दात लिहीत होते की घग्गर-हक्रा नदीच वैदिक सरस्वती आहे आणि ती नदी इ.स.पूर्व १९००च्या काळात कोरडी व्हायला लागली. इतकंच नव्हे, तर ते स्वत: याचा अर्थ असा लावत होते की ऋग्वेदातले या नदीला उद्देशून रचलेलं सूक्त इ.स.पूर्व १९००च्याही पूर्वीचं आहे.

हा निर्धास्तपणा कशामुळे होता, आणि तो केव्हा बदलला? निर्धास्तपणा अशामुळे होता की त्या पाश्चिमात्य विद्वानांच्या मते हे भारतातले अंतर्गत राजकीय वाद होते, जे गांभीर्याने घेण्याची काही गरज नव्हती. आर्य आक्रमण सिद्धान्ताला विरोध करणाऱ्या भारतीय लेखकांचं आणि विद्वानांचं एकच म्हणणं होतं - 'वैदिक आर्य भारताबाहेरून आले नाहीत. ते या देशातलेच स्थानीय लोक होते आणि त्यांची धर्म-संस्कृती स्थानीय धर्म-संस्कृती होती', पूर्णविराम! आर्य 'बाहेरून आले' म्हणण्यामागे पाश्चिमात्य विद्वानांच्या मनात काहीतरी तथ्य किंवा कारणं असतील आणि त्यांचा तपास करावा हे त्यांच्या मनाला पटतच नव्हतं. 'हा पाश्चिमात्य विद्वानांचा (किंवा वसाहतवाद्यांचा किंवा मिशनऱ्यांचा किंवा मॅकॉलेचा किंवा मॅक्स म्युल्लरचा) कट आहे', 'भाषाशास्त्र बनावट शास्त्र आहे', 'आमची इतिहास-परंपरा लक्षावधी वर्षांची आहे', 'भारतातल्या तथाकथित आर्य-द्रविड भाषा एकमेकांशी संबंधित आहेत, युरोपच्या भाषांशी नाहीत' वगैरे ढबदार, पोकळ किंवा पलायनवादी विधानं करून मुख्य विषयाकडे दुर्लक्ष केलं जात होतं. जणू एकमेकांशी संबंधित नसलेल्या तरी संबंधित 'वाटणाऱ्या' वेगवेगळ्या 'तथाकथित' आर्य भाषा आपोआप जगातल्या वेगवेगळ्या लगतच्या नसलेल्या प्रदेशांमध्ये स्वतंत्रपणे प्रकट झाल्या, आणि त्यांच्यात काहीही संबंध नव्हता आणि नाही, त्यामुळे कोणत्याही 'कथित' संबंधाची दखल घेण्याची गरज नाही आणि त्या विषयाची काळजीपूर्वक तपास करण्याची गरज तर नाहीच नाही! त्यामुळे जोपर्यंत आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताला विरोध करणाऱ्यांना आर्य भाषांच्या मायभूमीचा प्रामाणिक शोध घेण्याची गरज वाटत नव्हती, तोपर्यंत तरी मुख्य आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताला आणि दक्षिण रशियातल्या आर्य मायभूमीच्या सिद्धान्ताला कसलाही धोका नव्हता.

पण १९९३मध्ये माझं पहिलं पुस्तक छापून आलं, ज्यात मी या संपूर्ण प्रश्नाचा इतिहास मांडला, आर्य आक्रमणाच्या सिद्धान्ताचे सगळे प्राथमिक तर्क आणि कथित पुरावे तपासून फेटाळून लावले, आणि भारतातल्या आर्य मायभूमीच्या सिद्धान्ताची प्राथमिक रचना मांडली. २०००मध्ये छापून आलेल्या माझ्या दुसऱ्या पुस्तकात मी भाषाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र आणि मूळग्रंथ-परीक्षणशास्त्र या तीन अभ्यास-क्षेत्रांमधले निकष लावून भारतातल्या आर्य मायभूमीच्या



सिद्धान्ताला अंतिम स्वरूप दिलं. आणि शेवटी २००८ मध्ये छापून आलेल्या माझ्या तिसऱ्या पुस्तकात या सिद्धान्ताच्या समर्थनात असे काही अंतिम पुरावे दिले, ज्यांना जगातला कोणताही प्रामाणिक विद्वान आव्हान देऊ शकणार नाही.

आता मात्र पाश्चिमात्य विद्वानांना धोका समजायला लागला, आणि ऋग्वेदातल्या सरस्वतीला अफगाणिस्तानातली नदी ठरवण्याच्या मोहिमेने मागच्या २० वर्षांमध्ये सर्वत्र जोर पकडला आहे. अमेरिकेतल्या हार्वर्ड विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख माइकल वीट्झेल यांच्या मतात एकदम एक चमत्कारिक परिवर्तन झालं आहे आणि आज ते पुन्हा पुन्हा आवर्जून सांगतात की ऋग्वेदातली सरस्वती म्हणजे घग्गर-हक्रा नदी नसून हेलमंद नदी आहे, आणि त्यांच्या या नवीन विधानाला दुसरे पाश्चिमात्य विद्वान एक पुराव्यानिशी सिद्ध केलेला निष्कर्ष मानून संदर्भांची शृंखला पसरवण्याच्या कामात लागलेले आहेत. अमेरिका, युरोप आणि जपानमधूनसुद्धा विद्वानांचे तपासणी गट येऊन घाग्गर-हक्रा नदीच्या पात्र-क्षेत्राचा 'सूक्ष्म' अभ्यास करून स्पष्ट शब्दात निष्कर्ष घोषित करतात की घग्गर-हक्रा ही ऋग्वेदातली सरस्वती नव्हे!

भारतातल्या आर्य मायभूमीच्या सिद्धान्ताचे वादातीत पुरावे आम्ही या लेखाच्या शेवटच्या विभागांमध्ये देणार आहोत. इथे फक्त सरस्वती नदीचा प्रश्न तपासू या. या प्रश्नाचे दोन भाग आहेत : १. ऋग्वेदातली सरस्वती नदी ही भारतातली घग्गर-हक्रा नदी आहे की अफगाणिस्तानातली हेलमंद नदी? २. सरस्वती हे नाव आधी कोणत्या नदीचं होतं? घग्गर-हक्रा नदीचं की हेलमंद नदीचं?

ऋग्वेदातली सरस्वती नदी ही भारतातली घग्गर-हक्रा नदी आहे की अफगाणिस्तानातली हेलमंद नदी?

१. ऋग्वेदातल्या प्रसिद्ध नदी-सूक्तात, म्हणजे ऋग १०.७५मध्ये, ऋग्वेदातल्या सगळ्या प्रमुख नद्यांची स्तुती आहे. या सूक्तात त्या नद्यांची नोंद पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे, याची आजपर्यंत कोणीही शंका व्यक्त केलेली नाही. त्यात पाचव्या मंत्राच्या पहिल्या ओळीत गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्री, परुष्णी अशी नोंद आहे, आणि दुसऱ्या ओळीत असिक्नी, मरुद्वृधा, वितस्ता, आर्जीकीया, सुषोमा. सहाव्या मंत्राच्या पहिल्या ओळीत तृष्टामा, रसा, सुसर्तु, श्वेत्या, आणि दुसऱ्या ओळीत कुभा, सिंधू, मेहत्नू, क्रुमू आणि गोमती. या सूक्तात सरस्वती नदी ही पूर्वेत आहे, आणि यमुना आणि शुतुद्री (सध्याची सतलज) यांच्या मध्येत आहे, या बाबतीत आजवर वाद झालेला नाही. (अर्थात, हट्टाने ऋग्वेदातल्या अन्य भागांमध्ये कुठेतरी असलेला सरस्वती नदीचा कोणता न कोणतातरी उल्लेख अफगाणिस्तानच्या नदीचा असेल, अशी आशावादी सूचना करणारे विद्वानही आहेत.)

(सोनवणी या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे नोंदलेल्या आहेत ही गोष्ट नाकारतात, त्यापैकी कित्येक नद्यांच्या सर्वमान्य ओळखी नाकारतात. रसाला इराकची तिग्रीस नदी ठरवतात, या सूक्तामधल्या गंगा आणि यमुना या भारतातल्या सर्वपरिचित गंगा आणि यमुना नसून अफगाणिस्तानमधल्याच दुसऱ्या कोणत्यातरी अज्ञात नद्या असतील अशी शक्यतासुद्धा हवेत सोडतात. आणि एकूण या सूक्तामधली सरस्वती अफगाणिस्तानातली सरस्वती आहे असं ठाम मत व्यक्त करून आपण काहीतरी नवीन गोष्ट 'सिद्ध' करून बौद्धिक पराक्रम केल्याच्या भावनेने स्वत:ची पाठ थोपटून घेतात!)

२. ऋग्वेदातली सरस्वती नदी ही कधीही भारतीय परंपरेला गूढ गोष्ट नव्हती. ऋग्वेदात या नदीच्या भौगोलिक परिस्थितीच्या वर्णनात तिच्या दोन उपनद्या आपया आणि दृषद्वती आणि तिच्या काठावर असलेलं मानुष सरोवर आणि इळास्पद नावाचं तीर्थक्षेत्र यांचे उल्लेख आहेत. आणि महाभारतातल्या वन-पर्वातल्या तीर्थयात्रा-पर्वात १७८ कडव्यांच्या एका आख्ख्या भागात पांडवांनी हरयाणातल्या कुरुक्षेत्राच्या भूमीत केलेल्या तीर्थयात्रेचं तपशीलवार वर्णन आहे, ज्यात अन्य स्थानांसह सरस्वती, आपया, दृषद्वती, मानुष आणि इळास्पद या स्थानांचंही असंदिग्ध वर्णन आहे.

तसंच ही हरयाणातून वाहणारी सरस्वती प्राचीन काळातली सर्वात मोठी, जोरदार आणि भरभराटीची बारमाही नदी होती, जी कालांतराने एक लहान आणि हंगामी नदी झाली, ही वस्तुस्थिती संपूर्ण वैदिक आणि पौराणिक साहित्य-परंपरेला ज्ञात आहे. आणि तिचा हा भरभराटीच्या बारमाही नदीपासूनचा लहान हंगामी नदीपर्यंतचा प्रवास या साहित्यामध्ये नोंदलेला आहे. ऋग्वेदाच्या जुन्या मंडलांमध्ये सरस्वतीच्या भरभराटीची असंख्य सुंदर वर्णनं आहेत आणि ही निर्विवादपणे ऋग्वेदातली सर्वात महत्त्वाची नदी आहे. पण ऋग्वेदाच्या शेवटच्या (दहाव्या) मंडलात सिंधू नदी हळूहळू जास्त महत्त्वाची होताना दिसते. नंतरच्या पंचविंश ब्राह्मण या वैदिक ग्रंथात सरस्वती नदी (राजस्थानमधल्या) विनशन या ठिकाणी 'लुप्त' झाल्याची नोंद आहे. नंतर, भागवत पुराण या ग्रंथात विनशन उत्तरेला सरकत जाऊन कुरुक्षेत्राजवळपर्यंत पोहोचल्याचा उल्लेख आहे. हे सगळे उल्लेख स्पष्टपणे या सरस्वती नदीच्या उतारवयाच्या प्रवासाचं वर्णन करतात. महाभारतात श्रीकृष्णाचे बंधू बलराम यांनी केलेल्या सरस्वती नदीच्या मार्गावरच्या तीर्थयात्रेच्या ठिकाणांमध्ये या विनशनाचाही उल्लेख आहे, आणि त्या काळात ही नदी पुन्हा पुन्हा प्रकट आणि लुप्त होत राहणारी नदी असं वर्णन (लोमश ऋषींच्या तोंडी) आढळतं. ही वर नोंदलेली सगळी ठिकाणं हरयाणातली आहेत आणि अफगाणिस्तानातली नाहीत, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

३. ऋग्वेदाचे दहा विभाग आहेत, ज्यांना मंडल म्हणतात (आणि या दहा मंडलांमध्ये १०२८ सूक्तं आहेत, ज्यात १०५५२ मंत्र किंवा ऋच किंवा कडवी आहेत.) पाश्चिमात्य वैदिक विद्वानांनी अनेक अचूक निकष लावून, या दहा मंडलांचं 'जुने आणि नवीन' म्हणून वर्गीकरण केलं आहे. मंडल २, ३, ४, ६, ७ ही जुनी मंडलं आहेत आणि १, ५, ८, ९, १० ही नवीन मंडलं आहेत. (प्राचीन भारताच्या आणि वैदिक इतिहासाच्या अन्वेषण-संशोधनाच्या दृष्टीने हे वर्गीकरण अति-महत्त्वाचं आहे.) त्या जुन्या मंडलांपैकी ६, ३, ७ हे क्रमश: सर्वात जुने आहेत.

ऋग्वेदात सरस्वती नदीच्या स्तुतीतली तिन्ही सूक्त (६.६१,

७.९५, ९६) आणि सरस्वतीच्या प्रवाहाच्या भरभराटीची सगळी वर्णनं या सर्वात जुन्या तीन मंडलांमध्येच आढळतात - ३.४.८, २३.४, ६.५२.६, ६१.२.७.८.११.१३, ७.२.८, ३६.६, ९५.१.२, ९६.१.२.६. (जुनं मंडल २ यात २.४१.१६मध्ये सरस्वती ही नद्यांमध्ये आणि देवींमध्ये सर्वश्रेष्ठ असल्याचा सुप्रसिद्ध उल्लेख आहे.) नवीन मंडलांच्या काळापर्यंत नदीच्या प्रवाहाची भरभराट कमी होत चालली, आणि 'एक महान देवी' (किंबहुना नदीची देवी) म्हणूनच आता सरस्वतीचे बहुतेक सगळे उल्लेख आहेत. (इथे प्रवाहाच्या भरभराटीचा उल्लेख फक्त एका ठिकाणी आहे, ऋग १.३.१२मध्ये; पण जसं मी माझ्या पुस्तकांमध्ये नोंद घेतली आहे, ऋग्वेदातली पहिल्या मंडलातली पहिली ११ सूक्तं तिसऱ्या मंडलातून राहून गेलेली सूक्तं आहेत.) या नवीन मंडलांमध्ये बदलत्या परिस्थितीचे अनेक संकेत आहेत : १. नवीन मंडलांमध्ये सरस्वतीच्या तुलनेत सिंधू नदीचं महत्त्व वाढत जाणं. २. सरस्वतीचा संबंध १०.१७.७-९मध्ये पूर्वजांशी लावला जाणं. ३. १.१६४.५२मध्ये सरस्वतीच्या पाण्याचा संबंध (७.९५.२मध्ये लावल्याप्रमाणे) पर्वतांशी न लावता हंगामी पावसाशी लावणं, वगैरे.

या सर्वात जुन्या तीन मंडलांचं भौगोलिक चित्र अगदी स्पष्ट आहे : १. इथे पूर्वेकडच्या सगळ्या नद्यांचे उल्लेख आहेत (गंगा/जह्नावी, यमुना, दृषद्वती/हरियूपिया/यव्यावती, आपया, सरस्वती, शुतुद्री, विपाश, परुष्णी, असिक्नी), पण पश्चिमेकडच्या नद्यांचे उल्लेख नाहीत (मरुद्वृधा, वितस्ता, आर्जीकीया, सुषोमा, सिंधू आणि तिच्या पश्चिमेकडून अफगाणिस्तानमधून वाहणाऱ्या उपनद्या तृष्टामा, सुसर्तु, अनितभा, रसा, श्वेती, स्वेत्यावरी, कुभा, क्रुमू, गोमती, सरयू, मेहत्नू, प्रयियू, वयियू, सुवास्तु, गौरी, कुषवा). २. इथे पूर्वेकडच्या ठिकाणांचे उल्लेख आहेत (कीकट, इळास्पद), पण पश्चिमेकडच्या ठिकाणांचे उल्लेख नाहीत (गंधारि, सप्तसिंधव). ३. इथे पूर्वेकडच्या सरोवराचा (मानुषचा) उल्लेख आहे, पण पश्चिमेकडच्या सरोवराचा आणि पर्वतांचा (शर्यणावती, मूजवत, सुषोम, आर्जीक) उल्लेख नाही. ४. इथे पूर्वेकडच्या प्राण्यांचे (हत्ती, मोर, जंगली म्हैस, गौर, चितळमृग) उल्लेख आहेत, पण पश्चिमेकडच्या प्राण्यांचे (उंट, वराह, मथ्र, छाग, वृष्णी, उरा, मेष) उल्लेख नाहीत. या भौगोलिक परिस्थितीतून वाहणारी सरस्वती नदी हरयाणातली असेल की अफगाणिस्तानातली हे सांगायची गरज नाही.

या सगळ्या भरभक्कम आणि वादातीत पुराव्यासमोर कोणीही शुद्धीवर असलेला अभ्यासक ऋग्वेदातली सरस्वती अफगाणिस्तानातली हेलमंद नदी आहे असं म्हणू शकत नाही. (संजय सोनवणींच्या पुस्तकाचा आणि त्यात मांडलेल्या सिद्धान्ताचा संपूर्ण भार या एका मुद्द्यावर आहे की ऋग्वेदातली सरस्वती नदी ही भारतातली घग्गर-हक्रा नदी नसून अफगाणिस्तानातली हेलमंद नदी आहे, त्यावरून त्यांच्या विद्वत्तेचा अंदाज लागावा.)

आता दुसऱ्या प्रश्नाकडे वळू या.



सरस्वती हे नाव आधी कोणत्या नदीचं होतं : घग्गर-हक्रा नदीचं की हेलमंद नदीचं?


१. किमान भाषाशास्त्राच्या दृष्टीने (मूळ 'स' अक्षराचा नंतर 'ह' होतो, मूळ 'स्व' अक्षराचा नंतर 'ख्व' होतो, वगैरे नियमांनुसार) ऋग्वेदातलं सरस्वती हे आधीचं मूळ नाव आहे आणि अवेस्तामधलं हरख्वैती हे नंतरचं नाव आहे, हे सगळेच विद्वान मान्य करतात.

२. ऋग्वेदात सरस्वतीचा उल्लेख आणि अवेस्तामध्ये हरख्वैतीचा उल्लेख यांपैकी कोणता उल्लेख आधीचा आहे, हे समजण्यासाठी या दोन ग्रंथांच्या वेगवेगल्या विभागांच्या कालखंडांचा सापेक्ष कालक्रम काय आहे, हे पाहावं लागेल. तो असा आहे -

कालखंड १ : ऋग्वेदातली जुनी मंडलं २, ३, ४, ६, ७. यात मंडलं ६, ३, ७ ही क्रमश: सर्वात जुनी.

कालखंड २ : ऋग्वेदातली नवीन मंडलं १, ५, ८, ९, १०. यात मंडल १० आणि त्याबरोबर मंडल १चे काही भाग सर्वात नवीन.

कालखंड ३ : अवेस्ताचा सर्वात जुना भाग गाथा. गाथांची भाषा बाकी अवेस्ताच्या भाषेपेक्षा थोडीशी वेगळी आणि प्राचीन आहे. (गाथांना तिसऱ्या कालखंडात घालण्याचं कारण संपूर्ण अवेस्ता ग्रंथ ऋग्वेदातल्या सर्वात नवीन भागांचा समकालीन आहे, हे मी माझ्या पुस्तकांमध्ये संपूर्ण वादातीत पुराव्यांनिशी सिद्ध केलं आहे. इथे उदाहरण म्हणून त्या पुराव्यांमधला एकच शब्द पाहू या : 'यम' हे वैदिक आणि भारतीय परंपरेतलं एक फार महत्त्वाचं व्यक्तिमत्त्व आहे, पण प्रत्यक्षात ऋग्वेदात यम नवीन मंडलांमधल्या सर्वात नवीन भागात (मंडल १० आणि त्याबरोबर मंडल १च्या काही भागांमध्ये) पहिल्यांदा येतो. पण गाथांमध्ये गाथांचे रचयिते झरथुष्ट्र यमाचा आपल्या पूर्वजांमध्ये उल्लेख करतात.)




कालखंड ४ : यात अवेस्ताचे नवीन भाग (यस्न, यश्त, विदेवदाद, वगैरे). यांमध्ये वेन्दिदाद/ विदेवदाद सर्वात नवीन भागांपैकी एक.

ऋग्वेदात सरस्वतीचे प्रमुख उल्लेख सर्वात जुन्या मंडलांमध्ये (म्हणजे पहिल्या कालखंडाच्या सुरुवातीला) आहेत, आणि अवेस्तामध्ये हरख्वैतीचा एकमेव उल्लेख वेन्दिदादमध्ये (म्हणजे चौथ्या कालखंडाच्या शेवटी) आहे.

३. ऋग्वेदातली 'सरस्वती' वरील दोन्ही (भाषेच्या आणि उल्लेखांच्या कालक्रमाच्या) निकषांवरून आधीची ठरते, तरी अवेस्तात उल्लेख असलेल्या (सध्याच्या हेलमंद) नदीला हे नाव आधी पडलं होतं, आणि मग त्या नावावरून ऋग्वेदात असलेल्या (सध्याच्या घग्गर-हक्रा) नदीला हे नाव दिलं गेलं, हे ठरवण्यामागे केवळ पूर्वग्रह आहे हे स्पष्ट आहे. आर्य आक्रमणाच्या सिद्धान्तानुसार वैदिक आर्य आधी अफगाणिस्तानात वसले होते आणि नंतर तिथून पूर्वेकडे स्थलांतर करून भारतात आले, हा तो पूर्वग्रह. हा एक वर्तुळाकार युक्तिवाद आहे - आर्य अफगाणिस्तानातून भारतात आले, याचा पुरावा तिथल्या नदीचं नाव इथल्या नदीला दिलं गेलं होतं, आणि तिथल्या नदीचं नाव इथल्या नदीला दिलं गेलं याचा पुरावा आर्य अफगाणिस्तानातून भारतात आले होते!

पण याचा कुठेही पुरावा नाही की वैदिक आर्य कधीच अफगाणिस्तानात वसले होते. ऋग्वेदातल्या भौगोलिक माहितीच्या पुराव्यांनुसार ऋग्वेदातल्या जुन्या मंडलांमध्ये फक्त पूर्वेकडचे भौगोलिक तपशील आहेत (हे आपण वर पाहिलंच आहे), आणि पश्चिमेकडचे भौगोलिक तपशील फक्त नवीन मंडलांमध्ये पहिल्यांदा येतात. यातून ऋग्वैदिक आर्यांचा प्रवास पूर्वेकडून पश्चिमेकडे होता हा एकच निष्कर्ष निघू शकतो.

इतकंच नव्हे, तर सर्वात जुन्या (६, ३, ७) मंडलांमधल्या भौगोलिक तपशिलांवरूनच नव्हे, तर त्या मंडलांमध्ये नोंद असलेल्या स्पष्ट ऐतिहासिक वृत्तान्तांवरून हा ऋग्वैदिक आर्यांचा पूर्वेकडून पश्चिमेकडचा प्रवास पुराव्यांनिशी सिद्ध होतो - १. ६.४५.३१मध्ये गंगेच्या काठावरच्या गवताच्या उंचीचा उल्लेख एका उपमेमध्ये केला आहे, आणि ३.५८.६मध्ये जह्नावी (जाह्नवी/ गंगे)च्या काठाला अश्विनीकुमारांची प्राचीन मायभूमी म्हटली आहे. २. ३.२३.३-४मध्ये भरतवंशाच्या देववात या राजाने त्या सूक्ताच्याही फार पूर्वीच्या काळात सरस्वतीच्या पूर्व काठावर (हरयाणात) इळास्पद या ठिकाणी अनंत-अग्नी स्थापित केल्याचा उल्लेख आहे. ३. ३.५३.११मध्ये वरील देववात राजाचा फार नंतरचा वंशज राजा सुदास् आपलं राज्य चहू बाजूंनी वाढवण्यासाठी लष्करी मोहीम त्याच ठिकाणाहून सुरू करतो. इथपर्यंत वैदिक आर्यांची वसती सरस्वती नदीच्या काठाभोवतीच आहे, पण ३.३३मध्ये सुदास् पश्चिमेकडे वळून आपले सैनिक घेऊन विपाश आणि शुतुद्री नद्या पार करतो. ४. नंतर ७.१८मध्ये सुदास् पश्चिमेकडे आणखी पुढे प्रगती करून परुष्णीच्या काठावर परुष्णी आणि असिक्नी (७.५.३)च्या पलीकडच्या दहा राजांच्या युतीशी युद्ध करून त्या क्षेत्रावर आपलं वर्चस्व स्थापित करतो. तरी अजून या तीन सर्वात जुन्या मंडलांमध्ये वैदिक आर्य पूर्वेकडून पश्चिमेकडच्या आपल्या प्रवासात सिंधू नदी किंवा अफगाणिस्तानपर्यंतसुद्धा पोहोचलेले नाहीत.

वैदिक आर्य कधीही अफगणिस्तानात वसले होते याचा कुठेही

पुरावा नाही. पण इराणी आर्य मात्र सुरुवातीला (वैदिक आर्यांप्रमाणे) सर्वात जुन्या मंडलांच्या काळात पूर्वेला वसले होते आणि त्यांनी पूर्वेकडून (घग्गर-हक्राच्या परिसरातून) पश्चिमेकडे (हेलमंदच्या परिसरात) प्रवास केला, याचा भरभक्कम पुरावा ऋग्वेदात आहे. १. ६.२७मध्ये सरस्वती नदीच्या पूर्वेला घडलेल्या एका युद्धात अनु (इराणी) पार्थव वंशाचा राजा अभ्यावर्तिन चायमान हा भरतवंशाच्या राजा सृञ्जयाचा मित्र आहे. २. पण नंतर हे इराणी लोक सरस्वतीच्या पश्चिमेला पसरून (पंजाब क्षेत्राच्या मध्यभागी) परुष्णी (सध्याच्या रावी) नदीच्या परिसरात वसलेले आढळतात. सृञ्जयच्या वंशज राजा सुदासूच्या काळात सुदासूच परुष्णीच्या काठावर दहा राजांच्या युतीशी झालेल्या विख्यात युद्धात शत्रू-युतीचा प्रमुख होता. अभ्यावर्तिन चायमानचा वंशज अनु (इराणी) पार्थव वंशाचा राजा कवी चायमान (७.३३). नंतरच्या काळात पश्चिमेला राहणाऱ्या सगळ्या प्रमुख इराणी जमातींचे पूर्वज त्या युद्धात त्यांची परुष्णीच्या काठावरची भूमी सुदासूच्या हातात गेली (७.१८.१३) आणि ते हळूहळू पश्चिमेला पसरले (७.६.३). ३. अवेस्ताच्या काळात हे इराणी लोक अफगाणिस्तानात वसले होते, ही वस्तुस्थिती अवेस्ताच्या भौगोलिक तपशिलांवरून सर्वमान्य आहे. तेव्हा ऋग्वेदातल्या कवी चायमान या राजापासून सुरू झालेला कव्यान राजवंश तिथे राज्य करीत होता. झरथुष्ट्रांच्या काळात त्यांचा राजा विश्तास्प हा त्याच राजवंशाचा होता. (त्यानंतरच्या काळात हे इराणी लोक मध्य आशियात आणि सध्याच्या इराणात पसरले. आणि त्याहूनही नंतरच्या काळात आणखी बरेच पुढे पसरले. दक्षिण-पूर्व युरोपमधले सर्ब-क्रोट लोकसुद्धा मुळात इराणी वंशाचे होते, असं सिद्ध झालं आहे.)

या सगळ्या भरभक्कम आणि खरोखर वादातीत पुराव्यांनंतर घग्गर-हक्रा नदीच ऋग्वेदातील सरस्वती आहे आणि तिचंच सरस्वती हे नाव प्राचीन काळात अफगाणिस्तानातल्या सध्याच्या हेलमंद नदीला पडलं, यावर शंका घेणाऱ्यांच्या बुद्धीची महती आम्ही काय सांगावी? संजय सोनवणींच्या पुस्तकात मांडलेला संपूर्ण सिद्धान्त पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोसळतो, हे त्यांनी प्रामाणिकपणे मान्य करावं आणि केवळ राजकीय पूर्वग्रहांच्या पायावर इतिहासाची इमारत रचण्याचा अट्टाहास त्यांनी सोडून द्यावा.

सरस्वतीचा प्रश्न राहिला नाही. पण मुख्य मुद्दा तसाच राहतो - आर्य भाषांचं मूळ उगमस्थान नेमकं कुठे होतं? म्हणजे आर्य भाषांची मायभूमी कोठे होती, जिथून सगळ्या आर्य भाषा जगभर पसरल्या? या प्रश्नाचं स्पष्ट उत्तर आहे - उत्तर भारतात होती. या बाबतीत भरभक्कम आणि स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत, ते मी माझ्या तीन पुस्तकांमधून मांडलेले आहेत आणि त्या पुराव्यांना कोणीही आव्हान देऊ शकत नाही. ते तीन प्रकारचे पुरावे या लेखमालेच्या पुढच्या भागांमध्ये पाहू.

**- sgtalageri@gmail.com**




उत्खनन

श्रीकांत गंगाधर तलगेरी

# आर्य भाषांची मायभूमी भारतात आहे

## (भाग - ६) - ऋग्वेदाचा कालखंड



जगात चार स्वतंत्र महासंस्कृती सर्वात प्राचीन मानल्या जातात - सुमेर, इजिप्त, चीन आणि भारत या त्या चार महासंस्कृती. पण जिथे एका बाजूला आम्ही भारताचे लोक अभिमानाने सांगत असतो की आपली भारतीय संस्कृती जगातली अशी एकमेव संस्कृती आहे जी प्राचीन काळापासून आजपर्यंत निरंतर वारसा घेऊन अविरतपणे चाललेली संस्कृती आहे, जिचा इतिहास एक अखंडित आणि निरंतर इतिहास आहे, तिथे दुसऱ्या बाजूला जगातलीच नव्हे तर आमच्या भारतातलीसुद्धा इतिहासाची पुस्तकं एक वेगळीच गोष्ट सांगतात. त्या पुस्तकांनुसार आमच्या प्राचीन देशात दोन स्वतंत्र आणि एकमेकांशी संबंध नसलेल्या संस्कृती होत्या. पहिली संस्कृती म्हणजे 'हडप्पा-मोहेंजोदारो'ची अद्याप अज्ञात लोकांची प्राचीन संस्कृती जी स्थूलमानाने इ.स.पूर्व ४०००पासून इ.स.पूर्व १७००पर्यंत या देशात समृद्ध होती आणि नंतर ऱ्हास पावली; आणि दुसरी संस्कृती सुमारे इ.स.पूर्व १५००मध्ये भारतात बाहेरून आलेल्या 'आर्य' नावाच्या एका जमातीने आणलेली आणि मग भारतात विकसित झालेली वैदिक संस्कृती जी आजच्या या देशाच्या हिंदू संस्कृतीची जननी आहे आणि जी सामान्यत: प्राचीन काळापासून (म्हणजे सुमारे इ.स.पूर्व ६००पासून) जगाच्या नजरेत भारतीय संस्कृती म्हणून ओळखली जाते.

म्हणजे या शिकवल्या जाणाऱ्या इतिहासानुसार जिथे सुमेर, इजिप्त आणि चीनच्या संस्कृती इ.स.पूर्व ३०००च्याही मागे जातात, तर आपली सध्याची ही संस्कृती- जिला आम्ही प्राचीन म्हणून मिरवतो- ती प्रत्यक्षात फक्त सुमारे इ.स.पूर्व १०००च्या नंतर जन्मलेली संस्कृती आहे. अर्थात आम्ही हडप्पा-मोहेंजोदारोच्या संस्कृतीलाही आपली म्हणू शकतो आणि म्हणतो, पण ती 'आपली' आहे तो फक्त एक भौगोलिक अपघात म्हणून. त्या संस्कृतीचा आणि आपल्या सध्याच्या 'भारतीय' किंवा 'हिंदू' संस्कृतीचा भूगोल सोडला तर तसा काही संबंध नाही!

पण हे सगळं कोणी आणि कसं ठरवलं? कोणत्याही संस्कृतीच्या इतिहासाचे प्रत्यक्ष कालखंड कसे ठरवले जातात?

कोणत्याही संस्कृतीत त्यांचे शिलालेख, दस्तावेज किंवा कोणतेतरी भौतिक पुरावे असतात, ज्यांमधून हे कालखंड ठरवले

जातात. कोणतंतरी शक (विक्रम शक, ख्रिस्ती शक, वगैरे) औपचारिकपणे प्रचलित झाल्यानंतर शिलालेखांमध्ये आणि दस्तावेजांमध्ये त्या शकानुसार तारखा नोंदलेल्या असतात. उदाहरणार्थ, आता ख्रिस्ती शकानुसार सन २०१६ चालू आहे. जर कोणत्याही (ख्रिस्ती शकानुसार तारखा नोंदणाऱ्या संस्कृतीच्या) शिलालेखात सन १२१५ नोंदलेलं असेल, तर तो शिलालेख आणि त्यात नोंदलेल्या घटना किंवा त्यात नोंदलेल्या व्यक्ती ८०० वर्षांपूर्वीच्या आहेत ही गोष्ट समजता येते.

पण ज्या प्राचीन काळात अशी शकं प्रचलित नव्हती, तेव्हा त्या शिलालेखाचा किंवा दस्तावेजाचा कालखंड कसा ठरवायचा? कार्बन डेटिंग किंवा थर्मोल्यूमिनसन्स डेटिंग यासारख्या शास्त्रीय प्रक्रिया वापरून शिलालेखांसारख्या भौतिक वस्तूंच्या तारखा स्थूलपणे काढल्या जाऊ शकतात.

*ऋग्वेदाचा काळ कोणता? याबाबत सरस्वती नदीच्या शोधाबरोबरच जी संशोधनात्मक चर्चा चालू झाली आहे, तीही महत्त्वाची आहे. सुमेर, इजिप्त, चीन आणि भारत या चार प्राचीन संस्कृती मानल्या जातात. सुमेर, इजिप्त आणि चीनच्या संस्कृतींना पाच हजार वर्षांचा इतिहास आणि आपल्या संस्कृतीला मात्र केवळ तीन हजार वर्षांचा इतिहास आहे, असं सांगितलं जातं. तीन हजार वर्षांपूर्वीचे अवशेष असतील, तर आर्येतर संस्कृतीचे अवशेष आहे असं प्रतिपादन केलं जातं. ऋग्वेदाच्या कालखंडाबाबत जे नवे पुरावे समोर येत आहे, त्याचा विचार करता जेव्हा सुमेर, चीन आणि इजिप्त कालखंड सुरू झाला, त्या वेळी ऋग्वेदकालीन संस्कृती भाषाशास्त्राच्या दृष्टीने विकसित झालेली होती. या लेखमालेत या सर्व संशोधनाचा आढावा घेतलेला आहे.*

अर्थात यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत. एक तर त्या काळातले लेखी शिलालेख असलेल्या भौतिक वस्तू उपलब्ध असाव्या लागतात, आणि मग ते शिलालेख अशा ओळखीच्या भाषेतले असावे लागतात ज्या आज वाचल्या आणि समजल्या जाऊ शकतात. भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात दुर्दैवाची गोष्ट हीच की सुमारे इ.स.पूर्व ३५०च्या जवळपासच्या सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या पूर्वीच्या काळातला, वाचला आणि समजला जाण्यासारखा एकही शिलालेख किंवा दस्तावेज भारतात उपलब्ध नाही. आधी तर शिलालेखच उपलब्ध नव्हते. हडप्पा-मोहेंजोदारो संस्कृतीशी संबंधित पुराणवस्तुशास्त्राचे अवशेष सापडल्यानंतर आता एक प्रकारचे शिलालेख उपलब्ध आहेत (हजारोंच्या संख्येत चिकणमातीचे सील, ज्यांवर छोटे छोटे शिलालेख खोदले किंवा कोरले गेले आहेत), पण त्या एका अद्याप अज्ञात लिपीत आहेत त्यामुळे वाचले जाऊ शकत नाहीत, आणि त्या शिलालेखांमध्ये कोणती भाषा लिहिलेली आहे हे निश्चितपणे सांगणं अशक्य आहे.

आर्य आक्रमण सिद्धान्तानुसार आधीच ठरलं होतं की 'आर्य' या देशात इ.स.पूर्व १५००च्या नंतर आले, त्यामुळे त्या सिद्धान्तानुसार या आधीची संस्कृती पुराणवस्तुशास्त्राला सापडली असेल तर ती निश्चितच आर्येतर संस्कृती असेल हा त्यातून आपोआप निघणारा निष्कर्ष आहे (मग ती द्रविड, ऑस्ट्रिक, सेमिटिक किंवा दुसरी कोणतीही अज्ञात भाषा बोलणाऱ्यांची असेल). आर्य आक्रमण सिद्धान्ताचे समर्थक सांगतात की हडप्पा-मोहेंजोदारोची भाषा एक आर्येतर भाषा आहे, त्याचे विरोधक सांगतात ती (वैदिक किंवा त्याच्याशी संबंधित) आर्य भाषा आहे.


त्यामुळे भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात सुमारे इ.स.पूर्व ६००च्या पूर्वीचा काळ एका अर्थाने एक 'ग्रे एरिया' आहे. 'हडप्पा-मोहेंजोदारो' संस्कृती आर्य भाषिक होती की आर्येतर भाषिक यावर भारताचाच नव्हे, तर सगळ्या आर्य भाषिक जगाचा प्राचीन इतिहास अवलंबून आहे. पण यावर तोडगा काय? हडप्पा-मोहेंजोदारोच्या लिपीचं कोडं सोडवून कोणीतरी ते शिलालेख वाचून त्यातल्या भाषेची ओळख काढेपर्यंत हा प्रश्न तसाच अनुत्तरित राहणार आहे का?

या सगळ्या कोड्याची किल्ली एका ग्रंथाच्या अभ्यासात आहे. तो ग्रंथ म्हणजे ऋग्वेद. ऋग्वेदाच्या रचनेचा कालखंड इ.स.पूर्व १५०० ते १२०० असा ठरवला गेला आहे. हा ठरवलेला कालखंड बरोबर आहे की नाही यावर संपूर्ण इतिहास अवलंबून आहे.

**आर्य आक्रमण सिद्धान्तानुसार ठरवलेला ऋग्वेदाचा कालखंड**

तो कालखंड कसा ठरवला गेला, याची पार्श्वभूमी यापूर्वी या लेखाच्या पूर्वार्धात स्पष्ट केलेलीच आहे, ती परत पाहू या. भाषाशास्त्राच्या स्पष्ट पुराव्यांनुसार आर्य भाषांच्या बारा प्रमुख बोली बोलणारे लोक इ.स.पूर्व ३२०० ते ३०००च्या सुमारास त्यांच्या मायभूमीतून बाहेर पडायला लागले (मग ती मायभूमी जिथे कुठे असेल तिथून). मायभूमी सोडून जाण्याच्या आणि एकमेकांपासून टप्प्याटप्प्याने वेगळं होण्याच्या या प्रक्रियेत पाच प्रमुख बोली बोलणारे लोक शेवटच्या टप्प्यापर्यंत मायभूमीत एकत्र होते, त्यापैकी इंडो-आर्यन (भारतीय आर्य) आणि इराणियन बोलणारेही होते. म्हणजे मायभूमीतून (जर ती मायभूमी दक्षिण रशियात आहे असं आम्ही धरून चाललो तर) या दोन बोली

बोलणारे लोक इ.स.पूर्व ३०००च्याही थोडं नंतरच बाहेर पडले. मग, यापूर्वी सांगितल्याप्रमाणे या दोन बोली बोलणारे ‘आर्य’ हळूहळू आणि वाटेत वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये शेकडो वर्षं वसाहत करत करत मध्य आशियात पोहोचले आणि तिथे स्थायी असलेल्या (अज्ञात) संस्कृतीच्या प्रदेशात काही काळ स्वत: स्थायी झाले. नंतर तिथून एकमेकांपासून वेगळे होऊन इंडो-आर्यन बोली बोलणाऱ्या ‘आर्यांनी’ दक्षिण-पूर्व दिशेला असलेल्या भारतात (म्हणजे सध्याच्या उत्तर पाकिस्तानात) आणि इराणियन बोली बोलणाऱ्या ‘आर्यांनी’ दक्षिण-पश्चिम दिशेला असलेल्या अफगाणिस्तानात प्रवेश केला, त्या ठिकाणी काही काळानंतर अनुक्रमे ऋग्वेद आणि अवेस्ता या ग्रंथांची रचना केली (आणि अर्थात नंतरच्या काळात,



या मूळ इंडो-आर्यन आणि इराणियन बोली अनुक्रमे पूर्वेकडे बाकी उत्तर भारतात आणि पश्चिमेकडे इराणमध्ये पसरत गेल्या आणि त्यांच्यातून वेगवेगळ्या बोली निर्माण होत गेल्या). पण सध्याच्या उत्तर पाकिस्तानच्या क्षेत्रात प्रवेश करताच ऋग्वेदाची रचना झाली नाही, कारण त्या ग्रंथात कुठेही त्याचे रचयिते बाहेरून आल्याची जाणीव दाखवत नाहीत आणि उलट त्या क्षेत्रालाच आपली मायभूमी असल्याच्या भावना त्यांच्या सूक्तांमधून दिसून येतात. तर ऋग्वेदाच्या रचनेचा काळ या सगळ्या घटनांना आणि वस्तुस्थितींना सामावून घेऊन ठरवला गेला, तर तो काळ इ.स.पूर्व १०००च्याही कितीतरी नंतरचा ठरला पाहिजे.

पण हा झाला फक्त इ.स.पूर्व ३०००च्याही नंतर मायभूमीतून निघाल्या क्षणापासूनचा उत्तर-पश्चिम भारतात (सध्याच्या उत्तर पाकिस्तानच्या क्षेत्रात) प्रवेश करून ऋग्वेदाची रचना पूर्ण करेपर्यंतचा पुढे येण्याचा प्रवास. पण अनुमान लावण्याच्या या प्रक्रियेत नोंदीकृत इतिहासाच्या पहिल्या क्षणापासून मागे जाण्याचा प्रवाससुद्धा या कथित घटनाक्रमात बसवला पाहिजे!

आता पाहू या इ.स.पूर्व ३५०च्या अशोकाच्या शिलालेखांच्या काळापासून मागे जाण्याचा प्रवास. अशोकाच्या शिलालेखांच्या सुमारे २५०-३०० वर्षांपूर्वी गौतम बुद्धांचा काळ होता. त्या काळाच्या पूर्वी वैदिक वाङ्मयाचा प्रदीर्घ काळ - या काळाच्या अंतर्गत शेवटी होता वैदिक सूत्रांचा काळ, त्यापूर्वी उपनिषदांचा काळ, त्यापूर्वी ब्राह्मणग्रंथाचा काळ (लक्षात असावं, इथे ब्राह्मण हे एका वैदिक ग्रंथांच्या वर्गाचं नाव आहे), त्यापूर्वी अथर्ववेदाचा काळ, त्यापूर्वी यजुर्वेदाचा काळ ‘आणि सामवेदाचा. पण सामवेद हा ग्रंथ वस्तुत: एक स्वतंत्र ग्रंथ नाही. त्यातला जवळजवळ संपूर्ण भाग ऋग्वेदातल्या उताऱ्यांनी भरलेला आहे.) सर्वात जुना काळ हा ऋग्वेदाचा काळ, जो ग्रंथाच्या अंतर्गत पुराव्यांनुसार किमान काही शतकांचा तरी काळ आहे. हे सगळे काळ लक्षात घेता ऋग्वेदाच्या रचनेचा काळ इ.स.पूर्व १०००च्याही कितीतरी आधीचा ठरला पाहिजे.

दोन्ही बाजूंनी प्रवास करून (म्हणजे इ.स.पूर्व ३०००पासून पुढे आणि इ.स.पूर्व ३५०पासून मागे) सगळे घटनाक्रम पिळून दाबून विद्वानांनी ऋग्वेदाचा तडजोडीचा कालखंड इ.स.पूर्व १५०० ते १२०० असा ठरवला. वस्तुत: आणखी एक असा शास्त्रीय




निकष आहे, ज्यामुळे ऋग्वेदाचा कालखंड ते इ.स.पूर्व १५०० ते १२००च्याही नंतर ढकलू शकले नाहीत. तो असा की भारतात लोहयुग हे इ.स.पूर्व ३५०च्याही थोडं आधी सुरू झालं होतं, आणि ऋग्वेदाच्या अभ्यासातून हे स्पष्ट झालं होतं की ऋग्वेद हा लोहयुग-पूर्व ग्रंथ आहे.



पण इथे विचार करणाऱ्या वाचकाच्या मनात एक प्रश्न उद्भवला असेल, तो असा की जर सुमारे इ.स.पूर्व ३५०च्या आधीच्या काळातला एकसुद्धा लेखी शिलालेख किंवा दस्तावेज भारतात उपलब्धच नव्हता, तर अर्थात ऋग्वेदाची लेखी प्रतसुद्धा उपलब्ध नव्हती. मग या ग्रंथाचा कालखंड अशोकाच्या लेखी शिलालेखांच्या १००० वर्षं पूर्वीचासुद्धा कोणत्या आधारावर ठरवला जाऊ शकतो? प्रत्यक्षात अशोकाच्या शिलालेखांच्या काळाच्या (म्हणजे इ.स.पूर्व ३५०च्या) कोणत्यातरी नंतरच्या काळात लेखी स्वरूपात घातलेल्या ऋग्वेदाला (किंवा दुसऱ्या कोणत्याही प्राचीन भारतीय ग्रंथाला) इ.स.३५०च्या पूर्वी काही अस्तित्व होतंच, हे कसं मानावं? ऋग्वेदाच्या रचनेचा कालखंड लेखी दस्तावेजांच्या अभावी इ.स.पूर्व १५०० ते १२०० कसा ठरवला गेला? वास्तविक कालखंड कोणता आहे? आणि ऋग्वेदाला इतकं काय महत्त्व आहे?

**sgtalageri@gmail.com**

शिल्पकार चरित्रकोश

रु. १२,५००/- किमतीचा १२ खंडांचा संच मिळवा केवळ रु. ६,५००/- प्रकाशनपूर्व सवलतीत

(ही योजना काही काळापुरतीच मर्यादित आहे.)

उत्खनन

**श्रीकांत गंगाधर तलगेरी**

इतिहासाच्या आणि परंपरांच्या अभ्यासात लेखी शिलालेखांच्या आणि दस्तावेजांच्या खेरीज आणखी एक अत्यंत महत्त्वाचा इतिहास-नोंदणीचा प्रकार मानला जातो, आणि तो आहे मौखिक इतिहास (‘ओरल हिस्टरी’).

जगाच्या कानाकोपऱ्यातल्या जनजातींच्या आणि लोकसमूहांच्या ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा, मिथ्यकथा आणि पुराणकथा मौखिक इतिहासाच्या रूपाने जिवंत ठेवलेल्या आढळतात आणि त्या मौखिक इतिहासाच्या अभ्यासाला विद्वानांच्या दृष्टीने फार महत्त्व असतं.

जगातले अनेक प्राचीन ग्रंथ लेखी रूपात बसवले जायच्या आधी मौखिक रूपात चलनात असत. भारतातले अनेक अति-महत्त्वाचे ग्रंथ - पुराण, रामायण, महाभारत वगैरे - शतकानुशतके मौखिक रूपातच जिवंत राहिले आणि कोणे एके काळी त्यांना लेखी स्वरूप दिलं गेलं. या मौखिक प्रक्रियेचा प्राकृतिक भाग म्हणून असे ग्रंथ आणि अशा परंपरा पिढ्यानपिढ्या आणि शतकानुशतकं मौखिक पद्धतीने पुढे नेत असताना, त्यात थोडे थोडे बदल घडत असतात. त्यात भाषाशैलीतले बदल; नवीन शब्दांचा प्रयोग आणि काही जुन्या शब्दांचा विसर; नवीन तांत्रिक आणि सांस्कृतिक बदलांमुळे कथानकामध्ये लहान-लहानसे बदल; नवीन व्यक्तींचे, संदर्भांचे आणि प्रसंगांचे कथांमध्ये प्रवेश; नवीन विचारांचा आणि विचारसरणींचा कथानकांवर प्रभाव; आणि काही




# ऋग्वेदाचं अतोनात महत्त्व

**(भाग - ७)**

*‘सुरुवातीपासूनच ऋग्वैदिक काळात प्राचीन ऋषींचे शब्द तंतोतंत स्वरूपात जपून ठेवण्यासाठी कमालीची पावलं उचलली गेली. त्यामुळे आज काश्मीरपासून ओडिशा आणि केरळपर्यंतच्या दूरदूरच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये मौखिक पद्धतीने पाठांतर करून जपून ठेवलेल्या ऋग्वेदातल्या प्रत्येक मंत्राचा प्रत्येक शब्द आणि हजारो वर्षांपासून लुप्त झालेले शब्दांमधले पउदात्त, अनुदात्त, स्वरितब स्वरसुद्धा हुबेहूब आणि तंतोतंत त्यांच्या हजारो वर्षांपूर्वीच्या स्वरूपात तसेच्या तसे जिवंत जपून ठेवलेले आढळतात. त्यामुळे प्राचीन काळापासून आजपर्यंत ऋग्वेदाचं जिवंत संचारण करण्याची पद्धत हिब्रू आणि ग्रीक बायबलपेक्षा आणि ग्रीक, लॅटिन आणि चिनी ग्रंथांपेक्षा फार फार श्रेष्ठ (superior) आहे.*

प्रमाणात संपूर्ण कथांचा रोख बदलला जाणं, वगैरे. त्यामुळे मौखिक परंपरा सुरू होत असताना त्या कथेचं किंवा परंपरेचं जे स्वरूप असतं, तेच स्वरूप या कालांतराच्या प्रवासानंतर लेखी रूपात तसंच्या तसं राहत नाही.

पण वैदिक वाङ्मयाची मौखिक परंपरा मात्र जगातल्या सगळ्या मौखिक परंपरांपेक्षा एक संपूर्णपणे वेगळ्या अलौकिक पद्धतीची मौखिक परंपरा आहे. ती खरोखर अद्वितीय, अप्रतिम आणि जगात कुठेही तुलनात्मक (थोडीशीसुद्धा तुलना करण्यासारखं) उदाहरण नसलेली परंपरा आहे.



ऋग्वेदाचं पाठांतर करण्याची 'घणपाठ' नावाची पद्धत होती, ज्यामुळे हा ग्रंथ आणि त्यातला प्रत्येक सूक्त आणि मंत्र रचले गेल्या क्षणापासून शेकडो आणि हजारो वर्षांपर्यंत फक्त मौखिक पद्धतीने तंतोतंत आणि तशाच्या तशा रूपात जिवंत आणि सुरक्षित राहिले.

ऋग्वेदातल्या प्रत्येक सूक्तातला प्रत्येक मंत्र या घणपाठ नावाच्या पाठांतर पद्धतीच्या अति-अवघड आणि पेचेदार नियमांनुसार पाठांतर केला जात असे, आणि या पद्धतीने पिढ्यानपिढ्या आणि शतकानुशतकं (किंवा सहस्रकानुसहस्रकं) तो प्रत्येक मंत्र रचल्या क्षणापासून आजच्या दिवसापर्यंत (आणि शेवटी लेखी स्वरूप प्रदान व्हायच्या क्षणापर्यंत) एका शब्दाचा बदल घडू न देता तंतोतंत तशाच्या तशा स्वरूपात जिवंत ठेवला गेला. ज्या अलौकिक घणपाठ पद्धतीने हजारो वर्षांच्या ओघात लाखो वैदिक पठन-पंडितांनी ग्रंथातले १०२८ सूक्त आणि १०५५२ मंत्र हुबेहूब स्वरूपात पाठांतर करून जिवंत ठेवले, हा जगातला सर्वात विस्मयकारक चमत्कार मानला पाहिजे.

पण हे सगळं अमेरिकेतल्या हार्वर्ड विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख माइकल विटझेल, जे खरं तर आजच्या काळातले आर्य आक्रमण सिद्धान्ताच्या सर्वात कट्टर पुरस्कर्त्यांपैकी एक आहेत, यांच्या प्रत्यक्ष शब्दात समजून घेऊ या. विटझेल लिहितात -

'सुरुवातीपासूनच ऋग्वैदिक काळात प्राचीन ऋषींचे शब्द तंतोतंत स्वरूपात जपून ठेवण्यासाठी कमालीची पावलं उचलली गेली. त्यामुळे आज काश्मीरपासून ओडिशा आणि केरळपर्यंतच्या दूरदूरच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये मौखिक पद्धतीने पाठांतर करून जपून ठेवलेल्या ऋग्वेदातल्या प्रत्येक मंत्राचा प्रत्येक शब्द आणि हजारो वर्षांपासून लुप्त झालेले शब्दांमधले (उदात्त, अनुदात्त, स्वरित) स्वरसुद्धा हुबेहूब आणि तंतोतंत त्यांच्या हजारो वर्षांपूर्वीच्या स्वरूपात तसेच्या तसे जिवंत जपून ठेवलेले आढळतात. त्यामुळे प्राचीन काळापासून आजपर्यंत ऋग्वेदाचं जिवंत संचारण करण्याची पद्धत हिब्रू आणि ग्रीक बायबलपेक्षा आणि ग्रीक, लॅटिन आणि चिनी ग्रंथांपेक्षा फार फार श्रेष्ठ (superior) आहे. आम्ही आजच्या दिवसात होणाऱ्या वेदपठणाला अक्षरश: तीन हजाराहून अधिक वर्षांपूर्वी रचलेल्या आणि गायिलेल्या ग्रंथांचं 'टेप रेकॉर्डिंग' मानू शकतो. पौराणिक ग्रंथांची प्रत्येक काळात पुन्हा पुन्हा नव्याने पुनर्रचना केली जात असे. पण त्याच्या अगदी उलट वैदिक ग्रंथ एकदा रचले गेले त्या काळाचे आणि क्षेत्राचे ते अक्षरश: 'फोटोग्राफ' आहेत. ते समकालीन आहेत आणि हुबेहूब जपले गेले आहेत. त्यामुळे ते अक्षरश: शिलालेख आहेत. ते ऐतिहासिक घटना घडल्यावर लगेच ऋषींच्या शब्दांमध्ये नोंदला गेलेला आणि टेप केला गेलेला अगदी समकालीन इतिहास सांगतात. या वस्तुस्थितीकडे नेहमी दुर्लक्ष केलं जातं. (१९९५मधल्या एका ॲकॅडेमिक पेपरमधून) 'वेदांना वैदिक काळात 'टेप' केलेले आणि आजपर्यंत एकाही शब्दाचा बदल न करता जपून ठेवलेले 'टेप रेकॉर्डिंग्ज' मानले पाहिजेत.' (१९९७मधल्या एका ॲकॅडेमिक पेपरमधून).

'ही गोष्ट पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितली पाहिजे की प्राचीन शिलालेखांप्रमाणे ऋग्वेदातले मंत्र इ.स.पूर्व १५००मध्ये रचले गेले, त्या क्षणापासून एकाही शब्दाचा बदल न घडू देता हुबेहूब जपले गेले आहेत. अर्वाचीन काळातलं ऋग्वेद पठण इ.स.पूर्व १७००-१२००च्या काळातलं 'टेप रेकॉर्डिंग' आहे'. (२०००मधल्या एका ॲकॅडेमिक पेपरमधून).

'ऋग्वेदातले मंत्र मौखिक पद्धतीच्या अगदी कडक शिस्तीने पुन्हा पुन्हा पाठांतर करून आजपर्यंत तसेच्या तसे जिवंत ठेवले गेलेले आहेत. हे पुन्हा आवर्जून सांगितलं पाहिजे की वैदिक ग्रंथ या अति प्राचीन काळातले 'टेप रेकॉर्डिंग्ज' आहेत. एक शब्द, एक अक्षर, एक स्वरसुद्धा बदलू दिलं गेलेलं नाही. परिणामत: हे ग्रंथ कोणत्याही दास्तावेजांपेक्षा उच्च कोटीचे नोंदणी आहेत, आणि वैदिक काळातले समकालीन शिलालेखच आहेत. त्या

काळातल्या लोकांची नावं, ठिकाणं, नद्या, वगैरे सगळ्या गोष्टींच्या बाबतीतले हे अगदी समकालीन नोंदणी आहेत' (२००६मधल्या एका ॲकॅडेमिक पेपरमधून).

ते आवर्जून सांगतात की इतिहासाच्या लेखनात आम्ही ऋग्वेदातल्या प्रत्यक्ष शब्दांमधून दिलेली माहिती अगदी गांभीर्याने घेतली पाहिजे.' (२०००मधल्या दुसऱ्या एका ॲकॅडेमिक पेपरमधून).

त्यामुळे अशोकाच्या शिलालेखांच्या आधीच्या काळातले शिलालेख वैदिक संहितांच्या रूपात आणि मुख्यत्वेकरून ऋग्वेदाच्या रूपात भारतात आहेत. ऋग्वेद असा शिलालेख आहे जो जगात अद्वितीय आहे. या प्राचीन शिलालेखाची एक मोठी सकारात्मक बाजू आहे आणि एक मोठी नकारात्मक बाजू आहे : सकारात्मक बाजू ही की जगातले बाकी सगळे प्राचीन शिलालेख परिमाणाने लहानसे असतात (काही शब्दांचे किंवा वाक्यांचे किंवा फार तर पानांचे), पण ऋग्वेद सर्वात प्रशस्त आणि मोठा शिलालेख आहे ज्यात १०२८ सूक्तं आणि १०५५२ मंत्र आहेत, आणि त्यामुळे भरपूर माहिती आहे. नकारात्मक बाजू ही की बाकी सगळे शिलालेख भौतिक स्वरूपाचे असतात आणि त्या भौतिक वस्तूंचे कालखंड शास्त्रीय प्रक्रिया (कार्बन डेटिंग, थर्मोल्यूमिनसन्स डेटिंग, वगैरे) वापरून अचूकपणे ठरवले जाऊ शकतात, पण ऋग्वेद एक अलौकिक मौखिक स्वरूपातला शिलालेख असल्याने त्याचा कालखंड अशा शास्त्रीय प्रक्रिया वापरून ठरवता येत नाही. वर पाहिल्याप्रमाणे माइकल विट्झेल ऋग्वेदाचं शिलालेख स्वरूप मान्य करताना त्याचा कालखंड आपल्या आर्य आक्रमण सिद्धान्ताच्या पूर्वग्रहांनुसार 'इ.स.पूर्व १५००' किंवा 'इ.स.पूर्व १७००-१२००' असा ठरवतात.

मग या महा-शिलालेखाचा खरा कालखंड अचूकपणे कसा ठरवला जाऊ शकतो?

यासाठी आम्हाला भौतिकदृष्ट्या शिलालेख-दस्तावेज-रहित प्राचीन भारताकडून आपली नजर थोडी पश्चिमेकडे वळवून भारताच्या बाहेर प्राचीन शिलालेख-दस्तावेजांनी भरलेल्या पश्चिम आशियाकडे बघावं लागेल. प्राचीन इराक-सीरियामधल्या सुमारे इ.स.पूर्व १५००च्या काळातल्या मितांनी राज्याकडे.

sgtalageri@gmail.com

**साप्ताहिक विवेकच्या महिला वाचकांसाठी**

# लेखन स्पर्धा

महिला विशेषांकानिमित्त

'विवेकी' वाचक मैत्रिणींनो,

सस्नेह नमस्कार.

घर-ऑफिसात आणि समाजात वावरताना आजूबाजूला घडणाऱ्या अनेक घटनांना प्रतिसाद देण्याची, एखाद्या विषयावर आपलं मत व्यक्त करण्याची किंवा आपला एखादा वेगळा अनुभव अनेकांशी 'शेअर' करण्याची इच्छा असते. मात्र बरेचदा संधी मिळत नाही, तर कधी संकोच आडवा येतो. आणि त्यामुळे 'शेअरिंगची' ऊर्मी दबून जाते आतल्या आत.... हे लक्षात घेऊनच, तुमचं मत / अनुभव शब्दबद्ध करण्याची संधी, लेखन स्पर्धेच्या माध्यमातून देत आहोत. निमित्त आगामी महिला विशेषांकाचं...

- **स्पर्धेसाठी विषय -**

१. मी केलेलं बंड
२. जुन्या रूढी-परंपरांना मी दिलं नवं रूप
३. आजच्या तरुणाईशी माझा संवाद
४. छंदाने दिला माझ्या व्यक्तिमत्त्वाला आकार
५. असा हवा स्त्रियांचा राजकारणात सक्रिय सहभाग

वरीलपैकी कोणताही एक विषय निवडावा. फक्त एकाच विषयावर लिहिणं बंधनकारक.

- **शब्दसंख्या -** ४५० ते ६०० शब्द. फूलस्केपची २ ते २॥ पानं. • **वयोमर्यादा -** १८ ते ६० वर्षं.
- **लेख पाठविण्याची अंतिम तारीख -** ७ फेब्रुवारी २०१६.

परीक्षणासाठी स्वतंत्र परीक्षक मंडळ असेल आणि परीक्षकांनी दिलेला निकाल अंतिम असेल.

**स्पर्धेतील ३ विजेत्या स्पर्धकांचं लेखन, १३ मार्च २०१६च्या महिला विशेषांकात प्रसिद्ध करण्यात येईल आणि महिला विशेषांकाच्या प्रकाशन सोहळ्यात पारितोषिक वितरण समारंभ होईल.**

लेख लिहून कुरियरने वा पोस्टाने साप्ताहिक विवेकच्या प्रभादेवी कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा किंवा लेखाची 'युनिकोड' वा 'वर्ड ओपन - आर.टी.एफ.' फाईल **vivekedit@gmail.com** वर मेल करावी किंवा लेख स्कॅन करून मेल करावा.

आपल्या लेखाची एक झेरॉक्स प्रत स्वत:जवळ ठेवावी.

स्पर्धकाचं नाव, शिक्षण, नोकरी/व्यवसाय/गृहिणी/विद्यार्थिनी हे तपशील नमूद करावे. संपर्कासाठी पूर्ण पत्ता, मेल आय.डी. वा मोबाईल नंबर कळवावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क :** ०२२-२४२२१४४०, ९५९४९६१८६५

उत्खनन

**श्रीकांत गंगाधर तलगेरी**

# आर्य भाषांची मायभूमी भारतात आहे


## (भाग - ७) - मितांनी राज्य

आधीच सांगितल्याप्रमाणे आर्य आक्रमण सिद्धान्ताच्या आधारावर पाश्चात्त्य विद्वानांनी आधीपासून ठरवलेलंच होतं की इंडो-आर्यन आणि इराणियन या दोन आर्य भाषांच्या शाखांमधल्या भाषा बोलणारे लोक एकत्र दक्षिण रशियामधून सुमारे इ.स.पूर्व ३०००च्या नंतर स्थलांतर करायला लागले. अनेक ठिकाणांमध्ये काही काळ वास करत करत शेवटी ते मध्य आशियात काही काळ स्थायी झाले आणि इथे त्यांची एक विशिष्ट इंडो-इराणियन धर्मसंस्कृती विकसित झाली आणि मग इ.स.पूर्व १५००च्या सुमारास इथून एकमेकांपासून वेगळे होऊन दक्षिणेकडे स्थलांतर करायला लागले-इराणियन लोक दक्षिण दिशेने अफगाणिस्तानात आणि इंडो-आर्यन (वैदिक) लोक आग्नेय (दक्षिण-पूर्व) दिशेने सध्याच्या उत्तर पाकिस्तानात.

तर आर्य आक्रमण सिद्धान्तानुसार मध्य आशियात विकसित झालेली (इराणियन लोकांबरोबर समाईक असलेली) इंडो-इराणियन धर्म-संस्कृती घेऊन या इंडो-आर्यन (वैदिक) लोकांनी ऋग्वेदपूर्व काळात भारतात प्रवेश केला आणि नंतर ऋग्वेदाची रचना केली आणि विशिष्ट वैदिक धर्म-संस्कृती विकसित केली.

पण विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच पश्चिम आशियात पुराणवस्तुशास्त्रासंबंधित उत्खननांमध्ये काही धक्कादायक शोध लागले. प्राचीन पश्चिम आशियात इराक-सीरियाच्या एका भागात इ.स.पूर्व १५००च्या सुमारास एक मितांनी राज्याची स्थापना झाली, जे सुमारे २०० वर्ष समृद्ध राहिलं. पश्चिम आशियात वेगवेगळ्या ठिकाणांहून मिळालेल्या दस्तावेजांमध्ये आणि शिलालेखांमध्ये मितांनी राजघराण्यातल्या लोकांचे उल्लेख आहेत. इजिप्तची एक प्रसिद्ध राणी नेफर्तितीसुद्धा याच घराण्यातली होती. सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की मितांनी राज्याचं राजघराणं इंडो-आर्यन (वैदिक) वंशाचं होतं. सगळ्या राजांची नावं (त्यांच्या राजवंशाच्या यादीत आणि दुसऱ्या दस्तावेजांच्या नोंदीत) वैदिक नावं आहेत - त्या सगळ्या प्रकारची नावं आणि त्यापैकी काही हुबेहूब नावं ऋग्वेदात आहेत. एका करारात मितांनी राजांच्या देवतांची नावं ऋग्वेदातल्या प्रमुख देवता मित्र, वरुण, इंद्र, नासत्य यांचे अपभ्रंश आहेत. राजांच्या नावांमध्ये अश्व आणि रथ या शब्दांचा समावेश आहे आणि त्याशिवाय घोड्यांच्या प्रशिक्षणासंबंधित एका मितांनी दस्तावेजात अनेक ऋग्वैदिक शब्दांचे अपभ्रंश आहेत-उदा. मर्य, अश्वसनि (घोडेस्वार शूर), एक-वर्तन, त्रि-वर्तन, पंच-वर्तन, सप्त-वर्तन, नव-वर्तन (शर्यतीच्या मैदानाच्या चक्रांची संख्या), पिंगल, पलित, बभ्रु (घोड्यांचे रंग), वगैरे.

ही नवीन परिस्थिती स्पष्ट झाल्यावर आर्य आक्रमण





*ऋग्वेदाच्या कालक्रमाचा आढावा घेताना प्रामुख्याने सगळ्या गंभीर विद्वानांनी मान्य केलेल्या दोन स्थूल वर्गांची (जुनी मंडलं २-४, ६-७ विरुद्ध नवीन मंडलं १, ५, ८-१०) दखल घेतली तरी संपूर्ण इतिहॉसाचा उलगडा करायला हे इतकं पुरेसं आहे, हे आता आपण पुढे पाहणारच आहोत. त्याबरोबर विद्वानांनी काही स्पष्ट निकषांच्या आधारावर प्रत्येक जुन्या मंडलामधली काही सूक्तं टिपून ठेवली आहेत, जी जुन्या मंडलातली असली तरी नवीन मंडलांच्या काळात त्यांमध्ये काही लहानसे फेरबदल झाले आहेत, आणि ही सूक्तं सुधारित सूक्तं मानली जातात.*

सिद्धान्ताच्या कालक्रमाची इमारत आख्खी गडगडायला लागली. आर्य आक्रमण सिद्धान्तानुसार इंडो-इराणियन समाईक धर्म-संस्कृतीच्या ठिकाण (मध्य आशिया) मधून इंडो-आर्यन लोक इ.स.पूर्व १५००मध्ये उत्तर पाकिस्तानच्या क्षेत्रात आले, आणि तिथे ही विशिष्ट इंडो-आर्यन धर्म-संस्कृती विकसित झाली, जी ऋग्वेदात दिसते. म्हणजे वैदिक लोक जर पश्चिम आशियात कधीही गेलेच असतील, तर ते किमान इ.स.पूर्व १२००च्या नंतरच असायला हवं. पण आता इ.स.पूर्व १५००च्या आधीच (कारण मितांनी राज्याच्या स्थापनेपूर्वीच, म्हणजे इ.स.पूर्व १५००च्या किमान १००-२०० वर्षांपूवी या मितांनी राजवंशाचे पूर्वज पश्चिम आशियात होते, याचे पुरावे आहेत) वैदिक लोक पश्चिम आशियात कसे आढळू शकतात? म्हणजे भारतातली वैदिक धर्म-संस्कृती त्याहूनही आधीची आहे, असं सिद्ध नाही का होत? संपूर्ण कालक्रमाचा पुनर्विचार करावा लागेल की काय अशी भीती या विद्वानांना वाटायला लागली.

या पेचप्रसंगातून बाहेर पडण्यासाठी विद्वानांना एक युक्ती सुचली. मध्य आशियामधून दोन नव्हे, तर तीन दिशांमध्ये स्थलांतरं झाली. इराणियन लोक दक्षिण दिशेला अफगाणिस्तानात गेले आणि इंडो-आर्यन (वैदिक) लोक दोन गटांमध्ये विभाजित होऊन दोन उलट्या दिशेला गेले. एक गट आग्नेय (दक्षिण-पूर्व) दिशेला सध्याच्या उत्तर पाकिस्तानात आणि दुसरा गट नैर्ऋत्य (दक्षिण-पश्चिम) दिशेला पश्चिम आशियात म्हणजे इराक-सीरियाच्या क्षेत्रात. तर आग्नेय दिशेला स्थलांतर करणाऱ्या इंडो-आर्यन लोकांनी ज्या वेळेला भारतात प्रवेश करून ऋग्वैदिक धर्म-संस्कृती विकसित केली, त्याच काळात - किंबहुना थोडं आधीच नैर्ऋत्य दिशेला स्थलांतर करणाऱ्या इंडो-आर्यन लोकांनी पश्चिम आशियात प्रवेश करून मितांनी राज्याची स्थापना केली.

तर नवीन समीकरण असं आहे - इ.स.पूर्व १५००च्या आधी तिन्ही गट मध्य आशियात एकत्र होते, जिथे एक समाईक धर्म-संस्कृती विकसित झाली, आणि इ.स.पूर्व १५००च्या नंतर तिन्ही गट वेगवेगळ्या ठिकाणी होते, जिथे तिन्ही धर्म-संस्कृती पुढे स्वतंत्रपणे विकसित झाल्या.

हा सोयीस्करपणे ठरवलेला कालक्रम बरोबर आहे का? हेच आपण आता तपासू या.

### ऋग्वेदाचा अंतर्गत कालक्रम

ऋग्वेदाचा खरा कालखंड काय आहे, याचा शोध लावण्यासाठी आधी ऋग्वेदाचा अंतर्गत कालक्रम समजून घ्यायला हवा.

ऋग्वेदात १०२८ सूक्त आणि त्यात १०५५२ मंत्र आहेत. ते दहा विभागांमध्ये विभागलेले आहेत, ज्यांना मंडल म्हणतात.

त्यापैकी मंडलं २-७ आधीची मानली जातात आणि त्यांना कुटुंब मंडलं ('फॅमिली बुक' म्हणजे एका ऋषी-कुटुंबाशी संलग्न असलेलं मंडल) म्हणतात, कारण ती सगळी मंडलं एकेक ऋषी कुटुंबाशी संलग्न आहेत. ऋग्वेदात दहा ऋषी कुटुंबं आहेत आणि या प्रत्येक कुटुंबाचं एक वेगळं आप्री सूक्त (विशेष कुटुंब सूक्त) आहे. ते आहेत अंगिरस, भृगु, केवलांगिरस (कण्व), केवलभृगु (गृत्समद), वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्त्य, कश्यप, अत्रि आणि भरत; आणि अंगिरस कुटुंबाच्या तीन स्वतंत्र शाखा आहेत, भरद्वाज, गोतम आणि दीर्घतमस. मंडलं २-७ क्रमशः पुढील ऋषी कुटुंबांशी संलग्न आहेत - गृत्समद (२), विश्वामित्र (३), वामदेव (गौतम) आंगिरस (४), अत्रि (५), भरद्वाज आंगिरस (६) आणि वसिष्ठ (७).

मंडलं १, ८-१० नंतरची मानली जातात आणि त्यांना कुटुंब-विरहित मंडलं ('नॉन-फॅमिली बुक', म्हणजे एका ऋषी-कुटुंबाशी संलग्न नसलेलं मंडल) म्हणतात.

पुढे, तेही एक कुटुंब मंडल आहे ही एक गोष्ट सोडली, तर मंडल ५ बाकी जवळजवळ सगळ्या निकषांवरून कुटुंब-विरहित मंडलांच्या जोडीचं मंडल ठरतं.

सगळ्या निकषांवरून ऋग्वेदाचे कालखंडाच्या दृष्टीने दोन स्थूल वर्ग आहेत, यावर सगळ्या प्रमुख पाश्चात्त्य विद्वानांचं एकमत आहे :

जुनी मंडलं - २, ३, ४, ६, ७.

नवीन मंडलं - १, ५, ८, ९, १०.

आणखी सूक्ष्म निकषांच्या अभ्यासावरून या मंडळांचं जास्त तपशीलवार वर्गीकरण असं आहे -

सर्वात जुनी मंडलं (कालानुक्रमे) - ६, ३, ७.
मध्यकालीन जुनी मंडलं - २, ४.
नवीन कुटुंब मंडल - ५.
नवीन कुटुंब-विरहित मंडलं - १, ८.
सर्वात नवीन मंडल - १०.

ऋग्वेदाच्या कालक्रमाचा आढावा घेताना प्रामुख्याने सगळ्या गंभीर विद्वानांनी मान्य केलेल्या दोन स्थूल वर्गांची (जुनी मंडलं २-४, ६-७ विरुद्ध नवीन मंडलं १, ५, ८-१०) दखल घेतली तरी संपूर्ण इतिहासाचा उलगडा करायला हे इतकं पुरेसं आहे, हे आता आपण पुढे पाहणारच आहोत. त्याबरोबर विद्वानांनी काही स्पष्ट निकषांच्या आधारावर प्रत्येक जुन्या मंडलामधली काही सूक्तं टिपून ठेवली आहेत, जी जुन्या मंडलातली असली तरी नवीन मंडलांच्या काळात त्यांमध्ये काही लहानसे फेरबदल झाले आहेत, आणि ही सूक्तं सुधारित सूक्तं मानली जातात.

जुन्या मंडलांच्या काळात आणि नवीन मंडलांच्या काळात कितीतरी अंतर होतं, हे त्या जुन्या आणि नवीन सूक्तांमधल्या अनेक विशेष व्याकरणातल्या वगैरे लक्षणांवरून दिसून येतं. सामान्य वाचकाला समजेल अशी गोष्ट म्हणजे शब्दकोश. आज आपल्या अगदी पारंपरिक आणि जुने वाटणारे असंख्य संस्कृत शब्द आहेत जे वैदिक भाषेत नव्हतेच, नंतरच्या काळात जन्माला आले. कित्येक शब्द ऋग्वेदोत्तर शब्द आहेत, जे अथर्ववेदात आणि नंतरच्या वैदिक साहित्याच्या काळात जन्माला आले. आणि मुख्य म्हणजे कित्येक शब्द आणि व्याकरणाचे प्रकार असे आहेत जे ऋग्वेदाच्या नवीन मंडलांच्या काळात जन्माला आले (काही तर शेवटच्या दहाव्या मंडलाच्या काळात). हे शब्द जुन्या मंडलांच्या काळात अस्तित्वातच नव्हते, आणि मिळालेच तर कधीकधी सुधारित सूक्तांमध्येच मिळतात. काही उदाहरणं - लोक, कल्याण, मंगल, अप्सरा, तीर्थ, काल, अंबर, विजय, अंबा, लक्ष्मी, लोह, आत्मा, धातू क्ल्प् (ज्यातून नंतर कल्प, कल्पना, विकल्प, संकल्प वगैरे शब्द निर्माण झाले), धातू पूज् (ज्यातून नंतर पूजा वगैरे निर्माण झाले), धातू गुप् (ज्यातून नंतर गुप्त वगैरे निर्माण झाले), धातू लभ् (ज्यातून नंतर लाभ वगैरे निर्माण झाले), धातू लुभ् (ज्यातून नंतर लोभ वगैरे निर्माण झाले), धातू आ-रभ् (ज्यातून नंतर आरंभ वगैरे निर्माण झाले), वगैरे वगैरे. हे नवीन शब्द भारताबाहेरच्या अन्य आर्य भाषांच्या शाखांमधल्या भाषांमध्ये मिळत नाहीत.



एका अतिसामान्य आणि अतिमहत्त्वाच्या शब्दाच्या उदाहरणातून हे भाषेत (जुन्या मंडलांपासून नवीन मंडलांपर्यंत) झालेलं परिवर्तन लक्षात येईल - नवीन मंडलांमधला शब्द 'रात्रि' हा सर्वात सामान्य आणि महत्त्वाचा संस्कृत शब्द आहे, ज्याचा अर्थ 'रात्र' आहे, हे सांगण्याची गरज नाही. आज सगळ्या उत्तर भारतीय भाषांमध्ये हाच शब्द (किंवा त्याचा अपभ्रंश) प्रचलित आहे, आणि अन्य सगळ्या आर्येतर भाषांमध्येसुद्धा (ज्यांवर संस्कृत भाषेचा प्रभाव पडलेला आहे) हा शब्द सर्वमान्य आहे. पण हा शब्द भारताबाहेरच्या अन्य आर्य भाषा शाखांच्या भाषांमध्ये मिळत नाही. आणि जुन्या मंडलांमध्येही तो अस्तित्वात नव्हता. रात्रीसाठी जुना ऋग्वैदिक शब्द आहे 'नक्त' (ग्रीक नुक्स, लॅटिन नोक्त, जर्मन नाख्त, आयरिश नोक्त, लिथुवेनियन नक्तिस, अल्बानियन नाते, रशियन नोच, वगैरे).

ऋग्वेदातलं हे 'जुनी मंडल २-४, ६-७ विरुद्ध नवीन मंडलं १, ५, ८-१०' वर्गीकरण भाषेतल्या शब्दांच्या, व्याकरणाच्या आणि अन्य कित्येक विषयांच्या बाबतीत सर्वसामान्य आणि वादातीत वर्गीकरण आहे. त्या वर्गीकरणाच्या निकषातून इतिहासाचा अभ्यास केल्याने हे ऋग्वेदाच्या कालखंडाचं कोडं कसं सुटतं, हे लवकरच स्पष्ट होईल.

**sgtalageri@gmail.com**

सा. विवेक वाचकांसाठी लवकरच प्रकाशित करीत आहे...
कविवर्य मंगेश पाडगावकर यांचे भावजीवन उलगडणारे पुस्तक

माझे जीवनगाणे...



**पेला अर्धा सरला आहे,
असंसुद्धा म्हणता येतं,
पेला अर्धा भरला आहे,
असंसुद्धा म्हणता येतं !**

**सरला आहे म्हणायचं
की भरला आहे म्हणायचं?
तुम्हीच ठरवा!**

**सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत
की गाणं म्हणत?
तुम्हीच ठरवा !**

शब्दांकन
**उत्तरा मोने**

उत्खनन

श्रीकांत गंगाधर तलगेरी

**वैयक्तिक नावं कालखंडाचे दर्शक असतात. जुनी नावं आणि नवीन नावं असतात ही एक वस्तुस्थिती आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे पुराव्याचा भार नवीन नावांवर जास्तं असतो आणि जुन्या नावांवर कमी; कारण प्रसंगी जुनी नावं नवीन काळात दिली किंवा वापरली जाऊ शकतात, पण नवीन नावं जुन्या काळात दिली किंवा वापरली गेलेली आढळणं शक्य नाही. कोणत्याही ग्रंथात जुनी नावं असणं-नसणं तो ग्रंथ आणि ते संदर्भ जुने आहेत की नाही याचा पुरावा असू शकत नाही, पण कोणत्याही ग्रंथात नवीन नावं असणं नसणं तो ग्रंथ आणि ते संदर्भ नवीन आहेत की नाही याचा पुरावा असू शकतो.**

# आर्य भाषांची मायभूमी भारतात आहे

## (भाग - ८) - वैयक्तिक नावांचे कालखंड

जसे ऋग्वेदातल्या शब्दांचे (जुने-नवे) कालखंड आहेत, तसेच ऋग्वेदातल्या वैयक्तिक नावांचेही कालखंड आहेत. नावांचे कालखंड म्हणजे काय, हे पुढील दोन उदाहरणं स्पष्ट करतील :

१. एक सध्याचं उदाहरण. मी चित्रापूर सारस्वत ब्राह्मण समाजाचा सदस्य आहे. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी चित्रापूर सारस्वत लोकांची नावं पुढीलप्रमाणे होती - अण्णप्पैया, रामप्पैया, सांतय्या, शांतप्पैया, वेंकटेशय्या, वगैरे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी चित्रापूर सारस्वत लोकांची नावं पुढीलप्रमाणे होती - भवानीशंकर, शंकरनारायण, मंजुनाथ, पांडुरंग, सीताराम, केशव, दत्तात्रेय, काशिनाथ, वगैरे. काही दशकांपूर्वी चित्रापूर सारस्वत लोकांची नावं सामान्यतः पुढीलप्रमाणे होती - अशोक, वसंत, सुरेश, रमेश, विवेक, चैतन्य, विनोद, प्रमोद, जयंत, मोहन, दिलीप, शरद, सुभाष, अजित, गिरीश, वगैरे, जी अजून सामान्य आहेत पण नवीन जन्माला आलेल्या चित्रापूर सारस्वत मुलांमध्ये नव्हे. आजच्या काळात चित्रापूर सारस्वत मुलांना पुढीलप्रमाणे (चित्रपटांमधून, टीव्ही मालिकांमधून किंवा संस्कृत शब्दकोशांमधून घेतलेली) नावं दिली जातात - राहुल, रोहन, अभिषेक, ऋग्वेद, यश, अक्षय, वेदान्त, नील, प्रणील, आरुष, मिहीर, कबीर, वगैरे. आज कोणी शंकरनारायण तलगेरी असेल, तर तो एक फार वयस्कर माणूसच असू शकतो, मुलगा नव्हे; आणि कोणी वेदान्त तलगेरी असेल, तर तो एक लहान मुलगा किंवा तरुणच असू शकतो, वयस्कर माणूस नव्हे.

२. एक प्राचीन उदाहरण. ऋग्वेदाच्या जुन्या मंडलांच्या काळात गुप् हा व्याकरणातला धातू अस्तित्वातच नव्हता. नवीन मंडलांच्या काळात गुप् हा व्याकरणातला धातू अस्तित्वात आला होता, पण त्यापासून अजून गुप्त हा शब्द निर्माण झाला नव्हता. अथर्ववेदाच्या काळात गुप्त हा शब्द निर्माण झाला होता, पण अजून तो व्यक्तिगत नावांचा भाग झाला नव्हता. सुमारे इ.स.पूर्व ३४०मध्ये चंद्रगुप्त मौर्यांच्या नावात आणि मग ५०० वर्षांनंतर गुप्त राजघराण्यातल्या नावांमध्ये (चंद्रगुप्त, समुद्रगुप्त) हा शब्द वैयक्तिक नाव किंवा नावाचा भाग म्हणून वापरात आला, जो वापर आजपर्यंत चालू आहे. आज गुप्त/गुप्ता हे नाव उत्तर भारतात एक सर्वत्र मिळणारं आडनाव आहे.

या दोन उदाहरणांवरून लक्षात येईल की वैयक्तिक नावं कालखंडाचे दर्शक असतात. जुनी नावं आणि नवीन नावं असतात ही एक वस्तुस्थिती आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे पुराव्याचा भार नवीन नावांवर जास्तं असतो आणि जुन्या नावांवर कमी; कारण प्रसंगी जुनी नावं नवीन काळात दिली किंवा वापरली जाऊ शकतात, पण नवीन नावं जुन्या काळात दिली किंवा वापरली गेलेली आढळणं शक्य नाही. भारतात आज जन्मणाऱ्या मुलाला कोणीही वसिष्ठ नाव दिल्याचं उदाहरण मिळू शकेल, पण भारतात २००० वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या मुलाला रॉकी हे नाव दिल्याचं उदाहरण मिळणं शक्य नाही. थोडक्यात - कोणत्याही ग्रंथात जुनी नावं असणं-नसणं तो ग्रंथ आणि ते संदर्भ जुने आहेत की नाही याचा पुरावा असू शकत नाही, पण कोणत्याही ग्रंथात नवीन नावं असणं-नसणं तो ग्रंथ आणि ते संदर्भ नवीन आहेत की नाही याचा पुरावा असू शकतो.

### समाईक नावं आणि नावांचे प्रकार

कोणत्याही संस्कृतीशी संबंधित असलेल्या शिलालेखाचा कालखंड त्या शिलालेखाच्या भौतिक वस्तूंचं (म्हणजे तो शिलालेख ज्या दगडावर किंवा धातूवर किंवा दुसऱ्या कोणत्याही पदार्थावर लिहिलेला आहे त्या वस्तूचं) शास्त्रीय प्रक्रिया (कार्बन-डेटिंग किंवा थर्मोल्यूमिनसन्स डेटिंग) वापरून परीक्षण करून ठरवता येतो.

इथे भारतात ऋग्वेदासारखा महा-शिलालेख उपलब्ध आहे, पण त्याचा तसं परीक्षण करता येत नाही, कारण हा महा-शिलालेख भौतिक स्वरूपाचा नसून मौखिक स्वरूपाचा आहे.

पण वास्तविक पाहता या महा-शिलालेखाचा कालखंड ठरवण्याची संपूर्ण आणि पर्याप्त सामग्री उपलब्ध आहे.

१. तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तीन स्वतंत्र शिलालेख-संग्रह उपलब्ध आहेत, ज्यांचा एका समाईक संस्कृतीशी संबंध आहे - ते आहेत भारतातला मौखिक महा-शिलालेख ऋग्वेद, अफगाणिस्तानातला (इराणमधून मिळणारा) मौखिक शिलालेख अवेस्ता, आणि पश्चिम आशियातल्या कानाकोपऱ्यातून मिळणारा मितांनी लोकांच्या विषयातल्या शिलालेखांचा संग्रह, जो मौखिक नसून भौतिक स्वरूपाचा आहे आणि सगळ्या शास्त्रीय प्रक्रिया वापरून ज्याचा कालखंड निश्चित झाला आहे.

२. त्या तिन्ही स्वतंत्र शिलालेख संग्रहांमध्ये समाईक तसंच स्वतंत्र शब्दांचं आणि वैयक्तिक नावांचं भांडार उपलब्ध आहे.

३. त्या तिन्हींपैकी सर्वात मोठ्या शिलालेख-संग्रहात म्हणजे ऋग्वेदात सगळ्या गांभीर्याने अभ्यास करणाऱ्या पाश्चात्त्य विद्वानांनी अंतर्गत कालक्रमाच्या दृष्टीने निश्चित केलेले किमान दोन स्पष्ट विभाग आहेत - जुनी मंडलं २-४, ६-७ आणि नवीन मंडलं १, ५, ८-१०.

या विभागांच्या निकषावर ऋग्वेदातले शब्द जुने शब्द आणि नवीन शब्द म्हणून ओळखले जातात. नवीन शब्दांची सर्वमान्य लक्षणं म्हणजे - १. ते जुन्या मंडलांमध्ये मिळत नाहीत, फक्त नवीन मंडलांमध्ये आणि कधीकधी सुधारित सूक्तांमध्ये मिळतात. २. ते सहसा युरोपमधल्या आर्य भाषांच्या शाखेतल्या भाषांमध्ये मिळत नाहीत, कारण त्यांचा संबंध ऋग्वेदपूर्व काळाशी नसून ऋग्वेदोत्तर काळाशी आहे. ३. त्यामुळे ते पहिल्यांदा नवीन मंडलांमध्ये मिळतात, आणि मग ऋग्वेदोत्तर ग्रंथांमध्ये वाढत्या प्रमाणात मिळतात, क्रमशः यजुर्वेद-अथर्ववेदामध्ये, ब्राह्मण ग्रंथांमध्ये, उपनिषदांमध्ये, सूत्रांमध्ये, रामायण-महाभारत आणि पुराणांमध्ये, आणि पुढेही.

ऋग्वेदातल्या शब्दकोशाचा एक अतिमहत्त्वाचा भाग म्हणजे त्यातली वैयक्तिक नावं आणि नावांचे प्रकार. वैयक्तिक नावं आणि नावांचे प्रकार कालखंडांचे दर्शक असतात, हे आम्ही वर पाहिलंच आहे. त्यातली नावं आणि नावांचे प्रकार आणि त्याला जोडून मग काही विशिष्ट कालखंड-दर्शक शब्दांच्या अभ्यासातून ऋग्वेदाच्या कालखंडाचं कोडं सहजपणे, निश्चितपणे आणि वादातीतपणे कसं सुटतं, ते आता पाहू.

आमच्या समोर तीन शिलालेख-संग्रह आहेत. मितांनी नावं आणि अवेस्तामधली नावं पाहिली, तर आम्हाला नावांचा एक प्रचंड मोठा वर्ग मिळतो, जी नावं आणि नावांचे प्रकार ऋग्वेद, अवेस्ता आणि मितांनी शिलालेखांमध्ये भरभरून मिळतात.

ऋग्वेदात काही वैयक्तिक नावांचे प्रकार आहेत, जे जुन्या मंडलांच्या काळापासून प्रचलित आहेत, म्हणजे ते नव्या मंडलांमध्ये आणि ऋग्वेदोत्तर ग्रंथांमध्येही वाढत्या किंवा किमान मोठ्या प्रमाणात मिळतात. ते आहेत सु-, देव-/दिव-, पुरू-, विश्व-, आणि प्र- असलेली नावं. त्यामुळे हे पूर्वप्रत्यय असलेली नावं (म्हणजे हे प्रत्यय किंवा शब्द पूर्वभागात असलेली नावं) ऋग्वेदात सर्वत्र मिळतात, आणि अर्थात अशी नावं अवेस्तात आणि मितांनी शिलालेखांमध्येही मिळतात. आणि जर अशी नावं ऋग्वेद-पूर्व असतील, तर इतर आर्य भाषा शाखांच्या भाषांमधल्या प्राचीन दस्तावेजांमध्ये मिळाले तरी काही आश्चर्य नाही. त्यामुळे ही नावं आणि हे नावाचे प्रकार कालखंड-दर्शक असू शकत नाहीत.

हे वरील पाच-सहा स्थायी नावांचे प्रकार सोडले, तर समाईक नावांचं आणि नावांच्या प्रकारांचं एक मोठं भांडार ऋग्वेद, अवेस्ता आणि मितांनी शिलालेखांमध्ये भरभरून मिळतं. मितांनी नावांमध्ये ऋग्वेदाशी समाईक असलेली सगळी नावं वसु-, ऋत-, प्रिय-, बृहद्-, सप्त-, उरु-, चित्र-, -अतिथी, -अश्व, -रथ, -मेध, -सेन, -बंधू, -उत, -क्षत्र हे प्रत्यय असलेली नावं आहेत. अवेस्तामधल्या नावांमध्ये ऋग्वेदाशी समाईक असलेल्या नावांच्या प्रकारांमध्ये (-उत वगळता) वरील प्रत्यय असलेल्या सगळी नावं मिळतात आणि शिवाय अश्व-, रथ-, ऋण-, -चित्र, प्रस्-, ऋष्टि-, -अयन, द्वि-, अष्ट-, -अन्ति, ऊर्ध्व-, ऋजू-, -गु, सं-, स्वर्-, -मनस्, शवस्-, -स्तुत, शूर-, स्थूर-, विदद्-, नृ-, पृषद्-, प्रति-, -शर्ध, पृथु-, जरत्-, मय-, हरि-, -श्रुत, श्याव-, -तोष, -तनु, -रोचिस्, -वंत/-मंत, -क्रतु, वगैरे प्रत्यय असलेली नावं, आणि घोर, आप्त्य, अथर्व, उशीनर, अवस्यु, बुध, ऋक्ष, गंधर्व, गय, सुमाया, कृप, कृष्ण, मायव, शास, त्रैतन, उरुक्षय, नाभानेदिष्ठ, वृष्णि, विवस्वत्, विराट् , यम वगैरे प्रत्यक्ष नावं आहेत. त्याशिवाय काही समाईक शब्द आहेत, जे ऋग्वेदात केवळ शब्द आहेत, पण अवेस्तामध्ये नावांचे भाग आहेत किंवा अवेस्तामध्ये केवळ शब्द आहेत, पण ऋग्वेदात नावांचे भाग आहेत.

या तीन शिलालेख-संग्रहांमधली (म्हणजे ऋग्वेद, अवेस्ता आणि मितांनी शिलालेखांमधली) ही सगळी समाईक नावं (आणि नावाशी जोडलेले शब्द) आणि हे सगळे समाईक नावाचे प्रकार ऋग्वेदात प्रत्यक्षात कुठे आढळतात, हे लक्षात घेण्यासारखं आहे -

१. समाईक नावं आणि नाव-प्रकार ऋग्वेदातल्या रचयिते-ऋषींच्या नावांमध्ये -

**जुन्या मंडलांमध्ये** : एकही नाही

**सुधारित सूक्तांमध्ये** : १ सूक्त.

**मंडल ३** : ३६ (१ सूक्त).

**नवीन मंडलांमध्ये** : ३०४ सूक्त.

**मंडल १** : १२-३०, ३६-५०, ९९-१००, १०५, ११६-१३९ (६१ सूक्त). **मंडल ५** : १, ३-६, ९-१०, २०, २४-२६, ३१, ३३-३६, ४४-४९, ५२-६२, ६७-६८, ७३-७५, ८१-८२ (४० सूक्त). **मंडल ८** : १-५, १०, १४-१५, २३-३८, ४३-४४, ४६-५१, ५३, ५५-५८, ६२, ६८-६९, ७५, ८०, ८५-८७, ८९-९०, ९२, ९७-९९ (५१ सूक्त). **मंडल ९** : २-३, ५-२४, २७-२९, ३२-३६, ४१-४३, ५३-६०, ६३-६४, ६८, ७२, ८०-८२, ९१-९२, ९४-९५, ९७, ९९-१०३, १११, ११३-११४ (६१ सूक्त). **मंडल १०** : १-७, १४-२९, ३७, ४२-४७, ५४-६६, ७२, ७५-७८, ९०, ९६-९८, १०१-१०४, १०६, १०९, १११-११५, ११८, १२०, १२२, १२८, १३०, १३२, १३४-१३५, १३९, १४४, १४७-१४८, १५१-१५२, १५४, १५७, १६३, १६६, १६८, १७०, १७२, १७४-१७५, १७९, १८६, १८८, १९१ (९१ सूक्त).

२. समाईक नावं आणि नाव-प्रकार प्रत्यक्ष ऋग्वेदाच्या मंत्रांमध्ये :

**जुन्या मंडलांमध्ये** : एकही नाही.

**सुधारित सूक्तांमध्ये** : ७ सूक्त, १० मंत्र, १० नावं.

**मंडल ३** : ३८.६, ५३.२१ (२ सूक्त, २ मंत्र, २ नावं). **मंडल ४** : ३०.१८. (२ सूक्त, २ मंत्र, १ नाव). **मंडल ६** : १५.१७; १६.१३,१४; ४७.२४ (३ सूक्त, ४ मंत्र, ४ नावं). **मंडल ७** : ३३.९, १२,१३ (१ सूक्त, ३ मंत्र, ३ नावं)

**नवीन मंडलांमध्ये** : १९१ सूक्त, ३४८ मंत्र, ४०३ नावं.

**मंडल १** : १.१०.२, १८.१, २४.१२,१३; ३३.१४,१५; ३५.६; ३६.१०,११,१७,१८; ३८.५; ४३.६; ४४.६ ; ४५.३, ४; ५१.१,३,१३; ५२.१; ६१.७; ८०.१६; ८३.५; ८८.१,५; ९१.६; १००.१६,१७; ११२.७,९,१०,१२,१५,१९,२०,२३; ११४.५; ११६.१,२,६,१२,१६,२०,२१,२३; ११७.७, ८, १७, १८, २०, २२, २४; ११९.९; १२१.११; १२२.४,५,७,१३; १२५.३; १२६.३;

१३८.२; १३९.९; १४०.१; १५८.५; १६३.२; १६४.६; १६७.२; १८८.५ (३७ सूक्त, ७० मंत्र, ८३ नावं.). **मंडल ५ :** १०.३; १८.२; १९.३; २७.१,४,५,६; ३०.१२,१४; ३१.१०; ३३.९,१०; ३४.८; ३५.४; ३६.३,६; ४१.९; ४४.१०,११,१२; ४५.३०; ५२.१; ६१.५, ९,१०,१८,१९; ६४.७; ७४.४; ७५.८; ७९.२; ८१.५ (२० सूक्त, ३२ मंत्र, ३५ नावं). **मंडल ८ :** १.११,३०,३२; २.३७,४०,४१; ३.९, १०, १२,१६; ४.१,२,१९,२०; ५.२५, २७, ३७, ३८,३९; ६.६, ४५,४६, ४८; ७.२३; ८.१८,२०; ९.७, १०, १५; १२.१६; १७.१२; १९.३७; २१.१७,१८; २३.२, १६, २३, २४, २८; २४.७, १४, २२, २३, २८, २९; २५.२,२२; २६.२,९,११; २७.१९; ३२.२,३०; ३३.४; ३४.३, १६; ३५.१९,२०,२१; ३६.७; ३७.७; ३८.८; ४५.५,३०; ४६.२१, २२,२४,३१,३३; ४७.१३, १४, १५,१६,१७; ४९.९; ५०.५; ५१.१, २; ५२.१,२; ५४.१, २, ८; ५६.२,४; ५९.३; ६२.१०; ६६.८; ६८.१०,१५,१६,१७; ६९.८, १८; ७०.१५; ७१.२; ७४.४,१३; ७५.६; ७७.२,५,१०; ८०.८; ८५.३,४; ८७.३; ९२.२५; ९३.१; ९७.१२; १०३.८ (५१ सूक्त, ११० मंत्र, १३७ नावं). **मंडल ९** : ८.५; १०.४; ११.२; ४३.३; ५८.३; ६१.१३; ६५.७; ८३.४; ८५.१२; ८६.३६,४७; ९६.१८; ९७.७,३८; १०७.११; ११२.४; ११३.३,८; ११४.२ (१६ सूक्त, १९ मंत्र, २० नावं). **मंडल १०** : ८.८; १०.७, ९, १३, १४; ११.२; १२.६; १३.४; १४.१, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२,१३,१४,१५; १५.८; १६.९; १७.१,२; १८.१३; २०.१०; २१.५; २३.६,७; २४.४; २७.१७; २८.४; ३१.११; ३३.७;३९.७; ४७.३,६; ४८.२; ४९.५,६; ५१.३; ५२.३; ५५.८; ५८.१; ५९.६, ८,१०; ६०.५,७,१०; ६१.१३,१७,१८,२१,२६; ६३.१७; ६४.२, १६,१७; ६५.१२; ६७.७; ७३.११; ८०.३; ८५.३७,४०,४१; ८६.४, २३; ८७.१२; ८९.७; ९०.५,१३; ९१.१४; ९२.१०,११; ९३.१४, १५; ९५.३; ९६.५,६,८; ९७.१६; ९८.१,३,५,६,७,८; ९९.६,११; १०३.३; १०५.२; १०६.५,६; ११५.८,९; १२०.६,९; १२३.४,६,७; १३०.५; १३२.७; १३५.१,७; १३६.६; १३९.४,६;१४८.५;१५०.३; १५४.४,५; १५९.३; १६४.२; १६५.४; १६६.१; १७७.२; १८९.२ (६७ सूक्त, ११७ मंत्र, १२८ नावं).

या वरील (आणि पुढे येणाऱ्या) याद्या अति-तपशीलवार आणि कंटाळवाण्या वाटत असतील! पण मुद्दा नीट समजण्यासाठी त्यांची आवश्यकता होती. या सगळ्या याद्यांचा दृश्यमान परिणाम म्हणून तरी स्पष्ट लक्षात येईल की ही समाईक नावं (आणि संबंधित शब्द) जुन्या मंडलांमध्ये एकसुद्धा मिळत नाही, पण नवीन मंडलांमध्ये उत्तुंग भरलेले आहेत आणि मंडलांच्या आत सुरुवातीपासून शेवटपर्यंत व्यवस्थित पसरलेले आहेत. जुन्या मंडलांमधून विद्वानांनी नमूद केलेल्या सुधारित सूक्तांमध्ये मात्र कधीकधी हातावर मोजण्याइतकी उदाहरणं मिळतात. आणि ऋग्वेदोत्तर ग्रंथांमध्ये (यजुर्वेद-अथर्ववेदपासून रामायण-महाभारत आणि पुराणांपर्यंत, आणि नंतरच्या संपूर्ण संस्कृत वाङ्मयात) ही नावं आणि हे शब्द अगदी सर्वसाधारण आहेत.

या मुद्द्यावर जास्त भर आणि जोर देण्यासाठी आणखी दोन (अवेस्तामधले) अति-महत्त्वाचे समाईक शब्द (गाथा आणि बीज) ऋग्वेदात कुठे मिळतात ते पाहू या :

**जुन्या मंडलांमध्ये** : एकही नाही.

**सुधारित सूक्तांमध्ये** : एकही नाही.

**नवीन मंडलांमध्ये** : १६ सूक्त, १७ मंत्र

**मंडल १** : ७.१; ४३.४; १६७.६; १९०.१ (४ सूक्त, ४ मंत्र). **मंडल ५** : ४४.५; ५३.१३ (२ सूक्त, २ मंत्र). **मंडल ८** : २.३८; ३२.१; ७१.१४; ९२.२; ९८.९(५ सूक्त, ५ मंत्र). **मंडल ९** : ११.४; ९९.४ (२ सूक्त, २ मंत्र). **मंडल १०** : ८५.६,३७; ९४.१३; १०१.३ (३ सूक्त, ४ मंत्र).

आणखी एक निकष लावून पाहू या. अवेस्ताचा सर्वात जुना भाग म्हणजे झरथुष्ट्र रचित गाथा. आता या गाथांमध्ये (आणि अन्य अवेस्तामध्ये) वापरलेले छंद म्हणजे ऋग्वेदात ज्यांना पंक्ती आणि महापंक्ती म्हणतात. ऋग्वेदात हे छंद पुढीलप्रमाणे वापरलेले आहेत -

**जुन्या मंडलांमध्ये** : एकही नाही

**सुधारित सूक्तांमध्ये** : १ सूक्त, १ मंत्र

**मंडल ६** : ७५.१७ (१ सूक्त, १ मंत्र).

**नवीन मंडलांमध्ये** : ५१ सूक्त, २४७ मंत्र -

**मंडल १** : २९.१-७, ८०.१-१६; ८१.१-९; ८२.१-५; ८४.१०-१२; १०५.१-७,९-१८; १११.१०-१२ (७ सूक्त, ६० मंत्र). **मंडल ५** : ६.१-१०; ७.१०; ९.५,७; १०.४,७; १६.५; १७.५; १८.५; २०.४; २१.४; २२.४; २३.४; ३५.८; ३९,५; ५०.५; ५२.६, १६-१७; ६४.७; ६५.६; ७५.१-९; ७९.१-१० (१९ सूक्त, ४९ मंत्र). **मंडल ८** : १९.३७; ३१.१५-१८; ३५.२२, २४; ३६.७; ३७.२-७; ३९.१-१०; ४०.१,३-११; ४१.१-१०; ४६.२१,२४,३२;४७. १-१८; ५६.५; ६२.१-६,१०-१२; ६९.११, १६; ९१.१-२ (१४ सूक्त, ७९ मंत्र). **मंडल ९** : ११२.१-४; ११३.१-११;११४.१-४(३ सूक्त, १९ मंत्र). **मंडल १०** : ५९.८-९, ६०.८-९; ८६.१-२३; १३३.४-६; १३४.१-७; १४५.६; १६४.५; १६६.५ (८ सूक्त, ४० मंत्र).

याशिवाय मध्य आशियातल्या इंडो-आर्यन आणि इराणियन लोकांच्या एकत्रपणाच्या कथित ऋग्वेद-पूर्व काळाचा पुरावा म्हणून विद्वानांनी काही विशिष्ट शब्दांची यादी तयार केली आहे (आशा, गंध, स्त्री, तोक्मन, शनैः, तिष्य, सप्तर्षी, मूजवत, समा, अंभस्, स्थूण, शेप, अथर्वण, कश्यप, चात्वाल, इष्टका, जहका, गदा, कफ, कद्रू, खर, नग्नहु, गृद, शर्व, दशा, कपाल, पुच्छ, सिकता, कपोत, सूची, वाशी, छाग, स्तुक, वृक्क, करू, फाल, मल्ह, दूर्श, अक-, निक्ष). आणि त्यांचं म्हणणं असं आहे की हे सगळे शब्द ऋग्वेद-पूर्व काळात इंडो-आर्यन आणि इराणियन भाषांमध्ये (कोणत्यातरी अज्ञात आर्येतर भाषेमधून) घेतलेले समाईक शब्द आहेत. पण यापैकी एकही शब्द जुन्या मंडलांमध्ये मिळत नाही. वरील सगळे शब्द पहिल्यांदा नवीन मंडलांमध्ये किंवा काही सुधारित सूक्तांमध्ये किंवा ऋग्वेदोत्तर ग्रंथांमध्ये आढळतात.

या सगळ्या नावांच्या शब्दांच्या आणि छंदाच्या पुराव्यातून स्पष्ट दिसतं की मितांनी, अवेस्ता आणि ऋग्वेद या तीन शिलालेख-संग्रहांमधील समाईक संस्कृती ऋग्वेद-पूर्व संस्कृती नाही, आणि जुन्या मंडलांच्या काळातली संस्कृतीही नाही. ती नवीन मंडलांच्या काळातली संस्कृती आहे.

**sgtalageri@gmail.com**

उत्खनन

श्रीकांत गंगाधर तलगेरी

**भाषाशास्त्राच्या अभ्यासातून हे स्पष्ट झालं आहे की इ.स.पूर्व ३०००च्या काळात आर्य भाषांच्या सगळ्या बाराच्या बारा शाखांच्या भाषा बोलणारे लोक आर्य मायभूमीच्या आतच राहत होते आणि त्यानंतरच ते एकमेकांपासून वेगळे होऊन आपापल्या ऐतिहासिक प्रदेशांकडे स्थलांतरित व्हायला लागले.**

# आर्य भाषांची मायभूमी भारतात आहे

## (भाग - १०) - इ.स.पूर्व ३०००चा काळ आणि आर्य भाषांची मायभूमी




**आ**ताच पाहिल्याप्रमाणे जुन्या मंडलांचा काळ इ.स.पूर्व २५००च्या आधीचा काळ आहे आणि कमीत कमीत कालावधी पकडला, तरी सर्वात जुन्या मंडलांची सुरुवात आणि पार्श्वभूमी सहजपणे किमान इ.स.पूर्व ३०००पर्यंत तरी जातेच. त्या काळात (म्हणजे इ.स.पूर्व ३०००च्या काळात) ऋग्वेदातलं भौगोलिक आणि सांस्कृतिक चित्र काय होतं ते आता पुन्हा पाहू या. पुन्हा कारण ते आम्ही सरस्वती नदीच्या संदर्भात पुरावे मांडताना पाहिलंच आहे. पण आता ते नव्याने आणि हे चित्र इ.स.पूर्व ३००० किंवा त्याहूनही मागचं चित्र आहे हे स्पष्ट ओळखून एका नवीन नजरेने पाहू या.

या सर्वात जुन्या तीन मंडलांचं इ.स.पूर्व ३०००च्या काळातलं भौगोलिक चित्र अगदी स्पष्ट आहे : इथे सगळ्या पूर्वेकडच्या नद्यांचे उल्लेख आहेत (गंगा/जह्नावी, यमुना, दृषद्वती/हरियूपीया/यव्यावती, आपया, सरस्वती, शुतुद्री, विपाश, परुष्णी, असिक्नी) पण पश्चिमेकडच्या नद्यांचे उल्लेख नाहीत (मरुद्वृधा, वितस्ता, आर्जीकीया, सुषोमा, सिंधू आणि तिच्या पश्चिमेकडून अफगाणिस्तानमधून वाहणाऱ्या उपनद्या तृष्टामा, सुसर्तु, अनितभा, रसा, श्वेती, स्वेत्यावरी, कुभा, कुमू, गोमती, सरयू, मेहत्नू, प्रयियू, वयियू, सुवास्तु, गौरी, कुषवा). २. इथे पूर्वेकडच्या ठिकाणांचे उल्लेख आहेत (कीकट, इळास्पद) पण पश्चिमेकडच्या ठिकाणांचे उल्लेख नाहीत (गंधारि, सप्तसिंधव). ३. इथे पूर्वेकडच्या सरोवराचा उल्लेख आहे (मानुष) पण पश्चिमेकडच्या सरोवराचा आणि पर्वतांचा उल्लेख नाही (शर्यणावती, मूजवत, सुषोम, आर्जीक). ४. इथे पूर्वेकडच्या प्राण्यांचे उल्लेख आहेत (हत्ती, मोर, जंगली म्हैस, गौर, चितळमृग), पण

पुष्पौषधी उपचार व समुपदेशन
शिक्षण, नोकरीनिमित्त परदेशी, परगावी घरापासून दूर जावे लागते. अशा वेळी होमसिकनेस येऊ नये. नव्या वातावरणाशी, नव्या जागेशी, नव्या लोकांशी जुळवून घ्यायला, समरस व्हायला मदत करते.
औषधे घरपोच मिळतील.
संपर्क
डॉ. ज्योती देवगावकर, पुणे (B.B.F.R. Psy)
। रजि. नं.- IBAM/RMP/A-4328 । वेळ : ११.३० ते ७.३०
। भ्रमणध्वनी : ९४२२६४०१३९
महिन्याच्या पहिल्या शनिवारी नगरला । वेळ : ११.०० ते ५.००

पश्चिमेकडच्या प्राण्यांचे उल्लेख नाहीत (उंट, वराह, मथ्र, छाग, वृष्णी, उरा, मेष).

पुढे या सर्वात जुन्या तीन मंडलांमध्ये इ.स.पूर्व ३०००च्या काळात :

१. सूक्तांमध्ये असं कुठेही दिसत नाही की ऋषींना आपण बाहेरून आल्याची किंचितही जाणीव आहे.

२. कुठेही कथित स्थानिक 'आर्येतर' भाषिकांची (मग ते शत्रू असोत वा मित्र) जाणीवही दिसत नाही आणि उल्लेखही नाही. या मंडलांमधलं भाषिक वातावरण संपूर्णपणे शुद्ध 'आर्य' वातावरण आहे.

३. सगळ्या स्थानिक नद्यांची आणि जनावरांची नावं शुद्ध 'आर्य भाषिक' नावं आहेत. (नुकतेच बाहेरून आलेल्या लोकांच्या बाबतीत ही असाधारण गोष्टच नव्हे, तर जगाच्या इतिहासात कुठेही समान उदाहरण नसलेली गोष्ट आहे. अमेरिकेत आजही बहुतेक प्रमुख नद्यांची नावं पूर्वनिवासी 'रेड इंडियन' लोकांच्या भाषेतली आहेत; आणि युरोपमध्ये आजही हजारो वर्षांनंतरसुद्धा बहुतेक प्रमुख नद्यांची नावं अज्ञात 'आर्यपूर्व' भाषांमधली आहेत.)

४. आणि या नद्यांशी ऋषींचे आधीपासून भावनात्मक संबंध आहेत हे सूक्तांमधून स्पष्ट दिसतं : ६.४५.३१मध्ये गंगेच्या काठावरच्या गवताच्या उंचीचा उल्लेख एका उपमेमध्ये केला आहे, आणि ३.५८.६मध्ये जह्नावी (जाह्नवी/गंगे)च्या काठाला अश्विनीकुमारांची प्राचीन मायभूमी म्हटली आहे. ६.६१.१४मधले ऋषी भावनात्मक होऊन सरस्वती नदीला सोडून अन्यत्र जाऊन राहायची पाळी त्यांच्यावर कधी न येवो अशी प्रार्थना करतात.

म्हणजे थोडक्यात हे ऋग्वैदिक लोक निश्चितपणे सरस्वती नदीच्या पूर्वेकडच्या (भाषिकदृष्ट्या) संपूर्णपणे आर्यमय प्रदेशाचे स्थानिक निवासी होते (ज्या ठिकाणच्या वर्णनांमध्ये कुठेही कोणत्याही कथित आर्येतर पूर्व-निवासी लोकांचा ना उल्लेख, ना नोंद, ना आठवण, ना जाणीव) आणि या भूमीशी (जिथल्या सगळ्या नद्यांची नावंसुद्धा आर्य भाषिक नावं आहेत) त्यांचे घट्ट भावनात्मक संबंध होते, आणि ही गोष्ट इ.स.पूर्व ३०००च्याही आधीपासूनची गोष्ट आहे!

पण भाषाशास्त्राच्या अभ्यासातून हे स्पष्ट झालं आहे की इ.स.पूर्व ३०००च्या काळात आर्य भाषांच्या सगळ्या बाराच्या बारा शाखेच्या भाषा बोलणारे लोक आर्य मायभूमीच्या आतच राहत होते आणि त्यानंतरच ते एकमेकांपासून वेगळे होऊन आपापल्या ऐतिहासिक प्रदेशांकडे स्थलांतरित व्हायला लागले.

यातून एकच वादातीत निष्कर्ष काढता येतो - इ.स.पूर्व ३०००च्या काळात आर्य भाषांच्या सगळ्या बाराच्या बारा शाखांच्या भाषा बोलणारे लोक ज्या आर्य मायभूमीच्या आत होते, ती आर्य भाषांची मायभूमी भारतातच होती आणि त्या बारा शाखांच्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या स्थलांतराच्या इतिहासाचे तपशील आम्हाला भारतातच शोधावे लागतील.

sgtalageri@gmail.com

